
छात्र
प्रबोधन
अंक १८
सौर वैशाख शके १९१९
वासंतिक
विशेषांक



१.



२.



३.

# वसंतातील पुष्पोत्सव

१. गुलमोहोर
२. बहावा
३. गणेरी
४. तामण
५. मुचकुंद
६. क्लोरोडेंड्रॉन



४.



५.



# छात्र प्रबोधन

**वर्ष ५ अंक १०**

**सौर, वैशाख शके १९१९**

**वासंतिक विशेषांक**


**इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती**
**प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात**


**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.,M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc.,B.Ed.
अनघा लवळेकर M.A.,B.Ed.
शैलजा देशमुख M.A.,M.Ed.

**मुखपृष्ठ व आतील बाजूच्या फुलांच्या पारदर्शिका**
प्रा. प्र. के. घाणेकर

**मुखपृष्ठ सजावट व आतील चित्रे**
भास्कर सगर

**अक्षरजुळणी**
प्रिंट लिंक, पुणे - ५.

**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
☎ ०२१२- ४७७६९१


**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १७ वैशाख, शके १९१९.
७ मे १९९७.

**वर्गणी भारतात**
वार्षिक - रु. १००/- द्वैवार्षिक रु. १८५/-
त्रैवार्षिक - रु. २७५/- आजीवन रु. २०००/

**भारताबाहेर**
वार्षिक - २५ डॉलर


## *या अंकात दडलंय काय?*


- संवाद २
- शिवरायासी आठवावे ३
- कविता पानोपानी ८
- आयरीश कथा : घराची ओढ ९
- ओरिगामी : फूल १६
- कोड्यांच्या अंतरंगात : वेडपट कोडी १७
- बालकामगारांचे शिक्षण १९
- शब्दकोडे २४
- चला प्रकल्प करू या २५
- मराठी कथा : आन्दाच्या करामती २७
- मुलांचे पान : वनवासी तरुण/भरारी ३४
- तिबेटी कथा : तृष्णानाश ३७
- इंग्लिश कथा : दरवाजाचे गूढ ३९
- पाणी हेच जीवन ४३
- हाऽऽहाऽऽहा ५०
- संस्कृत कथा : सत्यकाम जाबाल ५१
- शास्त्रीय उपकरण ५४
- भटकंती डोंगरदऱ्यातील ५५
- हिंदी कथा : प्रायश्चित्त ६०
- जर्मन कथा : भ्रमाचा भोपळा ६६
- रंगफुलांच्या गंधदेशी ६९
- कन्नड कथा : संन्याशाची आमटी ७३
- शिबिरे व स्थानिक कार्यालयांचे पत्ते ८०



## संवाद

प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

वासंतिक अंकाची तुम्ही आतुरतेने वाट पाहात असाल, हो ना! एप्रिल महिन्यातील भरगच्च शिबिरांमुळे हा अंक तुमच्या हातात देताना थोडा उशीर होत आहे. तुम्ही समजून घ्याल असा विश्वास वाटतो.

एव्हाना १०वी-१२वी सोडून सर्वांचेच वार्षिक परीक्षेचे निर्णय जाहीर झाले असतील. तुमचा निर्णय समजून घ्यायला आम्हाला निश्चितच आवडेल. मी मुद्दामच 'निकाल' हा शब्द वापरत नाही. आपण त्याचा अगदीच वेगळा अर्थ घेतो म्हणून! शालेय अभ्यासातील प्रगतीचा आलेख वार्षिक निर्णयाच्या द्वारा तुमच्यापर्यंत पोहोचला आहेच. गेल्या वर्षीपेक्षा प्रगती झाली असेल तर आनंदाची गोष्ट आहे. थोडे मागे पडला असाल तर कारणे शोधून पुढील वर्षासाठी काही टिपण करून ठेवा अन् मग खुशाल सुट्टीची मजा अनुभवा. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी, जूनमध्ये तुमच्या या टिपणाचा तुम्हाला नक्कीच उपयोग होईल.

***अभ्यासाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील प्रगतीचे काय?*** विविध स्पर्धांमधला सहभाग, व्यायाम, वाचन, नवीन कौशल्ये शिकणे, नवीन अनुभव घेणे, प्रवास, नव्याने झालेले मित्र, जुन्या मित्रांशी झालेले विशेष संवाद, घरातील कार्यक्रमांमधला विशेष सहभाग इ.बाबत गेल्या वर्षभरात काय प्रगती केली हेही स्वतःहून नोंदवून ठेवा. कोठे मागे पडला असाल तर त्याचीही नोंद करा. वर्षभराच्या धकाधकीच्या वेळापत्रकात असा विचार करायला वेळ मिळतोच असे नाही. निदान सुट्टीमध्ये तरी मुद्दाम थोडावेळ काढून गेल्या वर्षाचा एकत्र आढावा घ्या. असा एकत्र आढावा आमच्यापर्यंतही जरूर पोहोचवा.

***'उद्या आजच्या पेक्षा काही पुढेच जाऊ करू असे'*** असे व्हायचे असेल तर आज कुठे आहोत अन् काल कोठे होतो, हे नीट समजून घ्यायला हवे. तरच उद्या अधिक मोठी भरारी घेऊ शकू.

सुट्टीच्या हलक्याफुलक्या वातावरणामध्ये एक थोडासा गंभीर विचार तुम्हाला करायला भाग पाडत आहे याची मला जाणीव आहे. पण ***तुम्हीही आता थोडे मोठे झाला आहात अन् खूप खूप मोठे होणार आहात, हो ना!*** मग त्यासाठी थोडंसं, अधून मधून गांभीर्यानं विचार करायला लागलं पाहिजे अन् उर्वरित वेळेमध्ये भरपूर हसायचं, खेळायचं, बागडायचं, भटकायचं, अनेक गोष्टीत रमायचं, धुंद व्हायचं.....

या वेळच्या वासंतिक विशेषांकात विविध भाषांमधील कथा अनुवादित केल्या आहेत. तुम्हाला त्या आवडतील असा विश्वास वाटतो. भारतीय व विदेशी भाषांमधील दर्जेदार साहित्य या निमित्ताने तुमच्यापर्यंत पोहोचविण्याचा हा एक प्रयत्न!

सुट्टीतील शिबिरांमध्ये खूपच धमाल आली. सविस्तर तपशील पुढील अंकात वाचालच.

***सुट्टीत काही विशेष अनुभव अन् आनंद मिळवताय ना! एखादं तरी पत्र लिहायला हरकत नाही. वाट पाहतो.***

**सस्नेह तुमचा,**



**(महेन्द्र सेठिया)**

# *शिवरायासी आठवावे ------*

**– श्री. शरद सुंकर**

यंदा शिवरायांची तीनशे सत्तरावी जयंती. थोर पुरुषांना अवतार बनवून देवघरात बसवून त्यांची पूजा करणं ही आमची जुनी रीत. पण असं करण्यात एक मोठा धोका असतो. ती व्यक्तीही माणूस म्हणूनच जन्माला आली आणि कर्तबगारीने तिने त्या मनुष्यत्वाचे रूपांतर दैवत्वात केले हे आम्ही विसरतो. शिवाजी महाराजांचे चरित्र तर कल्पिताहून अद्भूत! पण ह्या अद्भुत घटना केवळ योगायोगाने घडल्या नाहीत. दैव, नशीब, योगायोग या गोष्टींवर न विसंबता महाराजांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर ह्या अद्भुत घटना घडवून आणल्या.

तसा विचार करायचा तर अनुवंशिकतेने किंवा केवळ नशिबाने ठरणाऱ्या काही गोष्टींच्या बाबतीत महाराज फारसे सुदैवी नव्हते. 'क्षत्रियकुलावतां' हे जरी खरं असलं तरी 'नावडतीचे पुत्र' हेही तितकंच खरं. उंची जेमतेम पाच फूट चार इंच. रूप-तसं सामान्यच. अफजलखान भेटीच्यावेळेस तर महाराजांचा बुटकेपणा अधिक प्रकर्षाने जाणवतो. अफजलखानाची उंची सहा फूट तीन इंच. ''आओ, मेरे गले लग जाओ।'' असं म्हणत त्या राक्षसानं महाराजांना अलिंगन दिलं तेव्हा महाराजांचं डोकं जेमतेम त्याच्या खांद्यापर्यंत लागलं.

महाराजांचे वैशिष्ट्य असे की





With Best Compliments From SUNIKEM ENTERPRISES, PUNE.

नशिबानं ठरणाऱ्या  या गोष्टींची खंत त्यांनी कधीही बाळगली नाही. रंग-रूप-उंची-कुल या गोष्टी आपल्या हातात नसतात. पण त्यावरून स्वत:ची किंमत ठरवून कारण नसताना पराभूत वृत्ती अंगीकारणाऱ्या मुलामुलींनी लक्षात ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे. 'दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरूषम्'असं म्हणणाऱ्या कर्णाप्रमाणे उंची, रूप यातील कमीपणाची भरपाई महाराजांनी ताकद, चिकाटी, चपळपणा या गुणांनी केली.

पन्हाळागडावरून पलायनाचा प्रसंग. पावसाळी रात्र. मिट्ट काळोख. खाचखळग्यांनी, दगड-धोंड्यांनी आणि काट्याकुट्यांनी भरलेला रस्ता. महाराजांच्या आग्रहाला  न जुमानता बाजींनी त्यांना पालखीत बसवलं पण घोडखिंडीपाशी सिद्दी मसूदच्या सैन्याशी गाठ पडल्यानंतर बाजींचाही नाइलाज झाला. दोनशे जणांच्या तुकडीसह महाराज विशाळगडाच्या दिशेने धावत सुटले. विशाळगडाच्या पायथ्याशी असलेला शत्रूचा वेढा तोडून महाराजांनी विशाळगडाचे टोक गाठले. या सर्व प्रसंगात बाजींची स्वामिभक्ती, असामान्य शौर्य यांबरोबर डोळ्यात भरतो महाराजांचा चपळपणा, आवेश आणि काटकपणा.

आग्र्याहून सुटकेचा प्रसंग तर महाराजांच्या शारीरिक क्षमतेची कसोटीच पाहणारा. १७ ऑगस्ट ते १२ सष्टेंबर १६६६. शत्रूला चुकवत, अनोळखी भागातून घोड्यावरून अथक प्रवास करीत महाराजांनी रायगड गाठला.महाराजांच्या चपळपणाने तर मोगली सैन्यामध्ये धडकीच निर्माण केली होती. त्यांना जादूटोणा येतो, २५ फूट लांब उडी मारता येते, गुप्त होता येते अशा कित्येक अफवा त्यांच्या-विषयी शत्रूसैन्यामध्ये पसरल्या होत्या.

शारीरिक गुण जसे प्रयत्नांनी मिळवावे लागतात तसे मानसिक गुणही जोपासावे लागतात. मन म्हणजे भावनांचे, इच्छांचे आणि प्रेरणांचे उगमस्थान. भावनाविरहित व्यक्तिमत्त्व म्हणजे भावनाशून्य यंत्रच.

बालवयात मातुश्री जिजाबाईंनी केलेले संस्कार, रामायण-महाभारतातील कथांचा परिणाम यामुळे पेटलेली प्रेरणेची ज्योत महाराजांनी नंतरच्या काळात प्रयत्नपूर्वक पेटती ठेवली. वयाच्या १४ व्या वर्षी रायरेश्वरावर मित्रांसह घेतलेली प्रतिज्ञा हे त्याचेच उदाहरण. चहुबाजूंनी पारतंत्र्य-नुसते राजकीयच नव्हे तर मानसिकही. संवेदनशील वयात मार्गदर्शन करायला वडिलांचे सान्निध्य नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत महाराजांनी आपली प्रेरणा सतत जागी ठेवली.

महाराजांचे जीवन म्हणजे भावनांचा उत्कट आविष्कार! सुरतेची मोहीम यशस्वी करून महाराज परतले. त्याच सुमारास शहाजी महाराजांचा अंत झाला. जिजाबाईंनी सती जायचे ठरविले. कोण समजावून सांगणार जिजाबाईंना? शिवाजी रायगडावर आले. स्वागताच्या तुताऱ्या-



केदार देवगावकर याच्यावतीने छात्र प्रबोधनच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

जयजयकार यांच्याऐवजी सामसूम, उदास चेहरे आणि चुकवलेल्या नजरा आणि वज्राघात व्हावा तशी महाराजांच्या कानांवर बातमी आदळली – जिजाबाईंच्या कठोर निर्णयाची आणि स्वराज्याचा राजा, अखंड स्थितीचा निर्धारू दुःखाने व्याकूळ झाला. जिजाबाईंच्या मांडीवर बसून, त्यांच्या गळ्याला घट्ट मिठी मारून त्यांनी केविलवाण्या स्वरात टाहो फोडला, ''आई, मला सोडून जाऊ नकोस गं!''

भावनांची ही श्रीमंती इतरांची कदर करताना अनेकदा महाराजांनी दाखविली. अफजलखान वधानंतरच्या विजय दरबारामध्ये आवर्जून त्यांनी बांदल देशमुखांचा आणि इतर सहकाऱ्यांचा सत्कार केला. आग्र्याहून परत आल्यावर ज्यांनी ज्यांनी त्या कठीण प्रसंगात साहाय्य केले त्या मदारी मेहतर सकट सर्वांचा जाणीवपूर्वक सन्मान करण्यास महाराज विसरले नाहीत. केवळ महराजांच्या शब्दाखातर बहलोलखानावर तुटून पडणाऱ्या आणि मरण पावणाऱ्या प्रताप गुजराचे स्मरण तर महाराजांना नेहमीच अस्वस्थ करीत असे. राजारामचे लग्न प्रतापरावांच्या मुलीशी जानकीबाईशी लावून महाराजांनी तिला सून करून घेतली.

क्वचित प्रसंगी या भावनासमृद्धीची जागा भावनाक्षोभानेही घेतली. महाराजही शेवटी माणूसच होते. त्यांचंही शरीर हाडामासाचं आणि मन विचार–विकारांचं बनलेलं होतं.

आग्र्याच्या दरबारात झाला असह्य अपमान. त्यापाठोपाठ लवकरच महाराज राहत असलेल्या घराला औरंगजेबाच्या शिपायांनी वेढा घातला. महाराजांना कल्पना नव्हती. गडबड ऐकू आली म्हणून महाराजांनी खिडकी उघडून बाहेर बघितले. त्यांना दिसली ती सैनिकांची गर्दी आणि त्यांच्या रोखाने वळलेली तोफांची तोंडं. महाराजांना ब्रम्हांड आठवलं. नऊ वर्षाच्या संभाजीराजांना पोटाशी धरून महाराजांनी अपरंपार शोक केला. 'निश्चयाचा महामेरू' ही डगमगला.

पण असे डगमगण्याचे किंवा भावनाक्षोभाचे प्रसंग क्वचित आणि क्षणिक. एरवी बुद्धीच्या लगामाने भावनांच्या वारूला थोपविण्याचे विलक्षण सामर्थ्य महाराजांच्या अंगी होते. महाराज औपचारिक शिक्षणपद्धतीच्या मुशीतून बाहेर पडलेले नव्हते. पण त्यांच्याजवळ कुशाग्र बुद्धिमत्ता होती यावर कोणाचेच दुमत होणार नाही.

गनिमी काव्याचे तंत्र महाराजांच्या बुद्धिमत्तेची साक्ष देण्यास पुरेसे आहे.संकटाला न डगमगता पण त्याचबरोबर आत्मघातकीपणाने तुटून न पडता त्याला विचारपूर्वक दिलेली प्रतिक्रिया असे गनिमी काव्याचे वर्णन करता येईल. भावनेच्या आहारी न जाता आवश्यक वाटल्यास तात्पुरती माघार घेणे, शत्रूच्या मर्मस्थानाचा अभ्यास करून त्यांचा भेद करणे ही



मंदार देवगावकरतर्फे प्रबोधकांना बलसंपन्न व आरोग्यपूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा!

गनिमी काव्याची लक्षणे.

महाराजांचे संपूर्ण चरित्र हा समस्या-परिहाराचा, त्यातही कल्पक समस्या परिहाराचा उत्तम नमुना आहे. परिस्थितीचे सम्यक आकलन होणे, त्यातून सुटण्याचा नावीन्यपूर्ण मार्ग सुचणे याची उदाहरणे महाराजांच्या चरित्रात ठायीठायी आढळतात.

आदिलशहाने शहाजीराजांना कैदेत टाकल्यानंतर निर्माण झालेली समस्या. शहाजीराजांना अपाय न होता, जिजाबाईसाहेबांना न दुखवता पण त्याचबरोबर स्वाभिमान गहाण न ठेवता या समस्येतून कसा मार्ग काढायचा? महाराजांनी कल्पक उपाय शोधून काढला. नाक दाबले की तोंड उघडते. आणि दिल्लीच्या शहाजहानशी मुत्सद्दीपणाने संधान बांधून, त्याची चाकरी स्वीकारल्याची बतावणी करून महाराजांनी त्याच्याकरवी आदिलशहाला जरबेचे फर्मान पाठविले. आदिलशहाचे तोंड उघडले- शहाजीराजे अलगद बाहेर पडले.

'प्रतापगड युद्ध' हा तर युद्धशास्त्राच्या विद्यार्थ्यांना नेहमीच आकर्षून घेणारा विषय. अफजलखान आणि शिवाजीमहाराज यांना बुद्धिबळ खेळता येत होते की नाही माहीत नाही पण एखाद्या कसलेल्या बुद्धिबळपटूप्रमाणे दोघांनी या संघर्षात डाव टाकले. अफजलखानाला माहीत होते की शिवाजीराजांचे मर्मस्थान म्हणजे देवावरील श्रद्धा! म्हणून अफजलखानाने पहिली गोष्ट जर कोणती केली असेल तर, तुळजापूर आणि पंढरपूर या देवस्थानांची विटंबना. महाराजांना सह्याद्रीच्या पोटातून बाहेर काढण्यासाठी टाकलेला हा डाव होता. पण महाराज कच्च्या गुरूचे चेले नव्हते. आपला संताप नियंत्रणात ठेवत महाराजांनीच उलटा डाव टाकला आणि मोकळ्या मैदानातून स्वत:च्या पायांनी चालत अफजलखान जावळीच्या जंगलात-छे! त्याही पुढे खुद्द प्रतापगडावरच महाराजांना भेटायला आला. प्रजेचे नुकसान होऊ नये म्हणून स्वराज्याच्या हद्दीवरील प्रतापगडाची निवड हाही महाराजांच्या निर्णय क्षमतेचा नमुना.

स्वराज्यात खोलवर घुसून खुद्द महाराजांच्या राहत्या वाड्यात, लाल महालात ठाण मांडून बसलेल्या शायिस्तेखानाला हुसकावून लावण्यासाठी ४०० मावळ्यांनिशी चातुर्याने घातलेला छापा, मिठाईच्या पेटाऱ्यात बसून आग्र्याहून केलेले पलायन... खरोखर अद्‌भुतरम्य कादंबरीत शोभाव्यात अशाच या कल्पना. पण त्या महाराजांच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेल्या घटना आहेत.

लाभलेल्या आणि मिळविलेल्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक संपदेचा वापर कशासाठी करायचा याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर स्पष्ट होते. 'इये देशी हिंदवी स्वराज्य व्हावे, हे तो



*With Best Compliments From* JAISONS ENGINEERING TECHNOLOGY *PUNE.*

श्रींची इच्छा.’ महाराजांना केवळ राजकीय स्वराज्य निश्चितच अभिप्रेत नव्हते. अध्यात्माचे अधिष्ठान, स्वधर्माचा आणि संस्कृतीचा सहिष्णुतापूर्ण अभिमान, स्त्री सन्मान, दुर्बलांचे रक्षण, आधुनिकतेचे भान, या सगळ्यांनी युक्त असे स्वराज्य महाराजांना निर्माण करायचे होते. ही त्यांच्या आयुष्याची दिशा होती.

या संदर्भात काही घटना खूप बोलक्या आहेत. महाराजांपासून आणि स्वराज्यापासून दुरावलेला नेताजी पालकर नाइलाजाने ‘महंमद कुलीखान’ बनला. पण उत्तरायुष्यात पश्चाताप होऊन संधी मिळताच औरंगजेबाच्या तावडीतून निसटून स्वराज्यात आला. महाराजांनी त्याला अभय दिले. जवळ केले, इतकेच नव्हे तर पुनःश्च हिंदू धर्मात प्रवेश दिला. जुन्या चुकांना दुरूस्त करण्याचा हा आधुनिक प्रयोग खरोखर अलौकिक होता.

राज्यकारभारात रूढ झालेले पार्सी शब्द काढून त्यांना संस्कृत प्रतिशब्द देण्यासाठी महाराजांनी ‘राज्यव्यवहारकोश’ तयार करवून घेतला. स्वत्व आणि स्वाभिमान जागविण्यासाठी महाराजांनी उचललेलं हे पाऊल होतं.

परमेश्वरी शक्तीची उपासना हा महाराजांच्या जीवनाचा स्थायी भाग होता. भवानीमाता हे त्यांचे उपास्य दैवत होते. तीच आपल्या हातून सर्व कार्य करवून घेते असा त्यांचा दृढ विश्वास होता. त्या शक्तीच्या स्फुरणाची काही उदाहरणे आपल्याला महाराजांच्या चरित्रात आढळतात. प्रतापगड युद्धाच्या वेळेस आणि पन्हाळगडावरून पलायन करण्याआधी भवानी मातेने दिलेले दृष्टान्त हे त्यापैकीच. आधुनिक मानसशास्त्राच्या मताने कदाचित स्वतःच्या सुप्त मनातील क्षमतांना आवाहन करून प्रकट करण्याचा तो प्रयत्न असेल.

महाराजांच्या निवार्णाला तीनशे वर्षांहून अधिक काळ लोटला. परिस्थिती बदलली, संदर्भ निराळे झाले. पण तत्कालिक संदर्भाच्या पलिकडे जाऊन मूलभूत, चिरंतन असे संदर्भ शोधणे ही दृष्टी थोर पुरुषांच्या चरित्राचा अभ्यास करताना जर असेल तर आजच्या काळात त्यातून पुष्कळ काही शिकता येईल. असा प्रयत्न या लेखात केला आहे. महाराजांच्या चरित्रातून काय शिकता येईल? समर्थ रामदासांनी संभाजीराजांना लिहिलेल्या पत्रात त्याचे उत्तर दिले आहे.

‘‘याहूनि करावे विशेष
तरीच म्हणवावे पुरूष
याउपरि आता विशेष
काय लिहावे।। ’’

■ ■

***– श्री. शरद सुंकर***
प्लॉट क्र. आर. एल ८
जी. ब्लॉक, एम.आय.डी.सी.
चिंचवड, पुणे १९.


प्रायोजक : विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्टस् प्रा. लिमिटेड, पुणे.

# चारोळ्या

भूतकाळातल्या आठवणींवर
इतरांचे ओझे
भविष्यातल्या भरारीचे
पंख मात्र माझे

♦ ♦ ♦

उसळणाऱ्या लाटेमागे
जलाशयाचा हुंकार
न उसळलेल्या लाटेमागे
एक शांत ओंकार

♦ ♦ ♦

अंतराळातून शब्दपक्षी
अलगद मख़नात उतरतात
कवितेच्या रूपात असे
बाहेर येऊन अवरतात

♦ ♦ ♦

मोजपट्टीला ठरवून खोटे
पायांपेक्षा डोळे मोठे
पायांना दारोदार उंबरठे
डोळ्यांना मात्र आभाळ थिटे

♦ ♦ ♦

सावलीचे अंधाराशी
दिसण्यापुरतेच नाते असते
कारण ती आतून आतून
प्रकाशाला फितूर असते

♦ ♦ ♦

डोळ्यांमध्ये दोन्ही असते
सागर आणि आभाळ
भरारतांना करावा लागतो
भावनांचा सांभाळ

♦ ♦ ♦

**श्रीमती सत्यवती एदलाबादकर**

कविता
पानोपानी

# वैशाख

खिडकीवर निळ्या उन्हाचे
झगझगीत पडदे
अंगणात सोनचाफ्याचे
रेखिले उन्हाचे कशिदे!

मोहून घोस जरतारी
रस्त्याच्या दोही अंगा,
सुनसान वळणांवरती
बहाव्याच्या पिवळ्या रांगा....

गुलमोहर ठायी ठायी
बहरुन आतुनी, नटले
भर माध्यान्ही ही बाई
तांबडे कोवळे फुटले!

चैत्रात अंकुरलेल्या
वसंतास जपायाला
सोसते निकराने सृष्टी
वैशाखाच्या उन्ह झळा.....!

**सुहासिनी देशपांडे**
३ पुण्यश्री, डहाणूकर कॉलनी,
रस्ता क्र. ७, कोथरुड, पुणे २९.



प्रायोजक : महाराष्ट्र ॲग्रिकल्चर बायोटेक, पुणे ३०.

आयरीश कथा

# घराची ओढ

– नरेन्द्र सिंदकर

शेकडो वर्षापूर्वी लिझर्डपॉइंट इथे डोंगरावर ल्यूटी नावाचा शेतकरी राहात होता. क्यूरी किंवा कोरान्तिन नावाच्या डोंगराळ खेड्यात त्याची काही एकरांची शेती होती.

ल्यूटी डोंगर उतरून खाली आला. कारण भरती आली असता समुद्राच्या लाटांनी वाहून आणलेले मौल्यवान पदार्थ ओहोटीच्या वेळी किनाऱ्याच्या वाळूत सापडत. त्या दिवशी ल्यूटीला काहीच सापडले नाही. आपल्या खडतर नशीबाला बोल लावीत तो घराकडे निघाला. तेवढ्यात, समुद्रतीरावरच्या दलदलीतील रानटी झुडुपातून कुणीतरी दुःखाने गाणे आळवीत असल्याचे त्याच्या कानी आले. एखादे लहान मूल रडावे असा तो आवाज होता. तो थांबला आणि ऐकू लागला.

“मेले गं बाई,
मेले गं बाई
घर कोठे गेले?”
कशी गं बाई,
कशी गं बाई
किनाऱ्यास आले?
शोधून कुठं वाट
अंधारलं दाट
डोळ्या दिसेना झाले!
काय करील भरतार
काय करतील बाळे
कुठे बाई आले?”

गाणे येत होते त्या दिशेनं ल्यूटी गेला. तो एका उंच खडकापाशी आला. त्या खडकावर एक अत्यंत सुंदर स्त्री बसलेली त्याला दिसली. अद्याप त्याला फक्त, तिचे डोके तेवढे दिसत होते. त्या सुंदर स्त्रीचे सोनेरी केस तिच्या खांद्यावर लोळत होते आणि तिथल्या दलदलीच्या खळगीत साठलेल्या पाण्यावर ते तरंगत होते. तिच्या लक्षात येऊ नये अशी खबरदारी घेत ल्यूटी तिच्या आसपास घुटमळू लागला. तिचे सांत्वन करावे असे त्याला वाटू लागले. पण कुणी परका माणूस पाहून ती सैरभैर होईल, दचकून तिला भोवळ येईल अशी त्याला भीती वाटली. तो हळूच खोकला, खाकरला.

त्या आवाजाने त्या स्त्रीने टपोऱ्या





प्रायोजक : कौशिक एंटरप्राईजेस, पुणे - ३८.

डोळ्यांचे शिंपले उघडले. आजूबाजूला न्याहाळले. परका मनुष्य दिसताच तिच्या ओठातून चित्काराची किंकाळीच फुटली. पण, त्या किंकाळीचा आवाज इतका अद्‌भुत होता की, आवाजाची अशी झालर कुणी कधी ऐकलीच नसेल. त्या निसरड्या खडकावरून ती खाली घरंगळली आणि तिथल्या झुडुपांत तिने अंग लपेटून घेतले. आता फक्त तिची राजहंसारखी मान तेवढी दिसत होती. बाकीचं शरीर झुडुपात लपलं होतं.

"अग सुंदरी! भिऊ नको." ल्यूटी म्हणाला. "भिऊ नको. मी सज्जन आणि भला माणूस आहे. माझं लग्न झालंय. घरी पोरंबाळं आहे. तुझे कपडे का हरवलेत? तुझे कपडे तर कुठे दिसत नाही. मी तुझ्यासाठी काय करावं?"

तेव्हा ल्यूटी त्या खडकाजवळ गेला. तेथील खडकातील पाण्यात त्याने डोकावून पाहिले तेव्हा त्याला खवले असलेली माशाची लांबच लांब शेपटी दिसली. ती शेपटी पाणशेवाळ्यावर तरंगत होती. त्याच्या लक्षात आले की, ही अतीव सुंदर स्त्री नसून, ती एक मत्स्यकन्या आहे. यापूर्वी मत्स्यकन्या त्याने जरी कधीही पाहिली नव्हती तरी, असे ऐकले मात्र होते की, चांदण्याराती मत्स्यकन्या किनाऱ्यावर येत असतात.

"हे सुंदर जलकन्ये! तुझ्यासाठी मी काय करू सांग. बोलता येत नसेल तर खुणेने सांग."

"भल्या माणसा!" ती चक्क मानवी भाषेत बोलू लागली. "आम्हां सागरवासियांना जगातील सर्व भाषा समजतात. कारण, सर्वच देशांचे लोक समुद्रावरून ये जा करीत असतात. शिवाय आमचे कान इतके तिखट आहेत की, आम्ही समुद्रात मैलोगणती दूर असलो तरी, धरित्रीवरचे शब्द आम्हाला उत्तम ऐकू येतात. माझ्या अंगावर कपडे नाहीत याचं तुला आश्चर्य वाटेल. कारण, तुम्हा माणसांच्या बायका, नेहमी कपडे नेसलेल्या असतात पण असे कपडे घालून आम्हाला पाण्यात कसं नांदता येईल? लाटांवर कसं नाचता येईल?"

ती मस्त्यकन्या पाण्यातून वर आली आणि खडकाच्या मागे ओठंगून बसली. कपाळावर झेपावलेल्या कुरळ्या सोनेरी केसांच्या बटा तिने मागे सारल्या. तेव्हा ल्यूटीला दिसलं की, तिने सुस्कारा टाकला आहे. ती म्हणाली,

"अरे, मी एक दुर्दैवी मत्स्यकन्या आहे. तीनच तासांपूर्वी नवऱ्याला घरी ठेवून मी बोहर पडले. माझी लेकरं तिथेच खेळत होती. सगळ्यात मोठ्या मुलाला वडिलांकडे लक्ष द्यायला सांगून मी बाहेर पडले. एखादा मोठा झिंगा किंवा पाण्यातील चिलटं त्याच्या नाकातोंडात जाणार नाही इकडं त्याला लक्ष ठेवण्याबद्दल मुलांना बजावलं. म्हणाले, 'नीट काळजी घ्या रे. त्यांना स्वस्थ विश्रांती घेऊ द्या. खेकड्यांना बाबांच्या शेपटीला नांगी



प्रायोजक : मे. ओम् कन्स्ट्रक्शन, प्रो.प्रा. माणिकराम हळबे, पुणे ४११ ०३०.

मारू देऊ नका.' बाळांनो, मी तुमच्यासाठी खेळायला छोटा डॉलफिन घेऊन येते. गमतीगमतीचे जलप्राणी आणते.''

प्रत्येक किनाऱ्यापासून ओहोटी केव्हा सुरू होते ते मला मेलीला कळायला हवं होतं. तरी माझ्या केसात अडकलेल्या गवतकाड्या, कोळंबी, खेकडे विंचरून काढीत मी या खडकावर नादिष्टासारखी बसून राहिले. ओहोटी सुरू झाल्याचं लक्षातच नाही आलं. आता समुद्र कितीतरी मागे सरकलाय!''

''पण बाई, एवढं भ्यायला काय झालं? इथंच का थांबत नाहीस? मी तुला सोबत देतो. नंतर पोहत घरी जा.'' ल्यूटीनं विचारलं.

''छे, छे!'' ती म्हणाली,''भरती येण्याच्या आत मला घरी गेलंच पाहिजे. कारण, माझा नवरा, मुलंबाळं भुकेनं व्याकुळली असतील. माझा नवरा जागा झाला की, त्याला दुष्काळाची भूक लागते. तो झोपून उठला की, त्याच्या अंगात शार्कचा संचार होतो.''

तिनं सुस्कारा टाकला आणि दोन शेपट्या असलेल्या समोरच्या माणसाकडं ती बघू लागली.

''अरेरे!'' ती म्हणाली, ''तुला चालायला जशा दोन शेपट्या आहेत तशा मला असत्या तर, किती मजा आली असती. जमिनीवर आले असते. दूर लाटांवरून बघते ती माणसं जवळून पाहिली असती. तू मला समुद्रापर्यंत घेऊन जातोस का? तू मला समुद्रापर्यंत पोचवलंस तर, तुझ्या कोणत्याही तीन इच्छा पुऱ्या करण्याचा मी वर देईन.''

असे म्हणून, तिने तिच्या केसातून सोनेरी कंगवा काढला. त्या सोनेरी कंगव्याला मोत्याचा हात होता. तिने तो ल्यूटीला दिला.

''हा घे कंगवा! तुझ्याजवळ असू दे. तुझ्यावर कोणतंही संकट आलं तर, हा कंगवा समुद्राच्या पाण्यातून तीनदा फिरवायचा. मला हाक द्यायची. मी येईन. माझे नांव गॅगीफिगी.''

त्या मत्स्यकन्येच्या बासरीसारख्या मंजूळ वाणीनं ल्यूटी इतका मंत्रमुग्ध झाला होता की, चेटूक केल्यागत तो ते बोल ऐकत होता. तिच्यासाठी काहीही करायची त्याची तयारी होती. त्या मत्स्यकन्येला उचलून त्याने तिला हातझुल्यावर घेतली. तो समुद्राकडे निघाला.

ल्यूटी चांगला दणकट होता. तेव्हा त्या मत्स्यकन्येची शरीरपाकळी त्यानं अलगद उचलली. तिने आपल्या शेपटीचा विळखा त्याच्या गळ्याभावती टाकला. काही मिनिटे न बोलता दोघेही समुद्राकडे चालली होती. तिच्याकडून काय मागून घ्यावं याचा तो विचार करीत होता. असेच भाग्य लाभलेल्या माणसाबद्दल त्याने ऐकले होते. 'हात लावीन त्याचे सोने व्हावे' हे मागणाऱ्या माणसाची कशी दुर्दशा झाली तेही त्याला माहीत होते.




प्रायोजक : मे. आर. डी. वीरकर आणि कं. वीट कारखानदार. सिंहगड रस्ता, पुणे

स्वार्थी इच्छेपोटी किती लोकांनी स्वत:चे वाटोळे करून घेतले ते तो जाणून होता.

"सांग, सांग भल्या माणसा," मत्स्यकन्या म्हणाली, "आता वेळ दवडू नकोस. तुझ्या कोणत्या तीन इच्छा मी पुऱ्या करू? तुला दीर्घायुष्य, सामर्थ्य आणि संपत्ती हवी का?"

"नको." तो म्हणाला," मला फक्त माझ्या गावकऱ्यांचं भलं करण्याचं सामर्थ्य दे. त्यांच्यावर कुणी चेटूक घातलं तर ते हाणून पाडण्याची ताकद दे. दुसरी इच्छा अशी की, माणसाचा कोणताही रोग बरा करण्याचं अद्‌भुत सामर्थ्य मला दे. तिसरी इच्छा ही की, मला मिळालेले हे वर माझ्या वंशात पिढ्यान्‌पिढ्या कायमचे चालू रहावेत"

हे सगळं सामर्थ्य लाभेल असा वर, त्या मस्त्यकन्येनं दिला. त्याच्या कुटुंबात कधीही, कसलीही ददात पडणार नाही असाही वर तिने दिला. समुद्राच्या पाण्यापर्यंत पोचण्याला अजून वेळ हाता. तो हळूहळू चालत होता. चालता चालता मत्स्यकन्येनं आपल्या सुंदर घराचं वर्णन केलं. समुद्रातील सुखी घराचं वर्णन केलं. समुद्रातील सुखी आणि समृद्ध जीवन किती मजेचं असतं ते सांगितलं.



ती बोलू लागली. "माझ्याबरोबर चल. मत्स्यकन्येचं स्वप्नसुंदर घर बघच.

अरे, आम्ही मत्स्यकन्या चमत्कार घडवतो. मी तुझ्यासाठी सुंदर खवले तयार करीन अगदी पाच मिनिटात! त्यामुळे कोणत्याही माशासारखा तू



प्रायोजक : परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.

मजेत तिथं राहाशील. राहावे तितके दिवस तुला पाण्यात राहाता येईल. तुझ्या देखण्या चेहऱ्याची सुंदरता जास्तच सुंदर होईल. तुला कंटाळा आला तर, तू जमिनीवर परत येऊ शकतोस, येताना तुझ्याबरोबर तू हवी तेवढी रत्नं, माणकं, हिरे आणि पाचू आणू शकशील.''

अशा संभाषणात काही वेळ गेला. मत्स्यकन्येच्या स्वरातील मंजूळ संगीत सतत ऐकत राहावं असं त्याला वाटत होतं. आता लाटांबरोबर तो पाण्यात बुडी घेणार होता. हा माणूस पूर्णपणे आपल्या ताब्यात आलेला पाहून, त्या मत्स्कन्येचे सागरहिरवे डोळे लकाकू लागले.

अगदी याच क्षणी, ल्यूटीच्या कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. तो कुत्रा आवाज न करता त्यांच्या पाठोपाठ आला होता. आता तो एवढ्या मोठ्यानं भुंकला की, त्या मंत्रमुग्ध माणसाने आजूबाजूला पाहिले.

गावातील घरांच्या धुराड्यातून वेटोळे घेत उठणारा धूर त्याला दिसला. हंबरत घराकडे जाणाऱ्या गायींच्या गळ्यातील घंटा ऐकू येत होत्या.

त्याबरोबर मत्स्यकन्येच्या मंजूळ गीताची जादू संपून गेली. आता तो तिच्या शेपटीकडे, चंदेरी खवल्यांच्या शरीराकडे आणि तिच्या सागरहिरव्या डोळ्यांकडे तिरस्काराने बघत हाता. बघता बघता त्याने दु:खाने टाहोच फोडला.

''वाचवा, वाचवा! या राक्षसी माशापासून वाचवा रे वाचवा!'' तंद्रीतून भानावर येताच त्याने उजव्या हाताने कमरेचा सुरा काढला. त्या मत्स्यकन्येसमोर त्याने तो नाचवला. तो ओरडला.

''या सुऱ्यानं मी तुझा गळा चिरीन. आणि काळीज बाहेर काढीन. मुकाट्यानं मला सोड.''

त्या मत्स्यकन्येनं त्याच्या गळ्याभोवतालची मिठी सोडवली आणि सुळकन् ती समुद्रात शिरली. समुद्राखाली जाता जाता त्याच्याकडे बघत ती म्हणाली,

''अच्छा! येते मी! नऊ वर्षानंतर परत येईन. तुझ्यासाठी. नऊ वर्षानंतर आपली भेट ठरलेली आहे.''

ल्यूटी मोठ्या मुश्किलीने धडपडत पाण्याबाहेर एका होडीत लवंडला. तिथंच त्याला गाढ झोप लागली.

इकडं ल्यूटीची बायको काळजी करत त्याची वाट बघत होती. कारण, रात्रीच्या जेवणाची वेळ टळून गेली तरी, तो आला नव्हता. असे कधी झाले नव्हते. तिने त्याच्या आवडीचे केक्स बनविले होते. त्यात बेदाणे, मनुका घातल्या होत्या. त्याला क्रीम लावले होते.

रात्र सरली. न्याहारीची वेळ झाली तरी, नवऱ्याचा पत्ता नाही असे पाहून, ती रडकुंडीला आली. झराझरा डोंगर उतरून आली. तेव्हा हा एका होडक्यात गाढ झोपी गेलेला तिला आढळला.



चि. ऋषिकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना शुभेच्छा !

‘‘ए, ऊठ!’’ ती ओरडली. ‘‘इथं काय झोपून राहिलास? जेवणखाण केलंस?’’

‘‘नाही ग बाई!’’ ल्यूटी उठून बसत म्हणाला. त्यानं आजूबाजूला पाहिलं. ‘‘पण मी होडीत आहे की, समुद्राच्या तळाला माशांच्या घरी आहे. तूच का माझी बायको मॅगी? कॉफी दे. पण, तू वेगळीच दिसतेस!’’ ‘‘मुळीच कोणी दिसत नाही!’’त्याची बायको म्हणाली ‘‘अन् तू काय स्वप्नात आहेस का काय? ’’

‘‘चल, बरं झालं. थोडक्यात सुटलीस ग बये! नाहीतर विधवा होऊन बसली असतीस. पोरं उघडी पडली असती.’’

घरी जाता जाता त्याने त्या मत्स्यकन्येची सारी कथा बायकोला ऐकविली. त्याला तीन वर कसे मिळाले ते सांगितलं.






प्रायोजक : स्वस्तिक बिल्डर्स(अनिल लोंढा, राजेंद्र गोठी) मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक ☎ ७३५९८०

मिळालेला कंगवाही दाखवला.

तो पुढं म्हणाला, ''पण, जर हा बेटा कुत्रा भुंकला नसता तर, त्या तंद्रीतून माझं डोकं काही ठिकाणावर आलं नसतं''

हे सगळं सांगून झाल्यावर ल्यूटीनं आपल्या बायकोला बजावलं की, ''यातलं कुणाला काहीही बोलू नको. कारण, यावर कुणी विश्वास ठेवणार नाही.''

''कुणाला सांगू नको हं!'' असं प्रत्येकीला सांगत ही सारी कथा पदरचा मीठमसाला लावून तिनं गावातील घरोघरीच्या बायकांना सांगितली. मत्स्यकन्येनं दिलेला कंगवाही तिने दाखविला.

गुप्त बातमी म्हणून सांगितलेल्या या चमत्काराची कथा गावभर पसरली.

त्या मत्स्यकन्येला झटकून टाकून ल्यूटी जरी परतला तरी, ती मात्र शब्दाला जागली.

तिनं दिलेल्या वरामुळे, तो रोगी माणसं बरी करू लागला. पण, हे जरा महागातच पडलं. त्याच्या घराकडे माणसांची रीघ लागली.

नऊ वर्षानंतरची गोष्ट. मासे धरण्यासाठी एका चांदण्यारात्री, ल्यूटी जाळं घेऊन मित्राबरोबर जहाजातून समुद्रावर गेला. हवा उत्तम होती. पिठूर चांदणं पडलं होतं. एवढ्यात त्याच्या भोवतालचा समुद्र उफाळून उठला, आणि लाटांच्या उसळत्या, फेसाळत्या कमानीतून एक मत्स्यकन्या त्यांच्याकडे येताना त्यांनी पाहिली. कमरेपर्यंत तिचं शरीर सागरावर होतं. तिच्या सोनेरी केसांचा पिसारा वाऱ्यावर फुलारला होता.

''माझी घडी आली.'' ल्यूटी म्हणाला, ती पाण्यावर दिसताच त्यानं समुद्रात उडी घेतली. पोहत पोहत तो मत्स्यकन्येकडं गेला. थोड्यावेळानं दोघंही समुद्रात अदृश्य झाली.

उसळलेला सागर शांत शांत झाला. जणू काहीच घडलं नव्हतं.

लोकांनी शोध शोध शोधलं. ल्यूटीचं शरीर कुठेच सापडलं नाही.

नऊ वर्षानंतर, त्याच्या कुटुंबातील एका तरूणाला एक थडगं वर आलेलं दिसलं.

अजूनही ल्यूटीचं कुटुंब कॉर्नवॉलमध्ये त्यांच्या अद्‌भुत उपचार सामर्थ्याबद्दल प्रख्यात आहे. एकाजवळ तर , त्या मत्स्यकन्येनं दिलेला कंगवाही आहे.

काही लोकांचा यावर विश्वास नाही. त्यांच्यामते तो, शार्कमाशाचा तुटलेला जबडा आहे. पण, ज्याच्याजवळ श्रद्धा नसते त्याच्याजवळ कल्पनाशक्तीही नसते असे म्हणतात.

■■


***– नरेन्द्र सिंदकर***

१२ कल्याण, ३२ रामबाग कॉलनी

पौडपथ, कोथरूड, पुणे ३८.



(मूळ आयरिश लोककथा)


# फूल




# ओरीगामी

– इंदूताई टिळक








१




२



३



४



५

कागद – ३ X ३ सें.मी. चौरस

१. तिरपा मध्य काढून वरचा व खालचा कोपरा मध्यबिंदूपर्यंत दुमडा.
२. मागील बाजूने घडी घाला.
३. तयार घडी.
४. दोन किंवा तीन घड्या तारेने मध्यावर एकत्र बांधा. दोरा वापरल्यास खाली गाठ मारा.
५. पाकळीत बोट घालून आंगठ्याने पाठीमागून दाब देऊन आकार द्यावा.



'Save Trees, Reuse Paper' - Dr. H. V. GANALA,Pune.

# कोड्यांच्या अंतरंगात-वेडपट कोडी


*- डॉ. सुरेश करंदीकर*

मित्रांनो, पहिल्या लेखांकातील तुमच्या प्रतिक्रिया हाती येण्याअगोदर दुसरा लेखांक मला हातावेगळा करावा लागत आहे. माझी खात्री आहे, कोडी सोडविण्यासाठी तुमच्या डोक्यांना तुम्ही खूप त्रास दिला असेल! गडगडत जाणाऱ्या गाड्याचे उत्तर, विहिरीवर बसविलेला रहाट हे तुमच्या लक्षात आले असेल. दुसऱ्या त्रिकुटाचे उत्तर पाय आहे. अशा त्रिकुटी प्रश्नांची केवळ उत्तरे शोधून आपण थांबणार नाही तर असे काही प्रश्न आपण तयार करणार आहोत. मित्रांनो, अशा त्रिकुटी प्रश्नांची मी आपणाकडून आतुरतेने वाट पाहात आहे. असे प्रश्न आपण नक्की तयार करून पाठवाल; आपणाकडून अशी त्रिकुटी कोडी आल्यावर पुढल्या लेखात मी त्यासंबंधी निश्चितपणे लिहीन.

या लेखांकात मी तुम्हाला काही वेडपट कोडी घालणार आहे. बघा, त्यांची उत्तरे तुम्हाला देता येतात का? या कोड्यांना वेडपट कोडी म्हटले आहे कारण त्यातील प्रश्न वेडपटपणाचे वाटतील आणि तुम्ही उत्तरेही तशीच वेडपटपणाने द्यायची आहेत पण डोके लढवून! त्यातील सर्व कोड्यांचा मानवी जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध आहे. या कोड्यांचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की, या कोड्यांची उत्तरे एकापेक्षा जास्तही असू शकतील. उत्तराचा निकष आपण डोके किती चालविले हा असेल. पाहूया, यातील किती कोडी तुम्हाला सोडविता येतात!

एके दिवशी तीन माणसे छत्रीतून चालली होती. पण आश्चर्य असे की, त्यापैकी कोणीही पाावसाच्या पाण्यानं भिजत नव्हते! याचे कारण काय असावे? आता या कोड्याचे उत्तर कुणी पाऊस पडत नव्हता असे देईल तर, दुसरा ती माणसे रणरणत्या उन्हातून चालली होती असे देईल तर, तिसरा पाऊस नुकताच थांबला होता असे देईल तर, तिसरा पाऊस नुकताच थांबला होता असे देईल तर आणखी एखादा यापेक्षा वेगळे पण डोके लढवून देईल! तर त्याने कोणते उत्तर दिले असेल? सांगा पाहू!

एकदा एक भली मोठी पक्षीण आपल्या एकुलत्या एका लाडक्या पिलाला आकाशात उडायला शिकवीत





शिरिष पोंक्षे व प्रसाद पुरंदरे यांच्याकडून धडपडणाऱ्या प्रबोधकांना शुभेच्छा!

होती. ती आपल्या पिलाला म्हणाली, ''बाळा, जा. आता पूर्व दिशेला उड्डाण कर.'' पण बाळाने दक्षिण दिशेकडे उड्डाण केले. याचे कारण काय असावे?

एकदा एक बस ड्रायव्हर सिग्नलचा दिवा लाल असतानाही न थांबता पुढे गेला. नंतर 'प्रवेश बंद' अशी चक्क पाटी लावली असताना तेथून गेला! तेथे खरं तर वाहतूक पोलीस होता. या पोलिसाने त्या बस ड्रायव्हरला अडविले नाही. याचे कारण काय असेल?

एकदा काय झालं, ब्रम्हदेव आणि विष्णु यांची कुस्ती झाली आणि विशेष असं की ब्रम्हदेव त्यात हरले हे कसे?

एकदा चार मुंग्या रांगेत चालल्या होत्या. त्या मुंग्यांना साखर दिसली. तीन मुंग्यांची साखरेचे कण नेले पण चौथ्या मुंगीने त्याच साखरेला तोंड लावले नाही! याचे कारण काय असावे?

आमच्या बैठकीच्या खोलीत चिमणीचे एक घरटे आहे. 'हम और हमारे दो' या न्यायाने चिमणा, चिमणी आणि तिची दोन पिले रोज सकाळी बाहेर जातात व संध्याकाळी परत येतात. पण रविवारी मात्र दुपारी बारा वाजता न विसरता परत येतात. याचे कारण काय असावे?

मी तुम्हाला उत्तराची कोणतीही सूचना न देता लागोपाठ पाच वेडपट कोडी घातली आहेत. याची उत्तरे तुम्ही शोधायची आहेत. एकापेक्षा जास्त उत्तरे सुचली तर चांगलेच आहे. पण ती उत्तरे बुद्धीला पटली पाहिजे बरं का! आपले उत्तर खास डोके लढवून दिले आहे असे तुमचे तुम्हाला वाटले अन् एक कोड्याची तीन किंवा तीनपेक्षा जास्त उत्तरे तुम्हाला सुचली तर मला जरूर कळवा.

आमची प्रभा सध्या ए, बी, सी, डी,... शिकते. पण गंमत अशी की ए पासून टी पर्यंत ती अक्षरे न चुकता लिहिते पण टी या अक्षरानंतर तिचा क्रम चुकतो. याचे कारण काय असावे?

अहो अति परिचयाचा परिणाम, दुसरे काय? टी नंतर ती व्ही हेच अक्षर लिहिते! टी.व्ही. शिवाय तिला काय सुचतंय?

■■

***– डॉ. सुरेश करंदीकर***
दयानंद शिक्षणशास्त्र
महाविद्यालय,
सोलापूर ४१३००२

**हसाल बरं का?**

संपतनाना एकदा वाण्याच्या दुकानात वस्तू खरेदी करण्यास गेले असता तेथे साखरेच्या पोत्यावरील अक्षरे पाहून चकित झाले व त्यांनी दुकानदाराला विचारले, ''हे पोते साखरेचे असून त्यावर 'मीठ' असे का लिहिले आहे?''

त्यावर दुकानदार म्हणाला, ''साहेब, हळू बोला! मुंग्या ऐकतील.''

☺ ☺



छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.

## बालकामगारांचे शिक्षण

**– डॉ. स्वर्णलता भिशीकर**

*१ मे हा कामगार दिन म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो खरा पण आपल्या आसपास आपल्याच वयाच्या अनेक मुलामुलींना कोवळ्या वयातच कामगारांचं कष्टमय जीवन जगावं लागतं. अशांच्या आयुष्यात फुलबाग फुलविण्याचा प्रयत्न ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्राच्या वतीने चालू आहे. आपल्यालाही खूप काही करता येण्यासारखे आहे हे सुचविणारा हा लेख!*

**'भारत आणि इंडिया'**

सोलापूर शहराच्या काही भागात रोज सकाळी दिसणारं हे दृश्य. वस्तीला जाग आलेली असते. मोठी माणसं बशीतून फुरकून 'चा' पीत असतात. लहान मुलं डोळे चोळत असतात. तोवर 'फ्याक्टरीवाला' दाराशी हजर होतो. ज्यांना अजून झोपेतून जागही आलेली नाही अशा पोरांना धरून, बांधून, ओढून तो कामाला नेतो. पोरं रडतात, ओरडतात. बाप्या माणसं गुमान असतात. आयांच्या काळजात तुटतं. पण संध्याकाळी घरी येणाऱ्या रोजगाराच्या पैशाकडं पाहून त्या पोरांना 'जाऊ नको' म्हणत नाहीत. पोरं गिरणी मागांवर दिवसभर काम करतात. दुपारी कोपभर 'चा' नि पाव. संध्याकाळी भुकेजून परत येतात. दोन घास खाल्ले की झोपली. पुन्हा दुसऱ्या दिवशी हाच रामरगाडा!

तुमच्या आमच्या मुलांना 'सोन्याबाबा' करत झोपेतून उठवलं जातं. सकाळची शाळा असेल तर आंघोळ घालून, इस्त्रीचे कपडे बूट घालून तयार केलं जातं. आई बळेच दुधाचा पेला तोंडाला लावते. डब्यात पोळीभाजी किंवा सँडविच भरून देते. तोवर स्कूलबस किंवा रिक्षावाला आलेला असतो. एवढी तैनात असून आपली पोरं कुरकुरतच शाळेत जातात आणि त्या पोराला नेहमी पंचाहत्तर टक्के गुण पडत असले आणि एखाद्या वेळी चौऱ्याहत्तर पडले तर आईवडिलांना आकाश कोसळल्यासारखं वाटतं.

ही दोन टोकं एकाच शहरात पाहायला मिळतात. शेतकरी संघटनेचे शरद जोशी म्हणतात, त्यानुसार आपल्यापैकी काहीजण 'इंडिया' त राहातात आणि काहीजण 'भारता'त राहातात. विषमतेची दरी वाढते आहे. तिच्या झळा आमच्या चिमुकल्या पिढीला सोसाव्या लागत आहेत. वडिलांना दारूला पैसे पाहिजेत म्हणून आठ-दहा वर्षाच्या मुलाने शाळेत न जाता ढाब्यावर, हॉटेलात, गॅरेजमध्ये काम केलं पाहिजे. आपलं लहानपण त्यानं गमावून बसलं पाहिजे.

'चिंचा पेन्सिलींचा सौदा,
अंकगणिताचे ताळे,
नवा शर्ट दहा बुक्के,
सारे गुपचूप चाले'

ही शाळेची गंमत त्याच्यासाठी नाही. खेळण्या-हसण्यातला, सहल-संमेलनाचा, कोऱ्या पुस्तकांच्या

*मार्गी कंटक तुला बोचतील ठेचा तैशा अनेक बसतील, प्रसंग नाना निराश*



निसर्गात शत्रू कोणीही नाही. प्रत्येकास काम नेमून दिलेले असते. श्री. उदय भवाळकर पुणे ९०४३६९१८

वासाचा, नवं नवं शिकण्याचा जो आनंद आहे त्यापासून हा मुलगा वंचित आहे. त्याच्यासाठीं आपण काय करणार?

**धोक्याने वेढलेले बालमजूर**

'लहान मुलांनी काम करण्यात काय चूक आहे? आमच्याकडे शेतात, घरी, दुकानात मुलांनी काम करायचं ही पद्धतच होती. म्हणून धंद्याच्या चार गोष्टी आम्हाला लहानपणीच कळल्या.' काही लोक सांगतात. मुलांना लहानपणापासून कामाची सवय असणं यात काही चूक नाही. श्रमाची सवय आणि श्रमाची प्रतिष्ठा हा महत्त्वाचे संस्कार आहेत. पण घरसंसाराला पैसा पुरत नाही, व्यसनाला अपुरा पडतो म्हणून लहान मुलांचा शिक्षणाचा हक्क छिनावून, हिसकावून, ओरबाडून घेणं, साध्या साध्या आनंदापासून त्यांना वंचित ठेवणं यात चूक आहे.



शिवकाशीला फटाके तयार करण्याचे कारखाने आहेत. तिथे बालकामगार फार मोठ्या प्रमाणात आहेत. तप्त लोहरसाचं ओतकाम, कुलुपं, कात्र्या तयार करणं, खाटिक खान्यांमधल्या कत्तली पाहणं, तिथे काम करणं हे लहान मुलांच्या कोवळ्या मनावर घातक परिणाम करणारं आहे. म्हणून शासनाला बालकामगारांना संरक्षण देणारे कायदे करावे लागले. विशेषत: धोकादायक उद्योगांमध्ये छोट्या मुलांना काम करायला लावता येणार नाही असा कायदा झाला. त्याची अंमलबजावणी मात्र अद्याप दूर आहे.

नुसते कायदे करून प्रश्न सुटत नाहीत. त्यासाठी लोकशिक्षण करावं लागतं. विधायक उपक्रम पुढे आणावे लागतात. स्वयंसेवी संस्थांना त्यात सहभागी करून घ्यावं लागतं. फार मोठ्या प्रमाणात वातावरणनिर्मिती



A. V. BHAT HOUSING COMPANY, 1348 Sadashiv peth, Pune 30.

करावी लागते. केंद्र शासनाने या सर्व गोष्टींना प्रारंभ केला आहे. महाराष्ट्रात बालकामगार शाळांची चळवळ सुरू करण्यात सोलापूर जिल्हा आघाडीवर आहे. त्याला कारण सोलापूरचे जिल्हाधिकारी श्री प्रविणसिंह परदेशी आणि यांना सहकार्य देण्यासाठी पुढे आलेल्या खाजगी शिक्षणसंस्था, नामवंत व्यावसायिक, आणि ध्येयवादी कार्यकर्ते. सोलपूर शहरात आजमितीस बालकामगारांच्या १८ शाळा कार्यरत आहेत. बार्शी, अक्कलकोट, सांगोला, करमाळा अशा अनेक तालुक्यांच्या ठिकाणीही बालकामगारांच्या शाळांना प्रारंभ होत आहे. या शाळेतील शिक्षणाचं स्वरूप थोडं तपशीलात पाहूया.

**शिक्षण म्हणजे आनंद –शिक्षण म्हणजे चैतन्य**

बालकामगारंचं सर्वेक्षण करताना ध्यानी येतं की कोणी दुसरीत तर कोणी चौथीत शाळा सोडून दिलेली आहे. कोणीकोणी शाळा नावाची गोष्ट पाहिलेलीच नाही. आपल्या शाळेत आलेल्या मुलांची दोन गटात विभागणी करावी लागते. अक्षरओळख असलेली मुलं आणि अक्षरओळख नसलेली मुलं.

अक्षरओळख नसली तरी जीवनाच्या भल्याबुऱ्या अंगांची बालकामगारांना चांगलीच ओळख असते. बालकामगारांसाठीच्या शाळेतल्या शिक्षकावरही त्यांचा सहजासहजी विश्वास बसत नाही. त्याला वाटत राहतं की, काहीतरी स्वार्थ असल्याशिवाय आपल्याशी दोन गोड शब्द कुणी बोलत नाही! त्यामुळे शांतपणाने, धिमेपणाने त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो.

प्राथमिक टप्प्याला मुलाला तो करत असलेल्या कामापासून एकदम तोडताही येत नाही. दिवसभर काम कर. मग सांजच्या शाळेला ये. असं सांगावं लागतं. सांजची शाळा प्रथम दोन तासांचीच असते. त्यात प्रथम वेणी घालणं, केस विंचरणं. तोंड स्वच्छ धुणं हा कार्यक्रम असतो. मुलांना सांगावं लागतं की शाळेत मावा घेऊन यायचं नाही. प्रथम शाळेत मावा न खायचा नियम. मग घरी नि कामाच्या ठिकाणीही मावा खायचा नाही असा आग्रह धरावा लागतो.

दोन तासाची शाळा हळूहळू वााढवत तीन तासांची, पाच तासांची करायला लागते. कारण मुलाच्या रोजगारावर पाणी सोडायला पालक तयार नसतात. त्यांचं नुकसान होऊ नये म्हणून दर महिना मुलाच्या नावावर शंभर रूपये शासनाच्या वतीने जमा केले जातात. जवाहर रोजगार आणि तत्सम शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ बालकामगारांच्या आईवडिलांना कसा होईल याकडे लक्ष पुरवलं जातं. आईवडिलांना साक्षर करण्याची योजना आपण केली आहे.

मुलांना शाळेची गोडी लागायला अडचण पडत नाही. मोकळेपणाने

नाचायला- खेळायला-बागडायला एरवी कुठे मिळणार? रोज प्रेमाने खाऊ दुसरं कोण देणार? पाठीवरून मायेचा हात कुठे फिरणार? ती ऊब सांजच्या शाळेमध्ये त्याला भेटते.

**अनौपचारिक आणि व्यावसायिक शिक्षण**

पुण्याच्या भारतीय शिक्षण संस्थेने 'अनौपचारिक प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम' तयार केलेला आहे. तो बालकामगारांच्या शिक्षणाला अतिशय उपयोगाचा आहे. त्यात ऐकणं, बोलणं, वाचणं, लिहिणं हा भाषेचा अभ्यास, अंकज्ञान आणि सर्व प्रकारची मोजमापं, सामान्यमान, आरोग्याची काळजी, प्रायोगिक विज्ञान, निरीक्षण आणि चिकित्सक वृत्तीची जोपासना, सौंदर्याभिरूची आणि सौंदर्यनिर्मिती तसंच सौजन्य आणि सुयोग्य वर्तन या गोष्टींचा समावेश आहे. खेळ, गीतगायन आणि नृत्य या मुलांच्या आवडत्या गोष्टी बालकामगारशाळेत असतातच.

पण त्याचबरोबर सध्याच्या कामातून त्याला बाहेर काढून शिक्षण झाल्यानंतर स्वत:च्या पायावर उभं राहता येईल अशा प्रकारचा व्यावसायिक अभ्यासक्रम त्याला शिकवणं आवश्यक असतं. म्हणून वायरमनचं काम, लाकूड पॉलिश, लेथवर काम करणं, ज्यूटच्या वस्तू तयार करणं, शिवण यातल्या कशाचं ना कशाचं नीट शास्त्रशुद्ध प्रशिक्षण त्याच्यासाठी योजलेलं असतं. चहाचे पेले विसळण्यापेक्षा अधिक सन्मानाने जगता येईल, सन्मानाने पैसे मिळवता येतील असा व्यवसाय आणि त्यातलं आवश्यक ज्ञान बालकामगाराला देणं अत्यावश्यक आहे.

**वृत्तीघडणीचं शिक्षण**

सर्वात महत्त्वाचं जर काही असेल तर बालकामगाराच्या वृत्तीघडणीचं शिक्षण. जगात जसे शोषण करणारे लोक असतात तसे आपली काळजी घेणारे, आपल्या हितासाठी, प्रगतीसाठी झटणारे काही लोक असतात. त्यांच्याशी प्रेमाचं, विश्वासाचं नातं जोडता येतं हा बालकामगारांच्या मनोविश्वातला महत्त्वाचा अनुभव. हळूहळू आपला समाज, आपला देश, त्यातले आपल्यासारखेच श्रमणारे बांधव या सर्वांशी त्याचं नातं जुळू लागतं. त्यांना देण्यासारखं आपल्याजवळ काही आहे हा आत्मविश्वास बळावतो. जो लाभार्थी आहे तो लाभ देणारा होणं, सक्षम होणं ही शिक्षणाची परिणती असली पाहिजे.

**पालकांचं आणि मालकांचं शिक्षण**

बालमजुरांच्या पालकांना वेळोवेळी बोलवावे लागते. मुलगा काम सोडणार यामुळे एक असुरक्षितेची भावना येते. त्यातून त्यांना बाहेर काढावं लागतं. चार पैसे कमी मिळाले तरी चालेल पण मुलाला आयुष्यात मानाने उभं राहाता आलं पाहिजे हा विचार त्यांना पटवून द्यावा लागतो. हे सोपं नाही. व्यसनी बापांना पटवणं तर बिलकुल



मोकाशी कुटुंबियांकडून हार्दिक शुभेच्छा!

सोपं नाही. ते भांडायलाच येतात. आयांना पटवणं त्या मानाने सोपं.

सर्वात मुश्किल आहे  जिथं मुलं काम करतात तिथल्या मालकांना पटवणं. काही सन्मान्य अपवाद सोडले तर मालकवर्ग निष्ठुर असतो. पैशाचा प्रश्न असल्याने बालकामगारशाळांच्या चालकांना ते अजिबात दाद देत नाहीत. तिरसटपणे बोलतात, टाळतात. मुलांना दमदाटी करतात. पाठवत नाहीत. एक मुलगा माझ्याकडे आला. हौसेनं म्हणाला, ''ताई, मला इंग्रजी शिकायचंय. पाचवीचं पुस्तक, चार रेघी वही नि पेणशिल द्याल का?'' दुसऱ्या दिवशी त्याच्यासाठी हे सारं आणून ठेवलं. पण त्याच्या मालकानं त्याला दूर गावच्या खाणावळीत कामाला धाडून दिलं. आजही त्याच्या आठवणीने मनाला ठणका लागतो. पण यावर उत्तर नाही. कोर्टकेसेस् करता येतात. पण मुलगा सापडेल असं नाही.

काही मुलांना शाळेची शिस्त मानवत नाही. एक मुलगा शाळा तर सोडून गेलाच पण आपण जिथे काम करतो त्या कामाच्या ठिकाणी शाळेचे लोक येतील म्हणून ते कामही सोडून गेला! माट्यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' मधली 'बन्सीधरा, आता कोठे जाशील?' ही गोष्ट मला नेहमी आठवते. असे कितीतरी बन्सीधर भेटून चटका लावून जात असतात.

**निवासी शाळा**

बालकामगारांच्या निवासी शाळा सुरू करण्याचा शासनाचा विचार आहे. पण व्यक्तिश: मला असं वाटतं की मुलाला घरापासून, घर कसंही असलं तरी, शक्यतो तोडू नये. अगदीच अवघड परिस्थिती असेल, मुलाच्या जिवाला धोका असेल, प्रगतीची शून्य शक्यता असेल, छळवाद असेल तर वसतिगृह असलेल्या शाळांमध्येच मुलांना ठेवायला हवं. पण बहुसंख्य मुलांना घरी राहून शिक्षण घेता यायला पाहिजे.

**आव्हान मोठं आहे**

एकट्या सोलापुरात नोंदीकृत बालकामगार ७९,००० आहेत. त्याखेरीज न नोंदलेले मोठ्या संख्येने असणार. पुण्यामुंबईकडे तर फार प्रचंड संख्येने बालकामगार असणार. या सर्वांना त्यांचं हरवलेलं बालपण परत मिळवून द्यायचं, त्यांना ज्ञान-व्यवसाय आणि मूल्य या तीनही बाबतीत सुशिक्षित करायचं, आत्मसन्मान मिळवून द्यायचा आणि समाजाचे सक्षम घटक बनवायचं हे शासन, स्वयंसेवी संघटना, शिक्षणसंस्था यांच्यापुढचं मोठं आव्हान आहे. 'नाही रे' विषयीची मौखिक आस्था येथे पुरणार नाही. आव्हान कृतीचं आहे. एक ओंजळभर कृती, हौद भरून शब्दांपेक्षा जास्त मोलाची असते. इथे तर हौदभर कृतीच  हवी आाहे.

■■


***डॉ. स्वर्णलता भिशीकर***
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर



A. V. BHAT HOUSING COMPANY, 1348 Sadashiv peth, Pune 30.

# शब्दकोडे

हर्षल रुईकर
'उर्मी' हस्तलिखित, परांजपे विद्यालय, अंधेरी, मुंबई




**आडवे शब्द**

१. पुस्तके प्रसिद्ध करणारा
३. नाजुका कलाकुसर
५. वाचन करणारा.
६. शेतीला खणलेला पाण्याचा पाट.
७. पराभव स्वीकारणे.
९. वजनदार आसामी.
११. दुष्ट, खडूस.
१३. गोष्टीतील नगर
१७. साल, वर्ष, कालगणना.
१८. रेष, रेघ.
१९. लोकांचा पुढारी
२०. खूप प्रयत्न करणे.
२१. श्रावणातील पाऊस.

**उभे शब्द**

१. तेजस्वी.
२. फडताळ
३. माहीत नसताना.
४. एक कडधान्य, गुलाबी रंगाची डाळ.
५. दुध काढण्याचे भांडे, कासंडी
८. हा विहिरीवर बसवलेला असतो.
१०. ऐतिहासिक वाङ्मयाचा प्रकार
१२. एकसारखे
१४. पाणी असलेले क्षेत्र.
१५. सुंदर रेखीव.
१६. पूर्ण नाश.
१७. पौष्टिक.



MICROVERSE AUTOMATION (P.) LTD. for Automation, Requirements of process plant.


## चला प्रकल्प करू या.

सर्व शास्त्रांमध्ये जीवशास्त्राचं स्थान आपल्या जीवनात आजही महत्त्वपूर्ण आहे. त्यातील काही छोटे छोटे प्रयोग आपणही घरच्या घरी करू शकतो. या प्रयोगांमधून मिळणाऱ्या निष्कर्षांमुळे आपल्याला पडणाऱ्या अनेक प्रश्नांना सहजगत्या उत्तरे सापडतात. असेच काही प्रयोग ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांनी केले. त्यांच्याच शब्दात ते वाचूयात. तुम्हीही असे प्रयोग करून त्यांचे निष्कर्ष पडताळून पहा.

**प्रकल्प क्र.१ : क्षेत्रफळ व झाडांच्या संख्येचा संबंध.**

कृती : प्रथम आम्ही ३ ट्रे घेतले. त्यात ३ x ४, ६ x ४ आणि १२ x ४ अशा बिंदूंवर धने पेरले. नंतर आणखी ३ ट्रे घेऊन त्यात वरील प्रमाणेच मोहरीही पेरली.

आता सरासरी उंची, सरासरी पानांची संख्या आणि झाडांची संख्या या वाढीच्या निकषांद्वारे आम्ही निरीक्षणे घेतली.



निरीक्षणे :

| **धने :-** | **३ x ४** | **६ x ४** | **१२ x ४** |
|---|---|---|---|
| झाडांची संख्या (%) | ४२.५ | ६६.६ | ५४ |
| सरासरी उंची (से.मी.) | २.५ | ३.८ | ३.९ |
| सरासरी पाने | २.०८ | २.०० | १.६ |
| **मोहरी :-** | | | |
| झाडांची संख्या (%) | ९३.५ | १०० | १०० |
| सरासरी उंची (से.मी.) | ७.६ | ८.९ | ७.७५ |
| सरासरी पाने | ३.३६ | ३.२ | २.१ |

निष्कर्ष : दोन्ही निरीक्षणांवरून असे दिसते की, ट्रे क्र. २ ची वाढ म्हणजेच ज्या ट्रेमध्ये ६ x ४ असे बी पेरले होते, त्याची वाढ सर्वात चांगली झाली.

**प्रकल्प क्र.२ : आकार व झाडाच्या वाढीचा संबंध**

कृती : आता आम्ही ६ ट्रे घेतले, त्यात विविध आकारात प्रत्येकी १२/१२ गहू पेरले. त्यांचे आकार क्रमशः टिंब, गोल, त्रिकोण, रेष, षट्कोन व चौरस असे होते.



प्रायोजक : बजेट कन्स्ट्रक्शन, १०२ 'वीरशांती', क्रांती चौक, औरंगाबाद.

निरीक्षणे :

| | ● | ○ | △ | — | ⬡ | □ |
|---|---|---|---|---|---|---|
| सरासरी उंची (सें.मी.) | ४.९१ | ८.०४ | ७.४ | ४.५ | ५.९५ | ४.५८ |
| सरासरी पाने | १.१ | १.८३ | १.५० | १.३३ | १.८३ | ०.८३ |
| झाडांची संख्या (%) | ५८.३१ | १०० | ७५ | ८३.३ | १०० | ५० |

निष्कर्ष : वर्तुळातील झाडांची वाढ सर्वोत्तम होती. नंतर असेही निदर्शनास आले की काही झाडे जवळ लावल्यास चांगली वाढतात. उदा. बांबू तर काही झाडे लांब लावल्यास चांगली वाढतात. उदा. गहू

***प्रकल्पकर्ते***

***सचिन खोत, अवधूत पुंडे, मंदार गद्रे, शशी गोडबोले, मयूर हरके, गौरव पटवर्धन***

**प्रकल्प क्र.३ : भाज्यांमधील पाण्याची टक्केवारी काढणे.**

कृती: प्रथम आम्ही पालकची भाजी घेतली. (भाजी ताजी असावी.) तिचे वजन केले. नंतर ती उन्हात वाळवत ठेवली. पूर्ण वाळल्यावर परत तिचे वजन केले. त्या दोन्ही वजनातील फरक काढला. ते वजन पाण्याचे असते. त्यावरून पाण्याची टक्केवारी काढली.

निरीक्षणे :

| **भाजी** | **वाळविण्या आधीचे वजन (ग्रॅ.)** | **वाळविल्या नंतरचे वजन (ग्रॅ.)** | **पाण्याचे प्रमाण (%)** |
|---|---|---|---|
| आवळा | ३१ | ११ | ६७.३२ |
| भोके पाडलेला आवळा | ३५ | १२.२५ | ६५ |
| आवळ्याच्या फोडी | ४० | ४.० | ९० |
| कोथिंबीर | १२५ | १० | ९२ |
| पालक | १५ | ४ | ७३.९ |
| मुळा | ४.५ | ०.५ | ८८.९९ |

निष्कर्ष : १. सर्वच पालेभाज्यांमध्ये ७०% पेक्षा जास्त पाणी असते.

२. भाज्यांमध्ये जी जीवनसत्वे असतात ती या पाण्यात विरघळलेली असतात. म्हणून पालेभाज्या कच्च्याच खाव्यात.

३. पालेभाज्यांची वाळवून पूड करून ठेवता येऊ शकते व आवश्यकतेनुसार त्याचे सूप, भाजी बनविता येऊ शकते.

***प्रकल्पकर्ते***

***रवी करमरकर, स्वानंद पागनीस, चैतन्य बोकील, अमोद मोघे, अभिषेक सिंग***

वरील तीन प्रकल्पाप्रमाणेच तुम्हालाही अनेक प्रकल्प सुचतील. ते प्रत्यक्ष करून त्यांच्या निरीक्षणांवरून निष्कर्ष काढा व आम्हाला कळवा.

## कथा

# आन्दाच्या करामती

*– हरिहर आठलेकर*

आठ महिने मागे पडले तरी मुंबईतला गिरणी कामगारांचा संप काही मिटण्याचं चिन्ह दिसेना. रघू पवार खूपच जेरीस आला. त्याच्या गिरणीनं टाळेबंदीच जाहीर केली होती. चार माणसांचं पोट भरेल असा दुसरा उद्योगही नजरेसमोर येईना. शेवटी त्यानं मुंबई सोडून कोकणात गावी जायचा निर्णय घेतला. रघूचा धाकटा मुलगा आनंदा आठवीत होता. जरा तरतरीत असल्यानं रघूनं त्याला बालमोहन विद्यालयात घातला होता. त्याला बहिणीकडे ठेवून शिक्षण पुरं करायचं असा रघूचा इरादा होता पण आनंदा त्याला तयार नव्हता. त्यानं कोकणात यायचा हट्ट धरला. एकदा दोनदा गणपती-दिवाळीला आनंदानं कोकणातलं आपलं घर पाहिलं होतं. त्याला ते खूप आवडलं होतं. रघून शाळेला दूर जावं लागलं तरी शाळा सोडणार नाही असं वचन घेतलं आणि त्याला बरोबर आणलं.

रघूचं घर कालवन गावात खाडीकाठी एका डोंगरकण्यावर होतं. रघूचं घर सर्वांच्या वर होतं. तसं सगळं गाव पन्नासेक घरांचंच खेडं. रघूच्या वाट्याचे चार कोपरे होते आणि दहाबारा माडही होते. रघू मुंबईला होता म्हणून त्याची म्हातारी आईच इथला कारभार करी. शेती थोडी सड्यावरही (डोंगराच्या टापेवर) होती. कातळावर माती पसरून तयार केलेली अर्धा एकर शेतजमीन होती. नाचणी, भात असं काही पिके. म्हातारी ते वाट्यानं करून घेई.

रघूच्या घराच्या मागं डोंगरातून एक व्हाळी खाली आली होती. पावसात चार महिने तिला पाणी असायचं. बाकी सुकीच. त्या व्हाळीच्या दोन्ही अंगांनी दहा दहा हात रघूच्याा वाट्याचीच जमीन थेट डोंगरमाथ्याला भिडली होती.व्हाळी त्या कण्याजवळ घरालगत येऊन उजवीकडे वळली होती आणि खाली जाऊन खाडीला मिळाली होती. तो डोंगरकणा खडकांचा हाता. मात्र डाव्या अंगानं पायथ्याशी खडकांच्या खोबणीत चांगली औरस चौरस दहा हातांची एक तळी बनली होती. वरच्या खडकांतून बाराही महिने एक निव्वळ पाण्याचा झरा वहात होता. तळीत तसं पाणी गुडघाभरच असे पण चवदार. खालच्या अंगानं तळीला पक्का चिऱ्यांचा बांध होता. त्या दहाबारा घरांना , गुरावासरांना चांगलं पाणी मिळे. तळीखाली ज्या विहिरी होत्या त्या मचूळ पाण्यानं भरलेल्या असत. खाडीला भरती आली की त्यांचंही पाणी वर येई. कधी कधी पूर्ण खारचं होई. अशा या गावात आनंदा आपण होऊन आला होता.

"काय रे मुंबैकरा-" आजीनं हटकलं, "'आता तुका शाळेत एकट्याक लांब जांवचां लागतलां"

"आजी मला चालता येतं. तशी



मे. गोविंदराव शोभाराव आणि कं. सांगली. GS चहा सर्वत्र उपलब्ध 250 gm. 100 gm. 50 gm.

फार दूर नाही आहे.''
''होय होय! मुंबैकार चलतलो! हरमाळतलो निबाद लागलां काय..'' बाळू पवाराचा खेम्या म्हणाला. आनंदा आला आणि त्याचं कौतुक होऊ



लागलं. खेमूला ते खुपत होतं.
''आजी, परवा मी शाळेत जाऊन बाबांबरोबर दाखला देऊन आलो. कृष्ण नगरातून बाल मोहनला जावं तेवढंच आहे. थोडं जास्ती असेल...''
''मुंबैत बशी असतत..'' खेम्या पुन्हा म्हणाला.
''नेहमीच काही बसमधून नव्हतो जात.''
''हवांदे. तुकां मुंबैची सय नाय येणां?''
''कशाला? तिथं जांभळं कुठं मिळतील झाडावर चढून खायला? झाडी, आंबे नाहीत इथल्यासारखे. सुसद कोंडीतला साखरांबा काय आहे. झक मारतो त्याच्यापुढं आफूस..''
''परवाचे दीस खाल होतस प्वाटभर आंबे.....!'' खेम्या बोलला आणि अंजा, महानंदा हसायला लागल्या. आजी पहात राहिली. आनंदा ओशाळला. पण अंजा सावरीत म्हणाली.
''आज्ये. काय्येक नाय. खेम्याच्या पोटात दुखता हा. आमका तेणी साखरांब्याचे आंबे हलवून दिल्यानं म्हणान....''
''आंदा तू साखरांब्यावर चढललस?'' आजी आता खेकसली.
''आजी तो वडाच्या पारंबीवरून



गिर्यारोहणाची प्रेरणा निर्माण करणारे पुस्तक 'गिर्यारोहणगाथा' किं. ४० रू. संपर्क 'छात्र प्रबोधन प्रकाशन.'

एक फांदीवर गेला होता. फार उंच नाही.''

''संबाळून रे बाबा. खंयतरी चडू नको. तुका सवय नाय.''

''आजी चढल्याशिवाय होईल सवय?''

''नाय रे बाबा पण संबाळून.'' आजी म्हणाली. ती मनातून सुखावली होती. मुलाला काही जमीनजुमल्याची, शेती-भाताची, आपल्या गावाची गोडी आहेसं तिला वाटत नव्हतं. पण नातवाला ती आहे या गोष्टीचा तिला आनंद झाला. ती खुशीनं म्हणली,

''चल आन्दा जरा जुव्यावर जावन येवूंया.''

''मला वल्हवायला देशील-?''

''वलयलस! दुबकी खाशीत... ''

आनंदा काहीच बोलला नाही त्यानं खळ्यातली वल्ही उचलली आणि आजीमागून निघाला. चुकतमाकत आन्दा होडी वल्हवायला शिकला.

आणखी आठ दिवस गेले आणि वैशाख सुरू झाला.वैशाखात तळीचा झरा बारीक व्हायचा. तसा बारीक झाला. पण दोन दिवसात तो एकदमच बारीक झाला. तळीत पाण्याचा साठा होता तो कमीच होत गेला. चार दिवसांसी झऱ्याच्या मुळाशी खड्डा करून गडव्यांनी, करवंट्यांनी पाणी भरणं सुरू झालं. वस्तीच्या तोंडचं पाणीच पळालं.

''औंदा काय ह्या भलतांच. माज्या आठवणीत तर असा कधीच जांवक नाय.'' जीजी पवार म्हणाले. ह्या दहा घरातच नव्हे तर सगळ्या त्या गावातच तो एक जाणता माणूस होता.

''मग यंदाच असं का झालं आजोबा?''

''काय सांगां झिला? बिरामणाचा कोप!''

''हा कोण बिरामण?''

''तळ्येचो रखवालदार. तळीवर वयल्या आंगान गुंडक्ष आसा तो तेचोच''

''त्या रखवालदाराचा कोप व्हायचं कारण?'' कोणीतरी फूलपाकळी वाहिलेला दगड डोळ्यांसमोर आणीत आनंदानं विचारलं,

''दरसाल तेका जेवूंक घालूचो लागता. गेली तीन वर्सा तेची कोणी जागच करूक नाय.''

''आजोबा तो जेवतो?'' आनंदानं हसत विचारलं.

''मुंबैकरा! अशी बिरामाणाची भगल (थट्टा) करू नको. माघाच्या म्हयन्यात भटाक बलवन तेची समादाधनी करूची आसता. चौगुलां काम! कोणी दाद केली नाय म्हणोन तो कोपलो. औंदा काजी रातांब्याकदेकील आर पडली. विचार तुज्या आज्येक.''

''होय आजी?''

''ते म्हणतत तां खरांच!'' आनंदा जरा विचार करीत राहिला. मग म्हणाला,''तळीत झऱ्यालगत खोल खड्डा मारला तर?''

''खारां पाणी भरात! खाली बघ.'' जीजी हसत म्हणाला. त्यांचं म्हणणं खरंच होतं. कुठंही दोन हात खाली



उपासनेच्या विविधांगी उपयोगांची सप्रयोग माहिती देणारे पुस्तक 'उपासनेद्वारा व्याधिमुक्ती' किं. १६ रू. 'ज्ञान प्रबोधिनी' प्रकाशन

खणलं तर खाडीचं खारं पाणी येत होतं. खालची विहीर खाऱ्या मचूळ पाण्यानं भरलेली त्याच पातळीला होती.

''मग आजोबा हे पाणी कुठून येतं?''

''पावसाचा पाणी डोंगारत जिरता. पोरात साठता तेव्हा अशे झरे व्हावतत.'' ते निघत हाते एवढ्यात खेम्याचा बाप बाळू येताना दिसला.

''काय बघतात?'' तो म्हणाला, ''पाणी? कोणीतरी भ्रष्टाचार केल्याशिवाय असां होऊचांच नायं''

आनंदा विचारात पडला. भ्रष्टाचार होऊन किंवा त्याचं देणं दिलं नाही म्हणून कोणी ब्राम्ह्मण कोपला हे काही त्याच्या बुद्धीला पटत नव्हतं. आणखी दोन दिवसांनी झरा आणखी बारीक झाला. त्याच्या तोंडात एखादं पान खुपसलं की सुतळीसारखी धार पडे. त्या आठदहा घरांना दिवसाकाठी पिण्यापुरतं पाणी मिळे. बाकी कामासाठी दत्तू बावकराच्या तळीवर किंवा मांड्यांच्या तळीवर जावं लागे. घागरी वाहून बाया मुलांची दमछाक होऊ लागली.

खाडीच्या काठानं अशीच डोंगरांची रांग होती. आनंदानं बाबाबरोबर वस्ती वस्तीतून फिरताना अशा पाचसहा तळ्या पाहिल्या होत्या. पुन्हा एकदा जाऊन त्या त्या तळ्यांनी डोंगरातून कसं पाणी येतं ते तो पाहून आला. प्रत्येक तळीत वरच्या अंगानं खडकच असायचे आणि दोन खडकांच्या फटीतून पाणी बाहेर पडताना दिसायचं. त्या झऱ्याच्या वरच्या अंगाला खात्रीनं डोंगराच्या दोन कण्यांमधली घळ पार टापेला भिडायला गेलेली दिसे. त्या घळीतली झाडंही अन्य झाडांहून टवटवीत दिसत. कण्यावरच्या रातांबीचं फळ बारीक असे आणि घळीतल्या रातांबीला मोठी फळं यायची.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो अंगणात उभा होता. तेवढ्यात अंजा, बुट्ट्या, रोवळ्या आणि गोख्या यांना घेऊन वर चढली. ''कुठ निघालीस अंज्या?''

''सुसरकोंडीत! तुज्या आज्येचे रातांबे झाडूचे हत. तूच चल..''

''खरंच! आलोच..'' तो म्हणाला आणि आजी पण बाहेर पडली. पाणलोटाच्या जळीतूनच ती वाट होती. साखरांब्याच्या पुढं तो कधी गेला नव्हता. बारकाईनं तो व्हाळीचं निरीक्षण करीत चालला हाता. साखरांबा आत बराचसा उलगला होता. तरी चार सहा आंबे मिळालेच. अगदी माथ्याला जवळ पोचला तर खडकांनी तीन बाजूंनी वेढलेली एक घळ होती. खडकांचा तो एक उभा कडा अर्धवर्तुळाकार झाला होता. पायाखाली बरेच दगड गोटे आणि पुळण साठलेली. चारपाच वांव रूंदीची जागा कोमळ होती. ओवळी (बकुळी), बिबे आणि त्यांतच रातांबीची दोन झाडं चांगली पोसली होती. टपोरे रातांबे होते. आजी म्हणाली,

''आन्दा तू शेंड्याचे रातांबे पाड. अंजा खालचे झाडीत.''

तो शेंड्याला पोचला तर वरचं दूरवर



''पंख सुरांचे'' ही छात्र प्रबोधननिर्मित ध्वनिफीत आवर्जून ऐका, किंमत रू. ४०/-

पसरलेलं कातळ नजरेत भरलं. ते कातळदेखील मध्ये दबलेलं, बाजूनं उंच होत गेलेलं होतं. दोन्ही रातांब्या झाडून तो खाली उतरला. आजीबरोबर तो रातांबे निवडू लागला. त्यानं विचारलं, ''आजी ह्या जागेला सुसर कोंड का म्हणतात.''

''वर बघ..''अर्धचंद्रकार झिजलेल्या मोठ्या खडकाकडे बोट करीत आजी म्हणाली. तिथं पावसात केवढं आणि कसं पाणी पडतं आणि तिथं कशी कोंड होते ते आजीनं सांगितलं.

''हे कोंडीत सुसद ऱ्हवता म्हणान ही सुसद कोंड.'' अंजा म्हणाली.

''ही तरीच! हे रातांबे बघ कसे टकटकीत आहेत. इथं जमिनीत पाणी असणार. तेच आमच्या व्हाळीत आणि तळीत जात असणार..''

''असात बाब. तू शिकलहस. आमी काय शिकूक नाय.'' आजी म्हणाली आणि काम करीत राहिली. तोही घाईघाईनं रातांबे निवडू लागला. त्याचं विचारचक्र चालूच होतं. कण्यावरच्या रातांबीचं फळ आणि या कोंडीतल्या रातांबीची फळ यातला फरक त्याच्या मनात घोळत होता. जरा वेळानं त्याने एकदम विचारलं.

''आपल्या घराखालूनच इकडचं पाणी आपल्या तळीत जात असणार. त्याला वाटेत कुठं तरी अडथळा झाला तर?''

''जमनीखाली जा नि तू सोद कर. अगदी मुंबैकराच तू!'' अंजा मोठ्यानं हसत म्हणाली.

''पाणी जमनीखालून कसा व्हावता ता आमकां कसां कळतलां. ती त्या बिरामणाक नवक.'' आजी म्हणाली,''चल आता टोपले उचल.'' मग भरलेल्या टोपल्या खाली आणायच्या उद्योगात सगळीच गढून गेली.

तो घरी आला तरी त्याला चैन पडत नव्हती. तसाच तो दुपारी बावकराच्या तळीवर आंघोळीला जाताना तळीत उतरून झऱ्याकडे पाहून गेला. एक मोठा खडक, चांगला हत्तीसारखा वर आच्छादनासारखा होता आणि त्याखाली दोन लहान खडक दोन बाजूंनी एकमेकांना टेकले होते.मध्ये खालून वर निमूळती होत गेलेली एक फट होती. त्या फटीतून सुतासारखी एक धार गळत होती. त्यानं एक काठी घेतली आणि त्या फटीत घालून पाहिली. आत थोडी पोकळी असावी असं त्याला वाटलं. तो तसाच आंघोळीला गेला.

जेवणं झाली आणि माणसं जरा लवंडली. रघू कुठंतरी बाहेर गेला. जरा सूर्य कलंडला आणि वाडीतल्या मुलांनी झकाऱ्या आंब्याखाली धाव घेतली. जरा वेळानं तिकडे गोंगाट चालू झाला. ''येर वाऱ्या देसातल्या

पडदे आंब्या घोसातल्या''

अशी वाऱ्याची आळवणी आणि आंबे पडले की झटापट कानांवर येत होती. एरवी तोही गेला असता. झकारा आंबाही तसाच होता. अजूनही त्याचा मोसम संपला नव्हता. फळ बारीक पण



छात्र प्रबोधन मासिकासाठी जाहिराती मिळवून द्या. दर-अर्धे पान रु. ९००/- पूर्ण पान रु. १,५००/-

चवदार. हजारो फळं अद्याप वर लटकत होती. वारा आला की पटापट दहा बारा फळं टपकत आणि ती जिंकून घेण्यासाठी झुंबड उडे.

ओवरीच्या कोपऱ्यात एक पहारीचा बारीक खिळा होता. आजी टोपली घेऊन बाहेर पडली. आईनं भांडी घासायला घेतली आणि आनंदा पहार घेऊन बाहेर पडला. वाडीत कोणाचीच जाग नव्हती. तो सरळ तळीत उतरला. एक दिवड गारव्यातल्या बेडकीला उचलून सळसळत पुढ्यातून गेलं. आनंदानं जरासं अंग काढलं. कळशी भरायला केलेल्या खड्ड्यात उतरला. हळूच पहार झऱ्याच्या फटीत घातली. फट बरीच लांब असावी अर्धी अधिक पहार आत गेली आणि थटली. मग त्यानं जरा अलिकडे ओढून आतल्या पोकळीचा अंदाज घेतला. तर ती फट आतून पुढे रूंद होत गेली होती. पहार बाहेर काढली तर चिखल लगडला होता. पुन्हा पहार जरा इकडे तिकडे



करीत आत सारली तर बरबरीत चिखल जाणवला. पहार मघासारखीच थटली पण तो अडथळा मोठा खडकासारखा

नसावसं त्याला जाणवलं. त्यानं पुन्हा पहार मागं घेऊन जोरात पुढं रेटली. पहार जवळ जवळ तीन हात आत जात होती. तिच्या टोकानं साधारण नारळाएवढा दगड बाजूला झाल्याचं त्याला जाणवलं.

आत काही बरच घसरत कोसळत असल्याचा आवाज त्या फटीतून बाहेर येऊ लागला. तसा प्रथम ते घाबरलाच. त्यानं पहार मागं खेचली आणि चिखलानं भरलेला गढूळ पाण्याचा प्रवाह त्य फटीतून जोरात बाहेर पडला. आता आनंदाची भीती पळाली. हसू फुटलं. एक दोन मिनिटातच घागरी भरण्यासाठी केलेला खड्डा भरून गेला. त्यानं पुन्हा एकदा पहार आत घातली. पुढं तिचं टोक एका मोठ्या खडकाला आपटावं तसा खणखणीत आवाज आला. आत दगड गोटे अजूनही कोसळल्याचा आवाज येत होता. जरा वेळानं तो थांबला. त्यानं पहार बाहेर ओढली आणि पहात राहिला. पाण्याचा पहिला जोर आता कमी झाला होता. साधारण अंगठ्याइवढी निव्वळ पाण्याची धार फटीतून संथपणानं वहात राहिली. खड्ड्यातलं पाणी हळू हळू निवळू लागलं. पाणी आटल्यामुळे सारा तळ हिरवळीनं भरला होता. हिरवळीत पाणी पसरू लागलं तशा तीन लपलेल्या बारीक बेडक्या पिटपिट उड्या मारू लागल्या.

झकाऱ्या आंब्याखाला गोंगाट आता आनंदाच्या कानात भरला. नाही म्हटलं तरी तासभर तो तिथं खटपटत होता. तो घाईघाईनं घरी गेला. पहार कोपऱ्यात ठेवली आणि झकाऱ्याच्या दिशेनं धावला. आपण काय केलं हे तो विसरून गेला.

संध्याकाळी जीजी गुरांना घेऊन सड्यावरून खाली उतरत हाते. लांबूनच त्यांना गुरं तळीत उतरलेली दिसली. जवळ येऊन पहातात तर तळीचा तळ पाऱ्यानं भरलेला दिसला. त्यांचे डोळे विस्फारले. ते मनात म्हणाले,

"ह्या आन्दाचांच कायतरी कौतुक हा! मुंबैकार मोटो जबरो हा!"

रात्रीच्या तोंडाला रघूच्या अंगणात आनंदाच्या कौतुकाला पार नाव्हता. वाडीतले सगळे पुरूष आणि प्रौढ बाया तिथं जमल्या हात्या. आनंदाच्या आईनं सर्वांना चहा करून दिला. मात्र बाळूचं भ्रष्टाचार झाल्यामुळं तळीची शुद्धी करण्याचं टुमणं सुरूच होतं. त्याचं म्हणणं साठ्याचं पाणी होतं ते कधीतरी अचानक बंद होईल. बालू भगतगिरी करायचा. अंगात वारं काढायचा. आपल्याच गावातील चार लोकांना नाचवायचा. काही असलं तरी ह्या मुंबईकरानं त्याच्या भगतगिरीला शह दिला होता.

■■

*– श्री हरिहर आठलेकर*
२९३ सी, भटवाडी,
सावंतवाडी ४१६५१०



बुद्धिमत्ता चाचण्यांसाठी भेटा अथवा लिहा - प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

# मुलांचे पान

## वनवासी तरूणाचे मनोगत

मी अर्जुन! जंगलात राहणारा, डोंगरदऱ्यात भाकरीसाठी वणवण फिरणारा वनवासी तरूण! माझे नाते असेल तर ते महाभारतातल्या एकलव्याशी! माझे घर आहे डोंगरदऱ्यात-माती, झाडाच्या फांद्या, पाला यापासून तयार झालेलं. मी, माझी आई व बाबा, दोन शेळ्या एवढे माझे कुटुंब. घरासमोर काहीतरी भाजीपाला, भोपळ्याचे वेल! गावाकडून मोलमजुरी करून आलेला भात संपला की भोपळ्याचे वेल व भाजीपाला उपयोगी पडतो.

रोज पोटाला काय खाणार? याची चिंता मनाला लागलेली असते. कधी काम मिळते, कधी मिळत नाही. रस्त्यावरून जाताना काही उंदरासारखे प्राणी मिळाले तर आल्यावर भाजून खायचे. जाता जाता लाकूड, मधाची पोळी काढणे हे आमचे उद्योग असतात.

जंगलात काय व्यवस्था? सर्दीपडसं आलं तरी आमचा डॉक्टर म्हणजे औषधी रानपाला! नाही तर मरीआईला नवस! शहरातल्यासारखे डॉक्टर नाहीत. मुलांच्या शिक्षणाची सोय नाही आणि शिक्षण नसल्यामुळे इथली माणसं सगळं देवावर सोपवून बसतात. अंधश्रद्धा तर येथे खूपच. माझ्यासारखी काही मुले आश्रमशाळेत शिकलेली! ती सुधारणा करायला बघतात पण त्यांचा संबंध शहराशी! आता समाजसेवेच्या काही संस्था आमच्या क्षेत्रात काम करू लागल्या आहेत आणि आम्ही तयार



केलेल्या वस्तू ते बाजारपेठात नेऊन विकतात. त्यांना तर आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळाली आहे. आमच्या हस्तकलेला प्रोत्साहन मिळाले आहे. त्यामुळे आता अलीकडे थोडा पैसा मिळतो.

आम्ही रानावनात निसर्गाच्या सहवासात राहणारी मुले. आम्हाला मेहनतीची सवय. त्यामुळे आम्ही कणखर व काटक! त्यामुळे आमचा उपयोग क्रीडा क्षेत्रात करून घेतला जातो. आमच्यातल्याच एका वनवासी तरूणाने तीरकमठा नेमबाजीत राष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिले. आम्हाला जर अन्य खेळातही तरबेज केले तर आम्ही भारताला अजिंक्यपद मिळवून देऊ.

आम्हाला वाटतं आपण शिकावं, मोठं व्हावं. नीटनेटकं रहावं. पण शहरातल्यासारखा गोंधळ नको. निसर्गाच्या सान्निध्यात भूमिपुत्र, रानची पाखरं म्हणूनच आम्हाला प्रगती



आधुनिक काळात अर्थपूर्ण संस्कार होण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रकाशित पोथ्या वापरा.

साधायची आहे. त्यासाठी आम्हाला सरकार मदत करेल. पण सरकारनेही इतकी मदत करायला नको की आम्ही ऐतखाऊ होऊ.

■■

**कु. मंजुश्री जयवंत माळी**
८ वी क
('झेप' हस्तलिखित पटवर्धन हायस्कूल, सांगली)

## भरारी
## दिलिप कोकरे यांची मुलाखत

**''धडपड करत राहणं महत्त्वाचं. मिळालेल्या यशानं हुरळून न जाता पुढं जाण्यासाठी हुरूप आला पाहिजे.'' दिलिप सि. कोकरे**

''नमस्कार दिलिपराव, आमच्या शाळेतील मुलांना तुमच्या कर्तृत्वाची थोडी ओळख व्हावी म्हणून आज तुमची व मुलाखत घ्यायला आम्ही आलो आहेत,'' ***''सध्या तुम्ही अनेक व्यवसायात मग्न आहात. तर याची सुरुवात केव्हा झाली? कशी झाली?''***

''त्यासाठी जवळ जवळ बारा वर्षे मागं जायला हवं. S.S.C. झाल्यानंतर मी I.T.I. मध्ये मोल्डरचा कोर्स पूर्ण केला.''

''त्यानंतर आपल्याला नोकरी लागली का?''

''लागली, पण त्याचा मी घेतलेल्या शिक्षणाशी काही संबंध नव्हता. मालेगाव कारखान्यात मी टेम्पररी अटेंडंट म्हणून लागलो पण पगार अगदीच अपुरा होता.''

***''तुम्ही सुरुवातीला गोबरगॅस टाक्यांची दुरूस्तीची कामे करीत होता असं ऐकलं. तिकडे कसं वळलात?''***

''आपल्या गावातील फॅब्रिकेशन शॉप मध्ये मी वेल्डींगचं काम करायला शिकलो. तिथं गोबरगॅसच्या टाक्या दुरूस्तीला यायच्या. त्यातून डोक्यात कल्पना आली की या टाक्यांच्या सर्व्हिसिंगचं काम आपण करावं. माझ्या एक दोन मित्रांना घेऊन सायकलवर वस्त्या-वस्त्यात जाऊन सर्व्हिसिंगची कामे करावीत अशी इच्छा मनात आली व मी ती पार पाडली. पण त्यातही पुरेसे पैसे मिळत नसत. हिंडण्यासाठी वेळ जायचा आणि काम मिळेल याची खात्री नसायची.''

***''मग तुम्ही क्रेन विक्रीच्या व्यवसायात कसे आलात?''***

''अशाच एका वस्तीवर पूर्वी ठरल्याप्रमाणे टाकी दुरूस्ती करायला आम्ही तिघे-चौघे गेलो; पण आयत्या वेळेला टाकी दुरूस्त करायची नाही असे मालकानं सांगितलं. मी फार वैतागलो, निराशही झालो.''

''तिथंच एका झाडाखाली आडवा झालो. तिथं क्रेनच्या साहाय्यानं विहिरीचा गाळ काढण्याचं काम चालू होतं. तिथंच ठरवलं की आपण क्रेन विकत घेऊन गाळ काढण्याचा धंदा सुरू करूया.''

***''पैशाची काय व्यवस्था केली?''***

''घरची म्हैस विकली आणि बँकेकडून लोन काढले. हा धंदा दगदगीचा होता पण शेतकऱ्याला त्याची


रु. २५०/-देणगी देऊन वाढदिवसानिमित्त आपल्या नावाने छात्र प्रबोधनमधील एक पान प्रायोजित करा.

गरज होती. त्यात चार पैसे मिळायला लागले.मिळालेल्या पैशावर दुसरी क्रेन घेतली. दोन्ही क्रेनावर धंदा सुरू केला.''

***''आपण क्रेन विक्रीचा धंदा कसा काय सुरू केला?''***

''दुसरी क्रेन घेताना सर्व पैसे जवळ नव्हते. विनंती करून उधारीवर दुसरी क्रेन घेतली आणि ठरलेल्या वेळेपूर्वीच मी कंपनीची सर्व उधारी फेडली.

कंपनीचा माझ्यावर विश्वास बसला. त्यांनी माझी धडपड पाहिली आणि स्वत:हून एजन्सी घेणार का? अशी विचारणा केली. मी हे आव्हान स्वीकारले. सन १९८६ मध्ये मला एजन्सी मिळाली आणि वर्षभरात मला ठरवून दिल्यापेक्षा जास्तच क्रेन्स मी विकल्या.''

***''आपल्या घरापुढे २ टेम्पोही दिसतात. हा टेम्पोचा व्यवसाय कसा काय सुरू केला?''***

तो व्यवसाय तसा पूर्वनियोजित नव्हता. वाडी वस्त्यात मला माझ्या गाळ काढायच्या 'क्रेन्स' न्याव्या लागत. ही वाहतुकीची व्यवस्था वेळेवर न झाल्याने माझे दोन दिवस धंद्याशिवाय जायचे. गिऱ्हाईक जायचे. गड्यांचा पगार अंगावर पडायचा. ही गैरसोय टाळण्यासाठी मी टेम्पो विकत घेण्याचं ठरविलं.ह्याच सुमारास माझ्या धाकट्या भावाचं हायस्कूलचं शिक्षण संपलं होतं. तेव्हा त्यामुळे मला क्रेन वाहतुकीसाठी हक्काचं घरचं वाहन मिळालं. भावासही धंद्यासाठी नवीन टेम्पो मिळाला. क्रेन वाहतुकीखेरीज तो बाकी दिवस त्याचा धंदा करतो.''

***''तुमच्या हिरा एक्स्प्लोजिव्हजबद्दल काही सांगा?''***

''तोही धंदा माझ्या गरजेतूनच सुरू झाला. म्हणजे असं व्हायचं की गाळ काढण्यासाठी माझी क्रेन विहिरीजवळ ३-३ दिवस बिनकामाची राहायची. कारण सुरूंगासाठी लागणारे डायनामाईट शेतकऱ्यांस मिळालेले नसायचे. क्रेनच्या भाड्यावरून आमच्यात व शेतकऱ्यात वाद व्हायला लागले. तेव्हा डायनामाईट (सुरूंगाची दारू) आपण शेतकऱ्यांना वेळेवर पुरवू शकलो तर क्रेनचा धंदा अडचणीत येणार नाही हे माझ्या लक्षात आलं. मग त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. सतत तीन वर्ष पुणे आणि मुंबई येथे सारखे खेटे घातले. लोकप्रतिनिधींच्या, बँक अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या. कागदपत्रं सादर केली आणि अखेर ९४ जुलै मध्ये मला हा परवाना मिळाला. त्यानंतर गावाबाहेर जागा घेऊन त्यावर गोडाऊन बांधून डिसें. ९४ ला (HIRA EXPLOSIVE) ही फर्म सुरू केली. यातुनच मग कॉम्प्रेसर बसविला आहे. आता या धंद्यात मी पूर्णपणे स्वावलंबी झालो आहे.''

।। निर्वाहः प्रतिपन्न वस्तुषु ।।

■■

---

**मनोज कदम १० वी,**
**संग्राम कोहिते ९ वी**
'बहार' हस्तलिखित नवमहाराष्ट्र विद्यालय
पणदरे, ता. बारामती, जि. पुणे.



विविध रोगांवर गुणकारी 'प्रबोधन सूक्ष्मौषधि' वापरा. संपर्क 'आयुर्वेद संशोधिका', ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

# तृष्णानाश

– माधवी कोल्हटकर



एका गावात एक अतिशय दयाळू आणि उदार माणूस रहात होता. त्याच्या स्वभावामुळे तो गावात अतिशय लोकप्रिय होता. एकदा त्या गावात एक प्रसिद्ध लामा म्हणजे तिबेटी बौद्ध धर्मगुरू आले. त्या दयाळू माणसाने त्या लामांची भेट घेतली आणि त्यांना साष्टांग दंडवत घालून तो म्हणाला, ''महाराज मला मान आणि मुक्ती मिळवून जास्तीत जास्त लोकांच्या उपयोगी पडायची इच्छा आहे. माझं आयुष्य मला बुद्धाच्या शिकवणीचा प्रसार करण्यासाठी व्यतीत करायचं आहे, कृपा करून मला मार्ग दाखवावा.''

त्या माणसाच्या प्रार्थनेतली कळकळ जाणवून त्या लामांनी त्याला लोकांपासून दूर एकांतात जावून मनन-चिंतन करायला सांगितले. त्यांनी त्याला एक खास मंत्र दिला आणि सांगितले की, 'तू जर याचा सतत भक्तिपूर्वी जप केलास तर तुला नक्की मुक्ती मिळेल आणि इतरांची सेवा करता येईल.'

त्या लामांनी सांगितल्याप्रमाणे तो माणूस गावाशेजारच्या एका पर्वतातल्या गुहेत जाऊन त्या मंत्राचा जप करायला लागला. कितीतरी काळ तपश्चर्या करून सुद्धा त्यांना साक्षात्कार काही होईना. वीस वर्षांनी ते लामा परत त्या गावात

आले. त्या दयाळू माणसाने ते ऐकले आणि तो त्यांना भेटायला गेला.

लामांना भेटायला, त्यांचे आशीर्वाद घ्यायला खूपच गर्दी झाली होती. शेवटी एकदाची त्या दयाळू माणसाची पाळी आली. लामांना त्रिवार दंडवत घालून आणि आपल्या आदराचे प्रतीक म्हणून लांब पांढरे उपरणे अर्पण करून तो माणूस म्हणाला, ''महाराज गेली वीस वर्षं मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे ध्यानधारणा करतो आहे. पण काही उपयोग नाही. साक्षात्काराची कुठे काही आशाही दिसत नाही. माझंच काही चुकतंय की काय?''

लामांनी गंभीरपणे विचारले, 'मी तुला काय करायला सांगितले होते?'

वीस वर्षे आपण काय काय केले, ते सारे त्या माणसाने लामांना सांगितले त्यावर लामा म्हणाले, ''अरे! मी तर तुला अगदीच चुकीचे सांगितले. यानं तर तुला कधीच साक्षात्कार होणार नाही.''

तो माणूस खचलाच! काकुळतीने त्याने लामांच्या पायावर लोळण घेतली आणि तो रडायला लागला.

''माफ कर. पण यापेक्षा जास्त मी काहीही करू शकत नाही.'' लामा त्याला शांतपणे म्हणाले.

त्या माणसाला तर आपले आयुष्य वाया गेल्यासारखे वाटायला लागले. निराशेने तो आपल्या गुहेत परतला. गुहेतल्या दगडी कट्ट्यावर ता मांडी घालून बसला. इतकी वर्षे हा कट्टाच त्याची गादी होती; तीच उशी आणि तेच त्याचे टेबलही होते. त्याच्या मनात निराशा दाटून आली होती. ''काय करावं बरं आता? इतके दिवस मला वाटत होतं की मला कधीतरी बोधी प्राप्त होईल, पण आता तीही आशा नाही. जाऊ दे! पण आपली साधना मात्र चालूच ठेवावी, नाहीतरी आता आपण दुसरं काय करणार!''

त्यामुळे त्यानंतर बोधीची कोणतीही अपेक्षा न ठेवता त्याने आपली प्रार्थना आणि साधना चालू केली आणि तत्क्षणी त्याला बोधी प्राप्त झाली, जगाचे सत्य स्वरूप स्पष्ट झाले. आणि त्याचवेळी त्याच्या हेही लक्षात आले की बोधी प्राप्त करून घेण्याविषयीच्या त्याच्या आसक्तीमुळेच त्याला इतके दिवस बोधी प्राप्त होत नव्हती. त्याने गुहा सोडून बाहेर पडायचे आणि बुद्धाच्या शिकवणूकीचा प्रसार करायचा ठरवले. आता तो त्याच्या करूणेच्या आणि बोधीच्या साहाय्याने सर्व भूतमात्रांची सेवा करू शकणार होता.

गुहेतून बाहेर पडून त्याने खालच्या खेड्याकडे नजर टाकली, पूर्वी कितीतरी वेळा त्याने ते खेडे पाहिले होते, पण आज तेच खेडे त्याला इतके वेगळे दिसत होते! क्षणभर त्याला भास झाला की कुठूनतरी लामांच्या अस्पष्ट हसण्याचा आवाज ऐकू येतो आहे. त्याने आकाशाकडे पाहिले तर बर्फाच्छादित शिखरांवर इंद्रधनुष्य विलसत होते.

■■

**माधवी कोल्हटकर**
८८५/३ धारे क्वार्टर्स, भांडारकर रोड, पुणे

**(मूळ तिबेटी लोककथा)**



धडपडणाऱ्या मुलामुलींना देते संधी छात्र प्रबोधन! शक्ती, युक्ती, बुद्धी मिळते वाचून त्यातील विचारधन!

# दरवाजाचे गूढ

– विजय तरवडे

नव्या नोकरीच्या निमित्ताने नंदकुमार या गावात प्रथमच येत होता. नंदकुमार वय वर्षे एकोणीस. पदवीधर झाला. एका बँकेची जाहिरात वाचून त्याने अर्ज केला. परीक्षा, मुलाखत, निवड, क्ष गावी रूजू होण्याचा आदेश. मात्र –

नंदकुमारजवळ इथल्या सरदारांच्या नावे त्याच्या मित्राने दिलेली चिठ्ठी होती.

या गावात सरदारांची जुनी गढी होती. त्यांनी तळमजल्यावरील काही खोल्यांचं होस्टेलमध्ये रूपांतर केलं होतं. शिवाय सौ. सरदारीणबाई उर्फ शैलाताई उत्तम स्वयंपाक करीत. त्यांच्या हातचं जेवण होस्टेलवासियांना आवडत असे. नंदकुमारचा मित्र चार वर्षापूर्वी अन्य काही कामासाठी आला तेव्हा याच होस्टेलमध्ये राहिला होता.

स्टेशनमधून बाहेर पडल्यावर नंदकुमार उर्फ नंदूने सरदारांच्या गढीची चौकशी केली.

‘‘गढी गावाच्या टोकाला आहे. अगदी शेवटी. त्या ठिकाणी गावाची हद्द संपते. पाठीमागे माळरान आहे. माळरान संपतं तिथं टेकड्यांची रांग सुरू होते. टेकड्यांच्या पलीकडे जंगल आहे.’’

समोरच्या माणसाने सांगितलेला पत्ता नंदूने नीट समजावून घेतला नि तो त्या दिशेने हातातली बॅग सावरीत निघाला.

संध्याकाळचे सात वाजून गेले. नंदूला भूक देखील लागली होती. अर्ध्या तासात तो हाशहुश करीत गढीजवळ पोचला. लोखंडी फाटकावरच घंटा होती. त्याने ती वाजवली.

वरच्या मजल्यावरच्या एका खिडकीतून एक तरूणी बाहेर डोकावून विचारती झाली, ‘‘कोण आहे? काय हवंय?’’

‘‘मी या गावात नवीनच आलोय. एक शिफारस पत्र घेऊन होस्टेलमध्ये जागा..’’

‘‘थांबा. मी आलेच’’

पण ती तरूणी खाली येण्यापूर्वीच अचानक वीज गेली.

गर्द काळोख पसरला.

आज अमावस्या. त्यामुळ आभाळ–देखील अंधार ओकत होतं. पण काही क्षण गेले अन् हातात एक पेटलेली विजेरी घेऊन ती तरूणी आली. तिनं फाटक उघडलं. नंदूला आत घेतलं. फाटक बंद केलं नि म्हणाली. ‘‘मी मृदुला. सरदारसाहेबांची एकुलती एक मुलगी. माझ्या मागोमाग हळूहळू या.’’ नंदूने त्याप्रमाणे केले.

नंतर ते दोघे प्रथम एका प्रशस्त दालनात गेले. तिथे नंदूने बॅग ठेवली. अन् दोघे पलीकडच्या दारातून बाहेर पडले. गढीची मागची बाजू भलं मोठं आवार. त्याला तारेचं कुंपण! कुपणाच्या कडेनं बाहेरच्या बाजूला झाडं. कुंपणाला एक दरवाजा.

दरवाजा सताड उघडा होता. समोर विस्तीर्ण माळरान आणि दूर क्षितिजावर

टेकड्यांची रांग असेल, पण अंधारात काही दिसत नव्हतं.

आवारात एक टीपॉय. त्याभोवती चार आरामखुर्च्या. मृदुला म्हणाली,''तुम्ही इथं आरामखुर्चीत बसा. ही विजेरी तुमच्यापाशी राहू देत. मी चटकन तुमच्यासाठी काहीतरी घेऊन येते.''

अन् ती अंधारात दिसेनाशी झाली.

आरामखुर्चीत बसल्याबसल्या नंदूने ती विजेरी उघड्या दरवाजाकडे वळवली. समोर विस्तीर्ण दूरवर पसरलेलं माळरान. एकही झाड नाही. आकाश आणि माळरानाची क्षितिजावरची काळी कड एकमेकांत विरून गेलेली. दहा मिनिटांनी मृदुला हातात खाद्यपदार्थ, पाण्याचे ग्लास असलेला ट्रे घेऊन आली.

''माफ करा हं. प्रथम तुम्ही आलात नि अचानक वीज गेली. त्यामुळं मी तुमचं नीट स्वागत करू शकले नाही. तुम्ही प्रवासात दमला असाल. संकोच न करता हवं ते घ्या.''



''धन्यवाद. मला चांगली भूक लागलीय. पण माझं मूळ काम होस्टेलमध्ये जागा-''

''तुम्ही खायला सुरुवात करा, मी सांगते'' नंदू समोरच्या खाद्यपदार्थांवर तुटून पडला. मृदुला बोलू लागली...

''तुमचा मित्र चार वर्षांपूर्वी इथं येऊन गेलाय नं? त्याला नंतर इथं काय झालंय त्याची कल्पना नसावी.

या गढीत या क्षणी फक्त तीनच माणसं आहेत. माझी आई उर्फ शैलाताई, तुम्ही आणि मी. होस्टेलच्या सर्व खोल्यांना कुलूपं आहेत. कारण...''

...तीन वर्षांपूर्वी इथं एक दुर्दैवी घटना घडली.

मला चांगलं आठवतंय - तो अमावस्येचा दिवस होता. सरदारसाहेब म्हणजे माझे बाबा, त्यांना अचानक शिकारीला जायची लहर आली. त्यांनी जीनचा पोषाख चढवला, आपली बंदूक भरली.

आई तेव्हा वामकुक्षी घेत होती. मी पुस्तक वाचत बसले होते.

बाबा म्हणाले,''मी जरा जंगलात रपेट मारून येतो. फार दिवस शिकारीला गेलो नाही. एखादं हरीण पकडण्याचा बेत आहे.''

आई म्हणाली, ''पण आज नका नं जाऊ. आज अमावस्या आहे. तुम्ही जंगलात एकटेच जाणार.''

 *नवलाचे ते दृश्य पाहता वेध लागला चित्ता, चाहुल नसता एकाएकी प्राप्त होय तन्मयता.*

'प्रज्ञाबोध मालिका' रु. १००/- (NTS परिक्षेसाठी) शालेय प्रवणता कसोटी प्रश्नसंच, इंग्रजी-मराठी माध्यमांमध्ये छात्र प्रबोधन प्रकाशन

‘‘तू फारच अंधश्रद्धाळू आहेस. मला हे जंगल बालपणापासून परिचित आहे.’’

आईबाबांचा खूप वाद झाला. शेवटी हट्टानं; बाबा गेलेच.

अन् त्यानंतर ते कधीच परतले नाहीत. त्या दिवशी तर आम्ही खूप वाट पाहिली. रात्रभर उपाशी अन् जागे होतो. सकाळी पोलिसांना कळविलं. आठ दिवस पोलिसांनी जंगलभर शोध घेतला, पण बाबा, त्यांचा घोडा, बंदूक काहीकाही मिळालं नाही.

आमच्यावर आकाशच कोसळलं. झाल्या घटनेचा आईला धक्का बसला. तिच्या मनावर परिणाम झाला. तशी ती एरवी नॉर्मल असते. पण अमावस्येचा दिवस उजाडला की विचित्र वागू लागते. सकाळपासून अस्वस्थ असते. दुपारी ती हे मागचं सारं उघडून ठेवते. मग स्वयंपाकाच्या तयारीला लागते. पुन्हा पुन्हा मला बजावते, की बघ. दुपारीच तुझे बाबा शिकारीला गेले आहेत, हरणाची शिकार करून नक्की येतील. ते आले की आपण जेवायला बसू. मग आम्ही दोघी इथं रात्रभर बसून राहतो. जेवण तयार असतं. पण उपाशी राहतो. दुसऱ्या दिवशी सकाळी आई पूर्ववत हाते. तिला आदल्या रात्रीचं काही स्मरत नाही . काहीही नाही.

बाबा गेल्यानंतर वाड्याला उतरती कळा लागली. आईच्या वागण्याला कंटाळून इथले पेईंग गेस्ट सोडून गेले. काहीजण चिकाटीने थांबले होते. पण त्यांना अमावास्येच्या रात्री या माळरानावरून घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येत. घोडा खिंकाळण्याचा आवाज. प्रत्यक्ष काहीच दिसत नसे. त्यामुळे भिऊन सर्वजण सोडून गेले.फक्त आम्ही दोघी व एक विश्वासू मोलकरीण इथं उरली. पण ती मोलकरीण अमावस्येच्या दिवशी वाड्यात न थांबता गावात मुक्काम करते.’’

मृदुलाचं बोलण संपेतो हातात एक कंदील घेऊन शैलाताई आल्या.

‘‘मृदुला पाहुणा आलाय नं कोणी? त्याचं स्वागत केलंस?’’

‘‘हो, त्याला थोडंसं खायला दिलं. खूप भुकेला होता.’’

शैलाताई, तिसऱ्या खुर्चीवर येऊन बसल्या, हातातला कंदील त्यांनी जमिनीवर ठेवला, कारण टीपॉयवर जागा नव्हती. मग नंदूकडे पाहात त्या म्हणाल्या, ‘‘गैरसमज करून नकोस. मी साऱ्या स्वयंपाकाची सज्जता केली आहे. आज दुपारीच मृदुलाचे बाबा शिकारीला–’’

आणि मृदुलाने म्हटले त्याप्रमाणे शैलाताई सगळं सांगत बसल्या. अंधारात नंदूला त्यांचा चेहरा दिसत नव्हता.

नंदू मनातून अतिशय भ्याला होता. आणि तेवढ्यात त्याच्या कानांनी एक सूक्ष्म लयदार आवाज टिपला.

त्याचं काळीज भीतीने थरारून उठलं. तो लयदार आवाज अगदी संथ गतीनं मोठा–मोठा होत होता.

शैलाताईंची बडबड चालू होती. मृदुला स्वस्थपणे मागे रेलून बसली होती. बघता बघता तो आवाज खूप



प्रज्ञाबोध-४ व ५ (मानसिक क्षमता कसोट्यांसाठी MTS,NTS, MPS साठी उपयुक्त पुस्तक.) छात्र प्रबोधन प्रकाशन,किं. १००/-

जवळ आला. माळरानाच्या दिशेने धुळीचा लोट उसळून या दिशेला आला. थरथरत्या हातानं नंदूनं टीपॉयवरची विजेरी उचलून मनगटावरचं घड्याळ पाहिलं. रात्रीचे ११ वाजून पंचावन्न मिनिटे आणि तेवढ्यात एक घनगंभीर आवाज आला, ''शैला! मृदुला! काय करताय? वीज गेली वाटतं?''

नंदूने पाहिलं उघड्या दरवाजातून एक घोडेस्वार – एक जोरदार किंचाळी फोडून नंदू मागच्या मागे कोसळला.



घोड्यावरून ती आकृती खाली उतरली. तिने हातातली बंदूक टाकली. दुसऱ्या हातानं कपाळावरचा घाम पुसत शैलाकडे पाहून गर्जना केली अन् म्हटले, ''कोण आहे हा मुलगा?''

खळखळून हसत मृदुला म्हणाली, ''बाबा मी सांगते. थोड्या वेळापूर्वी हा होस्टेलची चौकशी करायला आला. गावात नवीन आहे. तो आला नि त्याच वेळी वीज गेली. नेमकी आज अमावस्या, मला वाटलं, जरा त्याची फिरकी घ्यावी. म्हणून मी त्याला काय थाप मारली, की... ''

आणि मृदुलानं सगळी हकीकत सांगितली. सगळं ऐकून आईबाबा हसले. सरदार म्हणाले, ''मृदुला, एखाद्याची अशी थट्टा करून घाबरवणं ठीक नाही. आता त्याला आत न्या, वीज आली की मग डॉक्टरांना बोलवून घ्या. त्याला सगळं सांगून धीर द्या. शैला जेवणाची तयारी केलीस काय? ''

''हो तर! आपण जेवायला बसू. नंदूचं जेवण झालेलं आहे.'' तेवढ्यात वीज आली. सर्वत्र प्रकाश पसरला. मृदुला डॉक्टरांना फोन करायला गेली. सरदार आणि शैलाताई नंदूच्या तोंडावर पाणी मारून त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करू लागले.

■■

**स्वैर अनुवाद – विजय तरवडे**
२७६ सोमवार पेठ, पुणे १२

**मूळ कथा 'ओ हेन्री' ट्रॅपेड**



काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन 'प्रबोधन' चे मिळतो हा विश्वास!

# पाणी हेच जीवन

*– राजेंद्र आवटे*

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या भौतिक गरजा आहेत, असे आपण भूगोलाच्या पुस्तकात शिकतो. थोडा खोलात शिरून विचार केला तर असे आढळून येईल की या तीनही गोष्टी अस्तित्वात येण्यासाठी एका गोष्टीची नितांत आवश्यकता आहे. ती म्हणजे पाणी. अन्नातील कोणतीही गोष्ट तयार होण्यासाठी पाणी आवश्यक असते. मग ते अन्नधान्य असो, भाज्या असोत, की फळे, अंडी, मांस.... वगैरे काहीही. त्याचप्रमाणे वस्त्र तयार होण्यासाठी पाणी हा आवश्यक घटक आहे. कारण कोणतेही वस्त्र वनस्पतीच्या धाग्यांपासून (उदा. कापूस, ताग...इ.) किंवा प्राण्यांच्या चामड्यांपासूनच बनते आणि या दोन्ही सजीवांना जगण्यसाठी पाणी गरजेचे आहे. वरील दोन्हीप्रमाणेच निवाऱ्यासाठी लागणारे मूळ घटक (लाकूड, सिमेंट, स्टील) पाण्यावरच अवलंबून असतात. थोडक्यात काय तर जगण्यासाठी पाणी ही सर्व सजीवांची एक मूलभूत गरज आहे. त्याचबरोबर वरील गरजांना पर्यायी काहीतरी असू शकते. मात्र पाण्याला पर्याय नाही. ($H_2O$) अशी रासायनिक संरचना असलेल्या पाणी या घटकाला पर्याय नाही, पाण्याऐवजी फक्त तेल पिऊन आपण जगू शकू का? अजिबात नाही. म्हणूनच पाण्याला'जीवन' असेही म्हणतात.

अशा या पाण्याची पृथ्वीतलावरील सर्व सजीवांना गरज आहे. टुंड्रा प्रदेशापासून ते सहारा, थर वळवंटात राहणाऱ्या, वेगवेगळे आहार घेणाऱ्या, वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या सगळ्याच माणसांची पाण्याची गरज मात्र सारखीच आहे. अर्थात जगात आणि भारत देशातही पाण्याची परिस्थिती काहीही असली तरी या लेखापुरता आपला विषय आहे.

**'महाराष्ट्राचा पाणीप्रश्न'**

महाराष्ट्रातील पाणीसमस्या नेमकी काय आहे? कशामुळे आहे? ती सोडविण्यासाठी काय काय प्रयत्न केले जातात? काय करता येणे शक्य आहे? या प्रश्नांची माहिती घेण्याचा, उत्तरे शोधण्याचा या लेखात आपण प्रयत्न करणार आहोत.

***कमी जास्त पाऊस***

समुद्राच्या पाण्याची वाफ होते, वाफेपासून ढग तयार होतात, हे बाष्पयुक्त ढग समुद्रावरून जमिनीकडे वाहतात आणि त्यापासून पाऊस पडतो. पावसाचे पाणी जमिनीत मुरते, तसेच नद्यानाल्यांतून पुन्हा समुद्राला जाऊन मिळते. हे जलचक्र तुम्ही यापूर्वीच्या इयत्तातच शिकला आहात. परंतू हा पाऊस जमिनीवर सर्वत्र सारख्याच प्रमाणात पडत नाही, ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करायचा झाला तर कोकणात खूप पाऊस पडतो, प.



कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी 'कल्पक बनू या' अवश्य वाचा ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

| विभाग पर्जन्यमान (वार्षिक) | कोकण | प.महाराष्ट्र (अवर्षणग्रस्त क्षेत्र) | मराठवाडा | विदर्भ |
|---|---|---|---|---|
| (सरासरी मि.मि.) | ३५०० | ६०० | ९०० | १५०० |

महाराष्ट्रातील काही भागात अत्यंत कमी पाऊस पडतो. मराठवाडा आणि विदर्भात साधारण पाऊस पडतो. खूप, अत्यंत कमी आणि साधारण हे शब्द समजण्यासाठी वर दिलेला तक्ता पहा.

वेगवेगळ्या भागात पावसाची कमी जास्त उपलब्धता हे महाराष्ट्रातील पाणीसमस्येचे एक नैसर्गिक कारण आहे. अर्थात तुम्हाला पश्न पडेल पाऊस असा का वागतो? कोकणावर कृपादृष्टी आणि बिचाऱ्या नगर-सोलापूर या अवर्षणग्रस्त जिल्ह्यांवर राग का? तर याचे महत्त्वाचे कारण आहे महाराष्ट्राची भौगोलिक रचना. अरबी समुद्रातून येणारे बाष्पयुक्त ढग सह्याद्री पर्वतामुळे अडविले जातात. त्यामुळे कोकण आणि घाटमाथ्यावर खूप पाऊस पडतो. प. महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त प्रदेश पर्जन्यछायेचा असल्याने तेथे अत्यंत कमी पाऊस पडतो. मराठवाडा आणि विदर्भात अरबी समुद्राबरोबरच बंगालच्या उपसागरातून आलेल्या ढगांमुळे थोडा जास्तीचा पाऊस पडतो.

पडणाऱ्या पावसाचे काही पाणी जमिनीत मुरते. ते पाणी विहिरी, कूपनलिका खणून भूजलाच्या रूपाने वापरता येते. काही पाणी बाष्पीभावनामुळे हवेत उडून जाते आणि उरलेले सर्व पाणी ओढे, नाले, नद्या यामार्फत वाहून समुद्राला मिळते.

आपण वरील तक्त्यामध्ये पाहिल्या प्रमाणे महाराष्ट्रातील चार वेगवेगळ्या विभागात कमी जास्त पाऊस पडतो. पण त्यावरून तुम्हाला वाटेल जेथे भरपूर पाऊस पडतो त्या कोकणात आणि साधारण पावसाच्या विदर्भ मराठवाड्यात पाण्याची समस्या नसणारच! पण तसे नाही. थोड्याफार फरकाने या चारही विभागात पाण्याची समस्या सारख्याच प्रमाणात आहे. थोडे आकडेवारीच्या भाषेत सांगायचे तर १९७२ सालच्या दुष्काळात महाराष्ट्रातील ४३ हजार गावांपैकी सुमारे ३० हजार गावे टंचाईग्रस्त होती. या टंचाईग्रस्त गावांत चारही विभागातील गावांचा समावेश होता.

***पाणी समस्या नक्की काय?***

अर्थात एवढं सगळं वाचूनही हे 'टंचाईग्रस्त गाव', 'पाण्याची समस्या' म्हणजे नक्की काय असा प्रश्न तुम्हाला पडला असणार. पावसाळ्यात ,एवढा धो धो पाऊस पडता, प्रवासाला जाताना अनेक नद्या दुथडी भरून वाहताना दिसतात असं असताना पाण्याची समस्या कशा काय असते? त्यासाठी प्रथम गरज कशासाठी असते हे समजावून घेऊ.

*पाण्याची आवश्यकता!*

पिण्यासांठी, रोजच्या वापरासाठी, त्यानंतर शेतीसाठी पाणी आवश्यक असते. त्याखालोखाल प्राधान्य दिले जाते उद्योग आणि ऊर्जानिमिर्तीसाठी लागणाऱ्या पाण्याला. पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे आकारमान फार थोडे असते आणि शेतीसाठी सर्वात जास्त पाणी वापरले जाते. एका उदाहरणाच्या साहाय्याने हे समजावून घेऊ. समजा महाराष्ट्र राज्यात (ग्रामीण + शहरी भागात) वर्षाला १०० लि. पाणी वापरले जाते. तर या पाण्यापैकी फक्त २ ते ३ लि. पाणीच पिण्यासाठी लागते. शेतीसाठी मात्र सुमारे ८० लि. पाणी खर्ची पडते. उरलेले पाणी उद्योग, ऊर्जा आणि इतर कारणांसाठी दिले जाते.

वरील आकडेवारी आणि पाण्याची गरज तुमच्या लक्षात आली असेल तर 'महाराष्ट्राची पाणी समस्या' अगदी थोडक्यात खालीलप्रमाणे मांडता येईल.

(१) सरासरी वार्षिक पाऊसमानात थोडाफार फरक पडला तर महाराष्ट्रातील ४३ हजार खेडेगावांपैकी निम्म्याहून जास्त गावात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा निर्माण होते. स्वच्छ आणि शुद्ध पाणी वर्षभर (विशेषत: उन्हाळ्यात) मिळत नाही.

(२) महाराष्ट्रातील एकूण शेतजमिनीच्या फक्त १५ टक्के जमिनीवरच विहीर किंवा कालव्याचे पाणी देऊन बागायती पीक घेता येते. उरलेली ८५ टक्के जमीन केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. महाराष्ट्रातील शेतकरी वर्षानुवर्षे गरीब आणि दरिद्री असण्याचे हेच प्रमुख कारण आहे.

*मोठे धरण प्रकल्प*

यावरून तुम्हाला पाणीप्रश्न नेमका काय आहे याची थोडीफार कल्पना आली असेल. मग यावर उपाय काय? शंभर दीडशे वर्षापूर्वी इंग्रजांनी यावर एक उपाय शोधला. त्यांच्या लक्षात आले की पश्चिम घाटात खूप पाऊस पडतो आणि वाहून जातो. हा पश्चिम घाट म्हणजे महाबळेश्वर किंवा भिमाशंकरला तुम्ही कधी सहलीला गेला असाल ना, तो प्रदेश! म्हणून मग दोन जवळ आलेल्या टेकड्यांना जोडणारी भिंत (धरण) बांधली तर खूप पाणी साठेल. हे पाणी मग वर्षभर वापरता येईल. या धरणातून कालवा काढून दूरदूरच्या गावांना पाणी नेता येईल. आणि खरोखरच त्यांनी याप्रकारे अनेक धरणे बांधली. पुण्याजवळ बांधलेलं खडकवासला हे त्याच काळातील दगडात बांधलेलं (ग्रॅव्हिटी डॅम) पहिलं धरण होय! या विचारानुसार आपल्या राज्यात आजपर्यंत सुमारे १५०० धरणे बांधण्यात आली. पण या धरणातील पाणी पोहचते फक्त ६ ते ७ हजार गावांपर्यंतच. आणि राज्यातील एकूण गावे आहेत ४३ हजार! त्यामुळे मोठ्या धरणांमुळे महाराष्ट्रातल्या सर्व गावांचा प्रश्न सुटू शकत नाही हे स्पष्ट झाले. मोठी धरणे म्हटली की आपल्या डोळ्यापुढे येतो गुजरात राज्यातील सरदार



आकाशातील ताऱ्यांशी दोस्ती करण्यासाठी वाचा 'छंद आकाश दर्शनाचा' छात्र प्रबोधन प्रकाशन

| कृष्णा खोऱ्यातील पूर्ण झालेले मोठे प्रकल्प | | |
|---|---|---|
| धरणाचे नाव | ठिकाण (तालुका व जिल्हा) | पाणीसाठा/अब्ज घनफूट |
| कोयना | पाटण/सातारा | ७२.४४ |
| खोडशी | कराड/सातारा | १.५० |
| राधानगरी | राधानगरी/कोल्हापूर | ९.४६ |
| तुळशी | राधानगरी/कोल्हापूर | ३.२५ |
| टाटा प्रकल्प | मुळशी/पुणे | ४५.०० |
| घोड | शिरुर/पुणे | ७.०७ |
| निरा कालवे | भोर/पुणे | ४६.२८ |
| पवना | मावळ/पुणे | १०.२० |

सरोवर धरण प्रकल्प आणि महाराष्ट्रातील कृष्णा खोरे प्रकल्प. मेधा पाटकर यांनी चालविलेल्या आंदोलनामुळे सरदारसरोवराचे काम सध्या बंद आहे. महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील जिल्ह्यातून वाहणारी कृष्णा नदी आणि तिला येऊन मिळणाऱ्या छोट्या-मोठ्या उपनद्या यांचेवर बांधण्यात येणारे सर्व धरण प्रकल्प म्हणजेच कृष्णा खोरे विकास प्रकल्प. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या चार जिल्ह्यांचे संपूर्ण तर नगर, बीड आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांचे काही क्षेत्र कृष्णा खोऱ्यात येते. कृष्णा खोरे विकास प्रकल्पातील पूर्ण झालेल्या मोठ्या प्रकल्पांची नावे आणि पाणीसाठा वरील तक्त्यात दिला आहे.

***आंतरराज्यपाणी वाटप प्रश्न***

कृष्णा खोरे प्रकल्पाच्या बाबतीत २००० सालाला फार महत्त्व प्राप्त झालेले आहे. याबाबत वृत्तपत्रांतून भरपूर माहिती तुम्ही वाचली असेल. परंती ती माहिती नीट समजण्यासाठी काही पार्श्वभूमी समजावून घेऊ. भारतातील अनेक नद्या वेगवगळ्या राज्यांतून वाहतात तशीच कृष्णा नदी महाराष्ट्र, कर्नाटक, आणि आंध्र प्रदेशातून वाहते. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती मानली गेली आहे. त्यामुळे कृष्णेच्या पाण्यावर तीनही राज्यांचा हक्क आहे. परंतु त्या पाण्याचे तीन राज्यात वाटप कसे करणार? यासाठी १९७६ मध्ये एक आंतरराज्य आयोग (बच्छावात आयोग) नेमला गेला. या आयोगाने विविध प्रकारे अभ्यास करून प्रत्येक राज्याला आपला वाटा ठरवून दिला. आपल्या वाट्याचे पाणी प्रत्येक राज्याने २००० पूर्वी अडवून वापरावे असा आदेश या आयोगाने १९७६ साली दिला. त्या वाटपानुसार महाराष्ट्राच्या वाट्याला ५६० अब्ज घनफूट पाणी आले. मात्र गेल्या २० वर्षात पाणी अडविण्याबाबत फारसे काम न झाल्याने आणि २००० सालातील






ललित लेखनाची कृतिपुस्तिका 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' आवर्जून संग्रही ठेवा ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

मर्यादा जवळ आल्याने महाराष्ट्र सरकार झपाट्याने कामाला लागले आहे.

***पाणलोट क्षेत्र विकास***

धरणाच्या कालव्याचे पाणी पोहोचत नाही अशा इतर गावांची पाण्याची सोय काय? ही गावे विहिरीतून मिळणाऱ्या पाण्यावर (शास्त्रीय भाषेत ज्याला 'भूजल' म्हणतात) अवलंबून असतात. परंतु गेल्या काही वर्षात जमिनीच्या पोटातील हे भूजलही कमी-कमी होत चालले आहे. याचे कारण भूजलाचा प्रचंड उपसा! जमिनीतील हे भूजल आपण बँकेत ठेवलेल्या पैशाप्रमाणे असते. आपण बँकेत जेवढे पैसे ठेवत जातो त्याप्रमाणात ते काढता येतात आणि नुसतेच काढत गेलो तर एक दिवस आपल्या खात्यात काहीच शिल्लक नसणार. विद्युत पंप किंवा ऑइल इंजिन यांचा शोध लागण्यापूर्वी गावातले लोक बैल मोटेने पाणी उपसायचे. या उपशाचे प्रमाण फार थोडे असायचे. दरवर्षी पावसामुळे जमिनीत मुरणारे पाणी उपश्याच्या तुलनेत बरेच जास्त असल्याने विहिरीतले पाणी संपायचे नाही. परंतु गेल्या काही वर्षात पिकांसाठी प्रचंड प्रमाणात 'भूजल' उपसले जाते आणि पावसाचे पाणी मात्र पूर्वीइतकेच जमिनीत जिरते. त्यामुळे विहिरीतील पाणी जेमतेम जानेवारी-फेब्रुवारी महिन्यापर्यंतच पुरते. त्यानंतरच्या महिन्यात पाण्याचा खडखडाट होतो.

१९७२ साली महाराष्ट्रात खूप मोठा दुष्काळ पडला होता. कितीही मोठी धरणे बांधली तरी त्यांचे पाणी राज्यातील सर्व गावांपर्यंत पोहोचत नसल्यामुळे विहिरी हेच बहुसंख्य गाातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध साधन आहे. मात्र अतिउपशामुळे विहिरी कोरड्या पडतात. यावर काय उपाय करता येईल या प्रश्नावर १९७२ च्या दुष्काळात विचार सुरू झाला. या विचारमंथनातून गाव पातळीवरील विकेंद्रित जलव्यवस्था किंवा सध्याचा प्रचलित शब्द म्हणजे 'पाणलोट क्षेत्र विकास' या संकल्पनेला चालना मिळाली. **'पाणी अडवा- पाणी जिरवा'** या घोषणेचा जन्म त्याच सुमारास झाला. काय आहे हे पाणलोट क्षेत्र विकासाचे तंत्र? तर पाणलोट क्षेत्र विकासात पावसाचे पाणी पडेल तेथेच अडवायचे हे मुख्य सूत्र असते. त्यासाठी 'माथ्यापासून पायथ्या-पर्यंत' वेगवेगळे उपचार केले जातात. आता थोडे 'पाणलोट क्षेत्र' 'माथा', 'पायथा' या शब्दाचे अर्थ समजून घेऊ. कोणत्याही भौगोलिक प्रदेशाची रचना काही उंचवटे, काही सखल प्रदेश आणि प्रवाह , अशी बनलेली असते. हे उंचवटे म्हणजे डोंगर-टेकड्या, सखल प्रदेश म्हणजे शेते आणि प्रवाह म्हणजे ओढेनाले असतात. पावसाचे पडणारे पाणी उंच भागाकडून सखल भागाकडे वाहते आणि तेथून त्याचे प्रवाहात रूपांतर होते. हा प्रवाह पुढे ओढ्याला किंवा नदीला मिळतो. प्रवाहाचे एखाद्या ठिकाणचे पाणलोट क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की ज्या

भागात पडणारे पावसाचे पाणी नैसर्गिकपणे वाहत येऊन त्या ठिकाणी प्रवाहाला मिळते. या पाणलोट क्षेत्रातील सर्वात उंचीवरचा भाग म्हणजे 'माथा' तर सर्वात खोलगट भाग म्हणजे 'पायथा' होय. पाणलोट क्षेत्र विकासात पाणी अडविण्याबरोबरच माती अडवणे व त्याद्वारे जमिनीची धूप थांबविण्यालाही महत्त्व दिले जाते. वरील दोन्ही उद्दिष्टांसाठी सलग पातळीवर चर, लूज बोल्डर स्ट्रक्चर, गॅबिअन बंधारे, असे विविध उपचार राबविण्यात येतात. पाणलोट क्षेत्र विकासाची कामे राबविलेल्या एखाद्या गावाला भेट दिली तर हे सर्व प्रकार तुम्हाला पहायला मिळतील.

***तुम्ही काय करू शकता?***

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा'... असं आपल्या महाराष्ट्राचं वर्णन काव्यात कितीही छान वाटत असलं तरी प्रत्यक्षात वैराण उजाड माळरानं, नापीक जमीन आणि दरिद्री शेतकरी हेच ग्रामीण महाराष्ट्राचं वास्तव चित्र आहे. याचं प्रमुख कारण पाण्याची टंचाई. केवळ शेतीच्या पाण्याचीच टंचाई आहे असं नाही तर पिण्याच्या पाण्याचाही तुटवडा आहे. ही टंचाई कशामुळे आहे हे लेख वाचून थोडीफार तुमच्या ध्यानात आली असेल. पण मग यावर आपण काय करू शकता. आपण राहतो त्या शहरात, गावात पाण्याची समस्या नसेलही. परंतु आपण मुबलक पाणी वापरल्यामुळे इतर काही गावांना मिळू शकणारे पाणी हिरावून



'वाचलेच पाहिजे असे काही'(वाचनीय वीस पुस्तकांचा परिचय व १०० पुस्तकांची यादी) छात्र प्रबोधन प्रकाशन. किं. रू.१५-

तर घेत नाही ना याचा विचार केला पाहिजे. पुणे शहराचे उदाहरण यादृष्टीने खूपच बोलके आहे. खडकवासला धरणातून पुण्याला भरपूर पाणी मिळते मात्र शहराला लागून असलेल्या अनेक खेड्यांतील महिलांना दोन-दोन किलोमीटर पाणी आणावे लागते. म्हणून यापुढे अंघोळ करताना, कपडे धुताना, बागेला पाणी देताना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्यायला शिकले पाहिजे.

याचबरोबर काही उपक्रम करता येतील. मोठे धरण आणि त्याच्या कालव्याद्वारे होणारी पाणीव्यवस्था समजून घेण्यासाठी अशा जवळच्या धरण-प्रकल्पाला भेट देता येईल. सध्या वृत्तपत्रामध्ये 'पाण्यासाठी दाही दिशा', 'पाणी टंचाई' यासारखे सदरे येत असतात. ती वाचून त्याचा एखादा कात्रण संग्रह तयार करता येईल. महाराष्ट्राच्या नकाशावर ती गावे पाहता येतील. त्यातल्या जवळच्या एखाद्या गावात प्रत्यक्ष जाऊन या परिस्थितीचे गांभीर्य समजवून घेता येईल. तेथील लोकांशी बोलून पाणी प्रश्नांची व्याप्ती कळू शकेल. तेथील गावकऱ्यांबरोबर २-२।। कि.मी. अंतरावरून एखादी कळशी, हंडा भरून आणून त्यांच्या कष्टाची सह-अनुभूती घेता येईल. तसेच पाणलोट क्षेत्र विकासाची कामे झालेल्या गावाला भेट देऊन ते तंत्र समजावून घेता येईल. केवळ लेख वाचण्यापेक्षा अशा प्रकारच्या भेटी व अभ्यासातूनच पाणी समस्येचे खरे स्वरूप समजायला मदत होईल. त्यादृष्टीने उन्हाळ्याची सुट्टी ही एक पर्वणीच नाही का?

■■

*राजेंद्र आवटे*
गंगोत्री, 'दुर्गा' ३२/२ गणगोठे पथ,
एरंडवण, पुणे ४११ ००४

## कारणी लावा तुमचा अमूल्य वेळ

१. कामासाठी वेळ द्या - ती यशाची खरी किंमत आहे.
२. विचार करण्यासाठी वेळ द्या - ते शक्तीचे उगमस्थान आहे.
३. खेळ खेळण्यासाठी वेळ द्या - ते तारुण्याचे गुपित आहे.
४. वाचनासाठी वेळ द्या - तो ज्ञानाचा पाया आहे.
५. स्नेहासाठी वेळ द्या - तो सुखाकडे नेणारा मार्ग आहे.
६. स्वप्नांसाठी वेळ द्या - तो तुमच्या ध्येयाच्या वाटेवरील खरा सोबती आहे.
७. सभोवताली पाहण्यास वेळ द्या - तुम्हाला स्वार्थी होण्यासाठी सवडही मिळणार नाही.
८. हास्य विनोदासाठी वेळ द्या- ते एक जीवनसंगीत आहे.

वरील वेळेचे महत्त्व विद्यार्थ्यांनी वेळीच लक्षात घेतले पाहिजे.

*अमेय प्रदीप इनामदार, सांगली*



मंत्रपठण वर्ग, पौरोहित्य वर्ग, प्राचीन वास्तुशास्त्र वर्ग. इ. साठी संपर्क संत्रिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

# हाऽऽहाऽऽहा

एका वेड्याला मनोरुग्णालयात दाखल करण्यात आले. काही लोक त्याला भेटायला आले. त्याच्याशी संभाषण करताना असे आढळून आले की तो फार समंजस आहे, विद्वान आहे. तेव्हा लोकांनी त्याला विचारले,''आपणांस येथे का दाखल करण्यात आले आहे?'' तो म्हणाला,''काय करू? माझ्या गावातील सर्व लोक वेडे होते. मी एकटाच शहाणा होतो. तेव्हा सर्वांनी विचार केला हा बाहेर राहिला तर ते आपल्या फायद्याचे होणार नाही. म्हणून सर्वांनी मिळून मला येथे आणले.''

☺ ☺ ☺

आरसा

आपल्या जुळ्या मुलांना घेऊन एक बाई शिंप्याकडे गेली. तयार झालेले कपडे त्यांच्या अंगावर चढवल्यावर शिंपी म्हणाला,'आता आरशात पहा बरं.'


बाई म्हणाल्या,'आरसा कशाला? त्यांनी एकमेकांकडे पाहिले तरी चालेल.'

☺ ☺ ☺

राधाबाई : तुझ्या मुलीचा साखरपुडा होऊन एक वर्ष झालं तरी तू तिचं लग्न का करीत नाही?

सीमाबाई : त्याचं काय आहे नवरा मुलगा हा एक वकील आहे. ज्या ज्या वेळी लग्नाची तारीख येते त्या त्या वेळी तो नवीन तारीख देतो.

☺ ☺ ☺







'विवेकानंदांचा राष्ट्रधर्म' (स्वामी विवेकानंदांच्या वाङ्मयातील निवडक उताऱ्यांचा संग्रह व भाष्य) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन कि. ३० रू.

संस्कृत कथा

# सत्यकाम जाबाल

– *डॉ. श्रीकान्त बहुलकर*

उपनिषदांच्या काळी जे प्रसिद्ध तत्त्वचिंतक होऊन गेले, त्यांपैकी एक प्रसिद्ध ऋषी सत्यकाम जाबाल ह्यांची ही कथा! छांदोग्य उपनिषदातल्या ह्या कथेचा स्वैर अनुवाद येथे केलेला आहे.

'ऋषीचं कूळ आणि नदीचं मूळ पाहू नये अशी एक म्हण आहे. जाबालला आपलं कूळ कोणतं, आपले वडील कोण हेच माहीत नव्हतं. ऋषींची नावं वडिलांच्या नावावरून, गोत्रावरून जशी पडलेली असतात, तशी आईच्या नावावरूनही तयार झालेली दिसतात. सत्यकाम हा जबाला नावाच्या स्त्रीचा पुत्र. त्याचं नाव जाबाल. 'सत्यकाम' म्हणजे त्याची कामना करणारा, सत्याची कास धरणारा, त्याच्या सत्यप्रियतेमुळे त्याचं सत्यकाम हे नाव अन्वर्थक ठरलं.

त्या जाबालला लहानपणी वाटलं – 'आपणही इतर मुलांप्रमाणे गुरूगृही जावं, ब्रम्हचर्याचं व्रत धारण करवं, वेदांचं अध्ययन करावं आणि विद्वान व्हावं.' गुरूकडं गेलं की, पहिला प्रश्न ते विचारणार– 'तुझं गोत्र काय?' जाबालला आपलं गोत्र माहीत नव्हतं. वाडवाडिलांचा जो वंश चालत आलेला असतो, त्या वंशाच्या मूळ पुरूषाचं नाव म्हणे गोत्र. जाबालला आपले वडील कोण तेच ठाऊक नव्हतं. आई हीच आई आणि बाप दोन्ही होती. जाबाल मग आईकडे गेला आणि त्यानं म्हटलं,'आई, मी ब्रम्ह्मचर्य व्रत धारण करीन म्हणतो. तर सांग बरं, आपलं गोत्र काय?'


जबाला क्षणभर गप्प झाली. मग उत्तरली,'बाळा, आपलं गोत्र मला ठाऊक नाही. मी तर मालकाच्या घरात दासी म्हणून पडेल ते काम करत असते. मी तरूण असताना तुझा जन्म झाला. एवढंच मला ठाऊक आहे. ना मला तुझ्या पित्याचं नाव ठाऊक, ना त्याचं गोत्र! मी जबाला आणि तू सत्यकाम. गुरूजींनी विचारलं तर खुशाल सांग की मी सत्यकाम जाबाल आहे.'

सत्यकाम गुरूकडे निघाला. त्या काळी 'हारिद्रुमत गौतम' नावाचे विद्वान ऋषी होऊन गेले. त्यांच्याकडं जावं असं त्यानं ठरवलं. त्यांच्या आश्रमात त्यानं त्यांची भेट घेतली. तो म्हणाला, 'मी वेदाध्ययनासाठी ब्रम्ह्मचारी बनून आपल्याजवळ राहू इच्छितो. द्याल का मला अनुमती?'

गुरूजी म्हणाले, 'बाळ, तुझं गोत्र काय?' सत्यकाम म्हणाला, 'तेच तर ठाऊक नाही मला. मग मी आईलाही विचारलं तर ती म्हणाली,'मी दासी म्हणून मालकाच्या घरात पडेल ते काम करत असते. मी तरूण असताना तू मला झालास. मलाही तुझं गोत्र ठाऊक नाही. मी जबाला आणि तू सत्यकामा.



'नाविन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत?' (प्रकल्पासंबंधी अनुभवातून लिहिलेले उपयुक्त पुस्तक) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. किं. रू. ५०/-



म्हणून गुरूजी, मी सत्यकाम जाबाल आहे.'

गुरूजी आश्चर्यानं आणि आनंदानं त्याच्याकडं पाहू लागले. दासीच्या पोटी जन्माला आलेला हा मुलगा किती सत्यप्रिय आहे. खरं सांगितलं तर परिणाम काय होईल, याचा विचार देखील ह्याच्या मनाला शिवला नाही. गोत्र सांगता आलं नाहीतर कदाचित गुरूगृही प्रवेश मिळणार नाही. मग दडपून काही सांगावं, असंही त्याला वाटलं नाही. असे विचार मनात येऊन त्यांना त्याचं मोठं कौतुक वाटलं. ते सत्यकामाला म्हणाले,'ज्याअर्थी तू खरं बोललास त्याअर्थी तू नक्कीच ब्राह्मण असला पाहिजेस. सत्य भाषण हेच खऱ्या ब्राह्मणाचं लक्षण . तर ये, बाळ, आजपासून तू या गुरूगृहीचा झालास. वेदाध्ययन करण्यासाठी मी तुझे उपनयन करतो कारण तू सत्यापासून ढळला नाहीस. जा उपनयन संस्कारासाठी समिधा घेऊन ये.

गौतम ऋषींनी सत्यकामाचं उपनयन केलं आणि त्याला पहिलं काम सांगितलं त्या आश्रमातल्या गाईंच्या कळपांमधून त्यांनी कृष झालेल्या, दुबळ्या अशा चारशे गाई निवडून काढल्या आणि म्हटलं- 'बाळ, ह्या गाई घे आणि वनात जा!' सत्यकाम खरं तर वेद शिकायला आला होता आणि गुरूजींनी काम दिलं मात्र गाई राखायचं. पण सत्यकामाने ते स्वीकारलं. त्या गाईंना त्यानं अरण्याच्या वाटेला लावलं आणि तो गुरूजींना म्हणाला,'ह्या चारशे गाईंच्या एक हजार गायी करीन आणि मगच मी परत येईन.' त्यानं अरण्यात त्या गाईंची उत्तम रीतीनं राखण केली. त्यानं त्या गाई केवळ राखल्या नव्हे, तर वाढवल्या. अनेक वर्षं तो अरण्यात राहिला. क्रमाक्रमानं त्या गाईंची संख्या हजारापर्यंत गेली.

आता गुरूंकडे परत जायची वेळ



'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' (स्वामी विवेकानंदांचे प्रेरणादायी चरित्र) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. कि. रू. ७५/-



आली. त्या गाईंच्या कळपातला एक बैल मनुष्यवाणीने सत्यकामाला म्हणाला,'बाळ, आता आमची संख्या एक हजार झाली आहे. आम्हाला आता गुरूंच्या घरी परत घेऊन जा. त्याअगोदर मी तुला ब्रम्ह्मज्ञानाचा चवथा हिस्सा – एक पाद सांगतो.' बैलानं त्याला ब्रम्ह्माचा एक पाद संगितला. त्या ज्ञानाच्या प्रकाशामुळे सत्यकामही तेजस्वी बनला. मग उरलेले तीन हिस्से – तीन पाद त्याला अग्नी,हंस आणि मदगुनावाचा जलचर ह्यांनी सांगितले. ह्या ब्रम्ह्मज्ञानाचे चार पाद म्हणजे सोळा कला. ह्या सोळा कलांनी युक्त असा ब्रम्ह्मज्ञानाचा पूर्ण चंद्र सत्यकामाच्या हृदयात प्रकाशला. त्यामुळं तो प्रकाशवान बनला.

सहस्त्र गायींना घेऊन सत्यकाम गुरूगृही परतला. गुरूंनी पाहिलं सत्यकाम किती प्रसन्न, किती तेजस्वी दिसतोय. त्यांनी म्हटलं– तू तर ब्रह्मज्ञानी मनुष्याप्रमाणे तेजस्वी दिसतो आहेत. कुणी बरं तुला ते ज्ञान दिलं?' सत्यकाम म्हणाला, 'मनुष्येतर देवतांनी मला ते ज्ञान दिलं. पण माझी इच्छा तर आपणाकडून शिकायची आहे. इतरांनी शिकवून काय उपयोग? आपल्यासारख्या गुरूंकडून जी विद्या मिळेल तीच खरी उपयोगाची. आचार्यांनी मग त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. जे मनुष्येतर देवतांनी सांगितलं तेच ब्रह्मज्ञान गुरूंनीही सांगितलं. सत्यकामनेही ते मनात पूर्ण ठसवलं आणि तो एक तत्त्वचिंतक म्हणून प्रसिद्ध झाला.

■■

**– डॉ. श्रीकान्त बहुलकर**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
१२४२ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

## शास्त्रीय उपकरण | फुलावरील फुलपाखरू | करून तर पाहा


***तेजस्वी भुरके, ७ वी***


तत्त्व : गुरुत्वमध्य


साहित्य : शिसं, रंगीत कागद, काडी, पांढरे कागद, टाचण्या, आवश्यक असल्यास दोरा, एक उभा डबा, फेवीकॉल.

कृती : प्रथम काडीला आकर्षक असे मध्यम आकाराचे फूल टाचणीने लावायचे. आवश्यक वाटल्यास अजून २ फुले त्याच फुलाच्या खाली लावायची. मग फुलपाखराचे आकर्षक असे २ भाग समान आकाराचे कापायचे. त्याला रंगीत कागदांनी आकर्षक बनवायचे. आता आपल्याला फुलपाखरू त्याच्या तोंडावर तोलणारं दाखवायचं मग गुरुत्वमध्य या तत्वाने तिथे शिसं भरायचं. जिथे आपण सर्वात जास्त वजन भरू तिथे गुरुत्वमध्य येतो. शिसे दोन पंखाच्या मधल्या भागात भरून झाल्यावर ते फुलपाखरू फुलावर तोलतंय का हे बघायचे. मग एका उभ्या डब्यात माती/रांगोळी ठेवायची आणि त्यात ती काडी उभी करून फुलपाखरू फुलावर ठेवायचे.


उपयोग : शोभेची वस्तू, वरीलप्रमाणेच आपण चोचीवर तोलणारा पक्षी, भुंगाही करू शकू.







सुलट बाजू



उलट बाजू

# भटकंती - डोंगरदऱ्यातील


**- आनंद पाळंदे**

पुण्याचा परिसर मोठा भाग्यवान आहे. कारण शिवनेरी, पुरंदर, सिंहगड, राजगड, तोरणा, रायगड आणि प्रतापगड हे मराठी इतिहासात अजरामर झालेले दुर्ग पुण्याच्या आसपासच आहेत. या सर्वांची यात्रा अनुभवी आणि नवोदित दोघांनाही सारखीच आनंददायी ठरते. अकरावी उत्तीर्ण झाल्या झाल्या लगेचच पानशेतहून रायगडला जाणाऱ्या डोंगरयात्रेत मी सामील झालो होतो.

पुण्याच्या पश्चिमेला असलेले पानशेत धरण सर्वांना परिचित आहेच. त्याच्या पश्चिमेला माणगांव आहे. तिथून डोंगरी पायवाटेने आम्ही सह्य माथ्याकडे चढून गेलो. नवखा होतो. दमत दमत, बसत बसत मी स्वत:शीच चरफडत चढत होतो. एका मावळी धनगराने आम्हाला चांगलं पोटभर ताक पाजून आतिथ्यपूर्वक निरोप दिला. पुढे घाटमाथा आला.

किती सुंदर, अन् भव्य दृश्य आमच्यासमोर उलगडलं म्हणून सांगू? पाताळात गेलेल्या खोल दऱ्या, कातळकड्यांचे काळे भिन्न पत्थर, हिरव्या वनश्रीचे उतार आणि दूर त्या चित्रातून वर उमलणारा विशालकाय असा रायगड. सह्याद्रीतील गडकोटांच्या, डोंगराच्या, निसर्गाच्या मोहकतेपुढे मी तेव्हा जो खेचला गेलोय तो आजपर्यंत. त्यानंतर अनंत डोंगरयात्रा झाल्या तरी मला कधी थांबावंसं वाटत नाही.

खरंच आकाश, पाणी, वनस्पती,



पक्षी आणि प्राणी यांना कुशीत घेणारे डोंगरपर्वत यांची शिदोरी आयुष्यभर पुरणारी आहे. जगाच्या पाठीवरी कुठेही जा डोंगर आहेतच. पण आपल्या सह्याद्रीला आणखी एक गुण चिकटला आहे. तो आहे सांस्कृतिक परिमाणाचा.

लेणी, मंदिरे, आश्रम, देव-देवता, विविध वास्तू, वाडे, दुर्ग असं मोठं वैभव इथे आहे. अशा या संचिताचे डोळस दर्शन घेण्यासाठी डोंगरयात्रा करायला हव्यात. इंग्रजीत वापरल्या जाणाऱ्या हाईक, ट्रेक या शब्दाने या उपक्रमाचे वर्णन तुटपुंजे होते. डोंगरयात्रा या व्यापक शब्दातून तुम्ही या उपक्रमास अधिक चांगले सामोरे जाल तर बरे.

**डोंगरयात्रा प्रारंभ**

दुर्गावर, डोंगरावर निर्मळ, पवित्र मनाने जायला हवे. अभ्यासू मन, शांततेची ओढ आणि इतिहासातून, निसर्गातून ज्ञान मिळवायची तळमळ हवी आणि म्हणूनच डोंगरयात्रा म्हणायचे. अर्थात स्वत: माहिती काढावी. दादा मंडळींना विचारावे. ग्रंथालये पाहावी. पूर्वी गेलेल्या लोकांना भेटावे. कार्यक्रमाचे नियोजन करावे आणि मग घराबाहेर पडावे.

लहानपण सुखाचे असते. सर्व काही आयते मिळत असते. आई-वडील, नातेवाईक प्रेम-कौतुकाचा वर्षाव करत असतात. पण व्यक्तिमत्त्वाची जाणीव झाली की हे आयतेपण मिळमिळीत वाटायला लागते. मी काहीतरी जबरदस्त करेन, वादळ बनेन, इतरांना दीपवून पुढे जाईन असे आंदोलन मनात स्फुरण पावते आणि म्हणूनच सर्व काही आयते देणाऱ्याच्या मागे जाऊन काय उपयोग धाडसाला चांगली वाट करून द्यायला डोंगरांच्या रात्रेसारखी, गडकोटांच्या दर्शनासारखी दुसरी क्रीडा नाही. पण ती प्रसंगी धोका पत्करून स्वत:च करायला शिका.

आपल्या परिसरात अनेक निसर्गरम्य स्थळे, टेकाडे, तलाव, डोंगर असतीलच. अशा ठिकाणी निसर्ग निरीक्षण करण्यासाठी जायला प्रारंभ करा. शक्यतो स्वत:चा गट करून जा किंवा ज्या संस्था तुमच्या नेतृत्वाला, उपक्रमशीलतेला प्रोत्साहन देतील अशा संस्थांना सामील व्हा.

**डोंगरयात्रा तयारी**

खरं म्हणजे डोंगरयात्रेसाठी विशेष काही तयारी हवी असे नाही. आपल्या दैनंदिन जीवनात ज्या गोष्टींचा वापर आपण करतो त्याच वापरल्या तरी चालते. मुख्य म्हणजे गरजा कमी करायच्या. स्वावलंबी जीवन जगायला शिकायचे. हात मोकळे हवेत म्हणून गळ्यात लटकवता येईल अशी पिशवी अथवा शाळेचे दप्तर पाहिजे. नेहमीचाच पण जाडसर पूर्ण बाह्यांचा सदरा व अर्धी विजार घालावी. उन्हासाठी पांढरी टोपी उत्तम. पायात कॅनव्हास बूट उत्तम पण हवाई चपलाही. दिवसभर घराबाहेर अन् तेही दुकाने नसलेल्या परिसरात आपण जाणार आणि भूक तर लागणारच. त्यासाठी टिकाऊ

दशम्या, शेंगदाणे, पोहे एखादा कांदा आणि चटणी जवळ बाळगावी. पाण्याची न फुटणारी बाटली भरून घ्यावी.

शाळेसारखी वही नाही पण नोंद करण्यासाठी छोटीशी, वरच्या खिशात मावणारी वही व दोन पेन जरूर घ्यावे. यात लगेचच्या नोंदी लगेच कराव्या. कारण आपण फार विसराळू असतो. जमलेली माहितीही ताडून बघण्यासाठी सोबत जरूर घ्यावी.

**डोंगरयात्रा वाटचाल**

जमवलेल्या माहितीनुसार योग्य वेळी एस. टी. स्थानकावर जाऊन गाडीतून स्थळी उतरावे. माफक गप्पा माराव्यात. पण त्या गाडीतल्या कुणा खेडुतांशी! शिवाय बाहेर निरीक्षण करून मार्ग निरखावा.

डोंगरयात्रा करताना निरीक्षणाला वावही असतो आणि महत्त्वही. चांगल्या वाटाही छान फसवतात. त्यामुळे पायथ्यापासून डोंगराची घळी, उतार, झाडे, ठळक टप्पे, विशेष खुणा मनात पक्क्या असाव्या. ग्रामस्थांकडूनही माहिती घ्यावी. पाण्याच्या जागा, निवाऱ्याच्या जागा, वाटेतील वस्त्या यांची माहिती खूप उपयुक्त ठरते.

आपल्या तुकडीत पुढचा मावळा कोण आणि शेवटचा मावळा कोण हे निश्चित करणे फार महत्त्वाचे आहे. याचे अनेक उपयोग आहेत. वाटचाल करताना अती दमणूक होईल असा वेग ठेवू नये. विश्रांती पाहिजेच. ठराविक माफक पाणी पिणे अत्यावश्यक आहे. त्याचप्रमाणं खाणेही आवश्यक. अवघड वाट लागली तर कमकुवत सदस्याला मदत द्यावी. चेष्टामस्करी नको. अधूनमधून माहितीच्या खुणा पडताळाव्या.

पुढच्या मावळ्याकडे काठी असेल तर वाटेतील सर्प, विंचू तिच्या आवाजाने हालचालीने दूर पळतात. प्रसंगी काठीची आधारही घेता येतो. प्रथमोपचाराचे साहित्य तुमच्या तुकडी जवळ असावयास हवे.

शोधकता, धैर्य आणि शारीरिक क्षमता हे सर्व हळूहळू विकसित हाते.

डोंगरयात्रेत भोज्याला पोहोचण्यापेक्षा कसे पोहोचला, वाटेत काय पाहिले हे महत्त्वाचे. वाटेतील झाडे, पक्षी, कीटक, याचबरोबर माथ्यावरून दिसणारे दृश्य यांचा समावेश नोंदवहीत व्हावा. त्याचप्रमाणे ऐतिहासिक सांस्कृतिक खुणा टिपाव्यात.

**डोंगरयात्रा निवास**

गडकोटांवर मुक्काम करण्यासाठी अधिक तयारी करावी. सतरंजी आवश्यक. त्याखाली वर्तमानपत्राचा कागद अंथरला की थंडी लागत नाही. साधे पांघरूण न घेता धोतर, जुन्या साड्या एकमेकांना शिवून खोळ करावी म्हणजे त्यात अंगात स्वेटर, कानटोपी चढवून घुसलेकी छान झोप लागते.

मुक्कामाला शाळा, देऊळ असेल तर छानच पण नसेल तर उघड्यावर मुक्कामाला अधिक मजा येते.गवत

टोचतंय म्हणून ते जाळायचा प्रयत्न करून नये. अशा मुक्कामामुळे धैर्य वाढते. रात्री सुंदर आकाशदर्शनही होते. अशा ठिकाणी पाककौशल्य विकसित हाते. मात्र तुकडीतील प्रत्येकानेच आलटून पालटून कामे करायला हवीत. स्वयंपाकासाठी घरून ॲल्युमिनियमचे पातेले आणि शिधा मात्र जरूर न्यावा. म्हणजे वजन वाहून न्यायची क्षमता असायला पाहिजे. अर्थात एकाच वस्तूचे दोन तीन पर्यायी उपयोग करायला शिकावे लागते. उदा. सकाळच्या विधीसाठी वेगळा तांब्या नेऊन चालणार नाही. किंवा फिरायला जाताना वापरायचे चांगले कपड्यांचे जादा जोड घरीच ठेवणे योग्य नाही का?

**डोंगरयात्रा - दुर्गदर्शन - निसर्गदर्शन**

डोंगरयात्रेला गेल्यावर आपण दुर्गावर जातो. तिथे काही ऐतिहासिक महत्त्वाची वास्तू, शिल्पे असतात.कालनिर्णय करणारे शिलालेख, शिल्पे, टाकी असतात. यांचा डोळस अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणी विद्रुप केले असल्यास आपण आणखी विद्रुप करू नये. उलट एखाद दोन दगड व्यवस्थित रचता आले तर ते जरूर करावे, कुणी आपली नावे लिहून ठेवली असतील तर ती पुसून काढावी. आपला कचरा घरी परत आणावा. एखादी मूर्ती, पाण्याचे टाके, तोफा, शिल्प आढळल्यास त्याची नोंद नकाशावर करावी. आसपास कुणी दंतकथा काव्य सांगितले तर टिपावे. नुसतेच तंगड्या पसरून बसण्यापेक्षा वास्तूवरील गवत उपटता आले तर ते उत्तम काम होऊ शकेल.

निसर्गाचे जतन कसे करता येईल हे पाहावे. ग्रामस्थांशी जवळीक साधावी. कारण तेच याचे रखवालदार आहेत.

**डोंगरयात्रा धोके**

डोंगरयात्रेत धोके जरूर आहेत. पण ते अन्यत्रही आहेतच. अर्थात यासाठी काही अलिखित नियम पाळणे आवश्यक आहे. विचारपूर्वक नियोजन करून यात्रा केल्यास धोका जवळजवळ शून्य असेल. पण नसते धाडस, शूरत्व दाखविण्यासाठी डोंगरयात्रा केल्यास मात्र गंभीर परिणाम भोगावे लागतील.

पाण्याच्या टाक्यांमध्ये, कुंडांमध्ये पोहण्यासाठी उतरणे आवश्यक नाही. डोंगराच्या कड्यावर उभे राहून चेष्टा, मस्करी,ढकला-ढकली करू नका. काही शिक्षण घेतले नसता उगाचच अवघड जागी उघड्यावर चढू नका. अन्न-पाणी न घेता आम्ही चाललो अशी फुशारकी मारण्यात अर्थ नाही. उन्हाच्या वेळी विश्रांती आवश्यक आहे. शरीर सक्षम नसेल तर धोक्याला निमंत्रणच. माकडे, मधमाशा, सर्प, विंचू यांच्या वाटेला मुद्दाम जाणे योग्य नाही. तीव्र उतारावरून काळजीपूर्वक उतरावयास हवे नाही तर कपाळमोक्ष होऊ शकतो.

आपले कौशल्य हळूहळू वाढवत आपल्या व तुकडीच्या क्षमतेमध्ये राहून ही क्रीडा अंगीकारली तर त्यातील

अत्युच्च सुख मिळवता येईल. गडकोटांवर जाणे म्हणजे पिकनिक नाही ही जाणीव ठेवली तर आनंद वृद्धिंगत होईल आणि यात्रेचे पावित्र्यही राखले जाईल. निसर्गाच्या भव्य, उत्कट दर्शनासाठी, इतिहासातल्या बऱ्यावाईट घटनांत डोकावण्यासाठी उत्तम खिडकी असे या डोंगरयात्रेचे स्वरूप आहे. हे मनात ठेवून अशा यात्रा सफल करा. आनंददायी करा.

■■

*आनंद पाळंदे*
२/३ एरंडवणा, कर्वे रस्ता
ठाकरसी विद्यापीठासमोर, पुणे ४.

## आला वसंत अवनीवरती

आला वसंत अवनीवरती
आला मोहोर आंब्यावरती
कोकिळ गायन फांदीवरती
वसंतऋतुचे आगमन होता
स्वर्गाची अवतरे सभोवती

फुटते पालवी मनामनाला
स्वर्गीय आनंद क्षणाक्षणाला
शमविणारा तृषित भरला
वसंत अवनीवरती आला.

**स्मार्ता प्रभावळकर**
'फुलोरा' हस्तलिखित
फाटक हायस्कूल, रत्नागिरी.

## जागतिक समस्या

या जगात आज प्रदूषण किती?
त्यामुळे सृष्टी नष्ट होण्याची भिती

पूर्वी मानव होता निसर्गाचा रक्षक
मानवच झाला आता त्याचा भक्षक

ओझोन होत आहे नष्ट
भरू शकत नाही तो कितीही केल्या कष्ट

पूर्वी निसर्गाच्या रक्षणात जो होता दक्ष
तर थांबवावे प्रदूषण

आज जगाची लोकसंख्या एवढी मोठी
की पडते ही पृथ्वी छोटी

अनुषंगाने समस्या अनेक
बेकारी ही त्यातली एक

बेकारीतून आर्थिक समस्या
मूळ त्यांचे वाढती लोकसंख्या

अशा समस्या आहेत अनेक
लढू त्या विरुद्ध होऊन एक

**'जागतिक समस्या' हस्तलिखित**
न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे





"To be Master in Computers - Contact ***IMLD. JNANA PRABODHINI, Pune***

हिंदी कथा

# 'प्रायश्चित्त'

*– चारूता पुराणिक*

कबरी मांजरीला साऱ्या घरात जर कोण आवडत असेल तर, ती रामूची बायको; आणि रामूच्या बायकोला जर कोणाची अत्यंत चीड येत असेल तर ती कबरी मांजरीची. दोन महिन्यापूर्वी रामूची बायको सासरी आली होती. सासूची, नवऱ्याची आवडती होती ती! १४-१५ वर्षांची नवरी मुलगी! तिच्या कनवटीला कोठीची किल्ली होती. नोकरांवर तिचीच हुकूमत चाले. रामूची बायको घरात सर्वेसर्वा होती. तिची सासू जपमाळ ओढीत, पूजा अर्चा करीत बसे.



१४-१५ वर्षाची सूनबाई! कधी कोठीची खोली बंद करायला विसरे तर कधी तिथेच तिला झोप लागून जायची. मग काया! कबरी मांजरीला संधीच चालून यायची, दुधा-तुपावर ताव मारायला! रामूच्या बायकोला बरणीत तूप भरताभरता डुलकी



लागली, उरलेले तूप कबरीच्या पोटात. रामूची बायको दूध झाकून ठेवून, शेजारी काही द्यायला गेली



'बुद्धिवैभव' (बुद्धिचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. कि. रू. २०/-

की, इकडे दूधाचा फडशा. कबरी मांजरी रामूच्या बायकोला चांगलीच ओळखायला लागली होती. खोलीत रबडीने भरलेले पातेले ठेवले होते, रामू खोलीत येईपर्यंत भांडे चाटून पुसून साफ झालेले! बाजारातून बालुशाही आणलेली-रामूची बायको ताटे घेईपर्यंत बालूशाही गायब!

रामूच्या बायकोने ठरविले, एक तर ती घरात राहील, नाही तर कबरी मांजरी! झाले! मोर्चाबंदी केली. दोघी सावध! मांजरीला पकडण्याचा पिंजरा आणला. यात दूध, मलई, उंदीर इ. मांजरीला आवडणारे सर्व पदार्थ ठेवले, पण मांजरी तिकडे ढुंकुनही बघेना. इकडे कबरी मांजरी आपला पराक्रम अधिकच दाखवू लागली. इतके दिवस ती रामूच्या बायकोला घाबरत तरी होती. पण आता ते घाबरणेही नाही. रामूच्या बायकोच्या तावडीत न सापडण्याइतकी ती सावध असे.

मांजरीमुळे सुनेला सासूचे टोमणे ऐकावे लागत आणि रामूला मिळायचं कसलं तरी जेवण!

एक दिवस रामूच्या बायकोने, रामूसाठी खीर केली. पिस्ते, बदाम-बेदाणे अणि सुकामेवा, दूध खीरीत घातला. चंदेरी वर्ख त्याला लावले आणि खीरीने भरलेले भांडे, मांजरी पोहचणार नाही. अशा ठिकाणी उंचावर ठेवले. रामूची बायको बाकीची कामे करू लागली.

तिकडे कबरी मांजरी खोलीत शिरली. शिंकाळ्याच्या खाली उभी राहून, ती उंचीचा अंदाज घेऊ लागली. आणि... कबरीने मारली की उडी.... तिचा पंजा भांड्यात! आणि खीरीचे भांडे खण्ऽण्ऽण्ऽ करीत जमिनीवर पडले.

आवाज ऐकला रामूच्या बायकोने, हातातले काम फेकून ती धावली खोलीकडे! बघते तर काय! फुलाच्या आकाराचे ते भांडे... त्याचे तुकडे झालेले... खीर फरशीवर आणि कबरी उत्साहाने, दणक्यात खीर चापतेय्... रामूच्या बायकोला पहाताच कबरी धूम पळाली!!

रामूच्या बायकोची तळपायाची आग मस्तकाला पोहोचली! संताप, संताप झाला तिच्या जिवाचा!

रामूच्या बायकोने कबरी मांजरीला ठार मारण्याचा निश्चय केला. रात्रभर तिला झोप लागली नाही. कबरी मरण्यासाठी तिच्यावर कसा हल्ला करावा, याबाबतच ती पडल्या पडल्या विचार करू लागली. सकाळ झाली, उंबरठ्यावर बसलेली कबरी अगदी प्रेमाने रामूच्या बायकोकडे बघत होती.

रामूच्या बायकोने थोडा विचार केला, नंतर गालातल्या गालात हसत उठली. रामूची बायको उठताच कबरी तिथून खसकली. रामूच्या बायकोने एक भांडेभर दूध खोलीच्या दारापाशी ठेवले. हातात पाटा घेऊन ती आली, तेव्हा कबरी दुधावर तुटून पडली



एक अदम्य उत्कट चैतन्य (ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक आप्पा पेंडसे यांचे प्रेरणादायी चरित्र) किं. रू. ५०/-

होती. संधी मिळाली होती. सगळी शक्ती एकवटून तिने पाटा कबरीच्या अंगावर टाकला. कबरीने जराही हालचाल केली नाही अन् ती किंचाळली, ओरडलीसुद्धा नाही!! फक्त एकदम उलटी झाली!!

आवाज होताच मोलकरीण झाडू टाकून, स्वैपाकीण स्वैपाकघर सोडून आणि सासूबाई पूजा अर्धी ठेवून तेथे आल्या. रामूची बायको खाली मान घालून अपराध्यासारखी सगळ्यांचे बोलणे ऐकू लागली.

मोलकरीण म्हणाली,''अरे देवा! वहिनीबाई मांजरीला सूनबाईनं मारलं! फारच वाईट झालं!''

स्वैपाकीणीने सूर लावला,

''आईसाहेब! मांजर आणि माणूस दोघांची हत्या सारखीच! सूनबाईच्या डोक्यावर हे हत्येचं पाप असेतो आम्ही नाही सैपाक करणार बाई! ''

सासू उत्तरली,''हो, तुझं बरोबरच आहे. जोपर्यंत सूनबाईच्या डोक्यावरून हे पाप नाही उतरत, तोपर्यंत ना कुणी पाणी पिईल ना जेवेल! सूनबाई, हे काय करून बसलीस गं!''

मोलकरीण म्हणाली,''मग काय करायचं आता? गुरूजींना बोलावून आणायचं का?''

सासूला जरा धीर वाटला,''अगं हो, जा पळ, गुरूजींना बोलावून आण.''

मांजरीच्या हत्येची बातमी शेजारीपाजारी वेगात पोहोचली. शेजारच्या बायकांची रांगच लागली, रामूच्या घरी! चोहोबाजूंनी प्रश्नांची सरबत्ती आणि रामूच्या बायकोची खाली मान!

परमसुख गुरूजींना जेव्हा ही बातमी कळली तेव्हा ते पूजा करत होते. बातमी कळताच ते उठले. आपल्या बायकोला हसत म्हणाले,''जेवण नको करूस! घाशीरामच्या सूनेनी मांजरी मारली. प्रायश्चित्त घ्यावे लागेल. गोडधोड करावे लागेल!''

परमसुख गुरूजी लहानसर चणीचे होते. उंची चार फूट दहा इंच! आणि पोटाचा घेर अठ्ठावन्न इंच! चेहरा गोल गुबगुबीत! मिशा मोठ्या मोठ्या! गोरापान रंग आणि कमरेपर्यंत पोहोचणारी शेंडी! मथुरेत जेव्हा खादाड भटजींना शोधले जायचे, तेव्हा यादीत पहिले नाव परमसुखजींचे!

परमसुख आले. कोरम पूर्ण झाला. पंचायत बसली. सासू, स्वैपाकीण, मोलकरीण, किसनूची आई, छन्नूची आजी आणि परमसुख गुरूजी! उरलेल्या स्त्रिया सूनबाईबद्दल सहानुभूती दाखवत बसल्या होत्या.

किसनच्या आईने विचारले, ''गुरूजी, मांजरीची हत्या केल्यामुळं कोणत्या नरकात जावं लागेल हो?''

परमसुख गुरूजी पंचांग बघत म्हणाले,''केवळ मांजरीच्या हत्येवरून नरकाबद्दल सांगता येणार नाही.



***जगणे कठीण झाले आहे तरी जगायचे आहे, साहण्यासारखे अजून पुष्कळ साहायचे आहे.***

'राष्ट्रदेवो भव' (कै. आप्पा पेंडसे यांची प्रेरक वैचारिके) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. कि. रू. ५०/-

त्यासाठी मांजरीच्या हत्येची वेळ समजली पाहिजे.''

''असेल सकाळी सात वाजण्याचा सुमार!'' स्वैपाकीणबाई म्हणाल्या.

परमसुख गुरूजींनी पंचांगाची थोडी पाने चाळली. अक्षरांवर बोटे फिरवली. डोक्याला हात लावून ते विचार करू लागले. चेहऱ्यावर काहीसे अस्पष्ट भाव, कपाळावर आठ्या, नाक आक्रसलेले आणि स्वर गंभीर,''हरे राम! हरे कृष्ण! फार वाईट झालं! सकाळी ब्राह्ममुहूर्तावर मांजरीची हत्या! महाभयंकर! रामूच्या आई, हे फारच वाईट झालं की हो!''

रामूच्या आईचे डोळे पाण्याने भरले. ''तुम्हीच सांगा, गुरूजी, आता काय करायचं!''

परमसुख गुरूजी थोडे हसले! ''रामूच्या आई तुम्ही काळची नका करू! अहो, मग आम्ही पुरोहित कशासाठी आहोत? शास्त्रात प्रायश्चित्त सांगितलं आहे. ते झालं की सर्व ठीक होईल.''

रामूची आई,''गुरूजी म्हणूनच तुम्हाला बोलावलं, आता पुढं काय करायचं हो?''

''करायचं काय? एक सोन्याचं मांजर तयार करून सूनबाईच्या हस्ते दान करायचं! जोपर्यंत मांजरी देणार नाही, तोपर्यंत घर अपवित्रच राहणार! मांजर दान केल्यावर काही पूजा पाठ २१ दिवस करायचा.''

छन्नूची आजी,''हं! बरोबरच आहे! गुरूजींचे म्हणणे अगदी खरे आाहे. मांजर दान करू. नंतर पूजा पाठ!''

रामूच्या आईने विचारले,''गुरूजी किती तोळे सोन्याची मांजर करायची हो?''

गुरूजी हसले, आपल्या पोटावर हात फिरवत हणाला.''मांजरी किती तोळ्याची करायची? अहो, रामूच्या आई, शास्त्रात तर सांगितलंय मांजरीच्या वजनाच्या सोन्याएवढी मांजरी तयार करायची! पण आता कलियुग आलंय! धर्मकर्म नष्टच झालंय! श्रद्धा म्हणून राहिली नाही. मांजरीचे वजन २०-२१ शेरापेक्षा कमी नसणार! हं! कमीत कमी २१ तोळे सोन्याची मांजरी करून द्या. बाकी तुमची श्रद्धा! ''

रामूची आई डोळे मोठे करीत गुरूजींकडे बघत म्हणाली,''अरे बाप रे! एकवीस तोळे? गुरूजी, हे फार होतंय! एक तोळा सोन्यात काम नाही का होणार?

परमसुख गुरूजी हसू लगभले. ''रामूची आई! एक तोळा सोन्याची मांजरी? कमाल झाली! सूनेपेक्षा रूपये का जास्त महत्त्वाचे? सूनबाईच्या डोक्यावर मोठं पाप आहे. यात एवढा मोह नको''

कमी जास्त करणे सुरू झाले. शेवटी अकरा तोळे सोन्यावर मामला निश्चित झाला. यानंतर पूजेबद्दल बोलणे निघाले. गुरूजी म्हणाले, ''त्यात काय अवघड आहे? आम्ही कशासाठी



ज्ञान प्रबोधिनी एक अभिनवशैक्षणिक प्रयोग खंड -२. ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. कि. रू. ७५/-

आहोत? मी पूजापाठ करीन, पूजेचे साहित्य माझ्या घरी पाठवून द्या म्हणजे झाले!''



''पूजेचे किती सामान?''

''कमीत कमी साहित्यात करून टाकू पूजा! दान करण्यासाठी दहा मण गहू (४० शेर = १ मण) एक मण डाळ मणभर तेल, पाच मण जव आणि पाच मण चणे, चार पासरी तूप, एक मण मीठ! बस्! एवढंसं पुरेसे आहे! एवढ्यात भागवू!''

''अगं बाई! इतकं सामान! गुरूजी यात किती तरी पैसा खर्च होईल!'' रामूची आई रडवेली होत म्हणाली.

''मग यापेक्षा कमी खर्चात नाही होणार! मांजरीची हत्या केवढे मोठे पाप! खर्च पहायच्या आधी सुनेचे पाप बघा. हे प्रायश्चित्त आहे! गंमत नाही आणि जशी करणी तसे प्रायश्चित्त! तुम्ही लोक असे तसे थोडेच आहात! एवढे तेवढे पैसे म्हणजे तुमच्या दृष्टीने किरकोळच!''

गुरूजींच्या बोलण्याचा सर्वांवर भलताच परिणाम झाला! किसनूची आई म्हणाली, ''गुरूजी म्हणतात, ते बरोबरच आहे. मांजरीची हत्या असं तसं पाप नाही! मोठ्या पापाचा खर्च सुद्धा मोठाच येणार!''



ज्ञान प्रबोधिनी एक अभिनव शैक्षणिक प्रयोग खंड-3. ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. कि. रू. ८०/-

छन्नूची आजी बोलली, ‘‘नाही तर काय! दानधर्मानेच पाप नाहीसं होईल! दानधर्मात नफा तोटा पाहाणे बरं नाही!’’

मोलकरीण म्हणाली, ‘‘बाईसाहेब, तुम्ही मोठी माणसं एवढ्या खर्चाचं काय घेऊन बसलायत्?’’

रामूच्या आईनं सगळीकडे नजर फिरवली. सगळेजण गुरूजींच्या बाजूचे झाले होते. परमसुखजी गालात हसत म्हणाला, ‘‘रामूच्या आई, एकीकडं सुनेला नरकवास आणि दुसरीकडं तुमच्यावर थोडा खर्च! आता पाठ फिरवू नका!’’

एक थंड उसासा सोडत रामूची आई म्हणाली, ‘‘आत जसं नाचवाल तसं नाचायलाच हवं!’’

गुरूजींना जरा राग आला. ते वैतागून बोलले, ‘‘तुम्हाला जर पटत नाही, तर मी निघतोच....’’ असं म्हणून त्यांनी पोथी पंचांग आवरायला सुरूवात केली.

‘‘अहो गुरूजी, रामूच्या आईचं काही म्हणणं नाही. बिचारीला किती दु:ख होतंय्! उगीच वैतागू नका!’’ स्वैपाकीण, छन्नूची आजी, किसनूची आई एकाच सुरात बोलल्या.

रामूच्या आईने गुरूजींचे पाय पकडले आणि गुरूजींनी स्वत:ची बैठक पक्की केली!

‘‘आणखी काय करायचं?’’

‘‘२१ दिवसांचे पूजा पाठाचे २१ रूपये आणि २१ दिवस दोन्ही वेळेला पाच पाच ब्राम्ह्मणांना भोजन द्यावे लागेल’’ थोडं थांबत गुरूजी पुढे म्हणाले. ‘‘त्याची काळजी नको. मीच एकटा दोन्ही वेळा जेवेन. माझ्या जेवण्यानं पाच ब्राम्ह्मण जेवू घातल्याचं पुण्य मिळेल.’’

‘‘हे अगदी बरोबर आहे. गुरूजींचे पोटच बघा ना!’’ स्वैपाकीण हसत, चेष्टेने बोलली.

‘‘ठीक आहे, रामूच्या आई, प्रायश्चित्ताच्या तयारीला लागा. अकरा तोळे सोने आणा, मी त्याची मांजरी करून आणतो. दोन तासात येतो परत. बाकी पूजेची व्यवस्था करा आणि हे बघा पूजेसाठी...’’

गुरूजींचे बोलणे पूर्णही झाले नव्हते, एवढ्यात मोलकरीण धापा टाकत खोलीत घुसली. सगळ्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. रामूच्या आईने घाबरतच विचारले, ‘‘अगं बाई! काय झालं गं?’’

मोलकरीण अडखळत, कसल्यातरी आवाजात म्हणाली, ‘‘आईसाहेब, कबरी मांजरी तर उठून पळून गेली की हो!’’

**मूळ हिंदी कथा – ले. भगवतीचरण वर्मा**
**(मेरी प्रिय कहानियाँ – किताबसे)**

■■

**अनुवाद – चारूता पुराणिक**
N/11, स्वा. सावरकर नगर,
माणिकबाग, सिंहगड पथ, पुणे ५१



ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधनची विविध पुस्तके संग्रही ठेवा, स्थानिक कार्यालयातून खरेदी करा.

# भ्रमाचा भोपळा

– सोनाली देव

ती एक स्वच्छ, मोकळी दुपार ---- युरोपच्या पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावर भटकणारा तो प्रवासी--- समोर पसरलेला अथांग हिरवा सागर, मधूनच चमकणाऱ्या स्वच्छ पांढऱ्या लाल क्षितिजापाशी टेकलेले निळेभोर आकाश--- नुकतीच त्याने आपल्या कॅमेऱ्यात कोरी फिल्म घातली होती. ते समोरचे सुंदर दृश्य आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त करण्यासाठी त्याने कॅमेऱ्याचे बटण दाबले 'क्लिक्'--'

आता त्याची नजर किनाऱ्याकडे वळली किनाऱ्यावरती वाळूत उभी असलेली, समुद्राच्या लाटांच्या पार्श्वभूमीवर शोभून दिसणारी ती काळी होडी, लाल रंगाचे मासे पकडायचे जाळे--- आहा – किती सुंदर दृश्य होते ते! प्रवाशाने पुन्हा एकदा कॅमेऱ्याचे बटण दाबले 'क्लिक'---

जरा जवळ गेल्यावर त्याच्या नजरेला दिसला त्या होडक्यात डुलक्या घेत असलेला कोळी. अंगावरचे कपडे फाटके-तुटकेच होते. पण तो अगदी निवांत दिसत होता. प्रवाशाच्या मनात आलं की हे तर तिसरं सुंदर दृश्य! तेही आपल्या कॅमेऱ्याने टिपायला हवे.

इजा...बिजा...तिजा... आणि पुन्हा एकदा 'क्लिक'

मात्र कॅमेऱ्याच्या त्या बारीकशा आवाजानेही तो डुलक्या काढणारा कोळी अर्धवट जागा झाला अन् खिशात हात घालून सिगारेटचं पाकीट शोधू लागला. प्रवासी तत्परतेने पुढे झाला आणि एक सिगारेट त्याला देऊ केली. एवढंच काय आपल्या लायटरने ती शिलगावूनही दिली. भारी कपड्यातल्या प्रवाशाच्या प्रत्येक हालचालीवरून जाणवत होते की काहीतरी निमित्त काढून त्या कोळ्याशी संभाषण करायची त्याची इच्छा होती.

"आज सकाळी कुणीतरी म्हणताना ऐकलं की आज हवा मासेमारीला खूप अनुकूल आहे म्हणून!"

कोळ्याने नुसतीच मान हलवली.

"मग आज तुम्हाला खूप मासे पकडता येतील, नाही?"

त्याने पुन्हा एकदा निर्विकारपणे मान हलवली.

"मग तुम्ही मासेमारीला जाणार नाही का?"

कोळ्याने परत एकदा फक्त मुंडी हलवली.

आयुष्यभर मिळणाऱ्या संधीचा लाभ घेत, कष्ट करून संपन्न बनलेल्या त्या शहरी माणसाला आता वाईट वाटू लागलं. इतकी चांगली संधी चालून आलीय त्याचा फायदा हा गरीब कोळी का बरं



'प्रबोधन गीते ध्वनिफीत' भाग-२ (ज्ञान प्रबोधिनीकृत समूहगीते, स्फूर्तिगीते) ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन. कि. रू. ४०/-

करून घेत नाही?

त्याच्या मनात आलं 'हा आजारी तर नसेल?'

पुन्हा त्याने त्या कोळ्याला विचारलं

''तुमची प्रकृती बरी नाही का?''

''छे! छे! मला काय धाड भरलीय!'' असं म्हणत तो कोळी झटकन् ताठ्यात उभा राहिला. इतक्या वेळाचं आपलं मौन त्याने सोडलं म्हणून प्रवाशाला एकीकडे बरं वाटलं तर आपलं भलं याला कसं समजत नाही म्हणून वाईटही वाटलं.

पुन्हा एकदा त्याने चिकाटीनं विचारलं- ''एवढी छान हवा असूनही तुम्ही मासे पकडायला का जात नाही?''

आता मात्र क्षणाचा विलंब न लावता तो उत्तरला, ''अहो मी सकाळीच मासेमारीला जाऊन आलोय.''




''हो का, मग खूप मासे मिळाले असतील!''

''हो, आज परत समुद्रात होडी घालायची गरज नाही बघा. जवळचवळ डझनभर मासे, झालं तर चार खेकडे. आता तीन-चार दिवसांची बेगमी झाली बघा.''

कोळ्याच्या चेहऱ्यावर होतं समाधान तर प्रवाशाच्या चेहऱ्यावर त्याच्याविषयी काळजी!

हे बघा तुमच्या खाजगी बाबतीत ढवळाढवळ करायचं मला कारण



वाखाच्या विविध कलात्मक वस्तूंसाठी संपर्क- शिवगंगा महिला उद्योग, ग्रामविकसन विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

नाही तरीही राहवत नाही म्हणून एक गोष्ट बोलू का?''

''हो, हो अगदी मोकळेपणाने!'' कोळी उत्तरला.

''क्षणभर कल्पना करा आजच्या दिवसात तुम्ही दोनदा, तीनदा किंवा अगदी चौथ्यांदासुद्धा मासेमारी करायला गेलात आणि अगदी भरपूर मासे तुम्हाला मिळाले...''

फक्त अशी कल्पना करा...

आजच नाहीतर

उद्या...परवा...अगदी प्रत्येक दिवशी असेच मासे मिळत गेले तर तुम्हाला माहितीय काय होईल?''

कोळ्याने फक्त मान डोलावली.

''फक्त एका वर्षात तुम्ही मोटरबोट विकत घ्याल- दोन वर्षात दुसरी---- तीनचार वर्षात एखादं लहान जहाज---

मग एके दिवशी दोन जहाजे'--

बोलताबोलता त्याच्या आावाजातील उत्सुकता शिगेला पोहाचली. ''मग तुम्ही माशांसाठी एक शीतगृह बांधाला, एक सुंदरसं हॉटेल--- एवढंच काय लॉपस्टर माशांची निर्यात कुणाच्याही मध्यस्थीशिवाय सरळ पॅरिसला निर्यात करता येईल मग''----

भविष्यातल्या संपन्नतेचं ते स्वप्न कोळ्यासमोर रंगवताना प्रवाशाच्या बोलण्याचा वेग नकळत वाढला. कोळी मात्र शांतपणे जाळ्यात पकडलेल्या इकडून तिकडे उड्या मारणाऱ्या माशांकडे बघत होता.

आणि मग--- पुढे काय ते प्रवाशाला सुचेना. लहान मुलाची समजूत घालण्यासाठी ठेवावा तसा आपला हात हळूवारपणे त्या प्रवाशाच्या खांद्यावर ठेवत कोळ्याने हळूच विचारले

''आणि मग काय?''---


जरा शांत होऊन प्रवासी उत्तरला, ''मग शांतपणे तुम्हाला समुद्रकाठी निवांत बसता येईल. सूर्यप्रकाशात डुलक्या घेत समोरच्या अथांग सागराचे सौंदर्य न्याहाळून पाहाता येईल.''---

''पण ते तर मी आतादेखील करत आहे'' कोळी म्हणाला... ''थोड्या वेळापूर्वीच मी शांतपणे इथे बसलो होतो आणि माझा जरासा डोळा लागतो न लागतो तोच तुमच्या कॅमेऱ्याच्या आवाजाने मला जाग आली.''

कोळ्याचे हे शब्द कानावर पडताच इतका वेळ स्वप्नरंजनात रमलेल्या त्या प्रवाशाचे डोळे खाडकन उघडले. इतकावेळ त्या गरीब कोळ्याची त्याला कीव येत होती पण आता मात्र, वाटत होता हेवा!

■■

***सोनाली देव***
पर्वती पायथा,
पुणे-९.





उत्तम दर्जाच्या उद्वाहक (लिफ्ट्स् ) उभारणी व देखभालीसाठी संपर्क -उद्‌वाहक विभाग, ज्ञान प्रबोधिनी,पुणे.

# रंगफुलांच्या गंधदेशी

पुण्यामध्ये रस्त्यांच्या कडेला, परसात किंवा बागांमध्ये लावण्याजोगा एक नवा फुलवृक्ष अलीकडे समाविष्ट झालेला दिसतो. याला म्हणायचं टबेबुया अर्जेन्शिया. पुण्यातील टेल्को या विख्यात उद्योगसमूहाचे उद्यानाधिकारी श्री. एम्. डी. शर्मा यांनी हे फुलझाड पुण्यात आणले. याच्या सोनपिवळया फुलांसे घोस अप्रतिम दिसतात. त्यामुळेच गुलमोहर, नीलमोहोर तसा हा सोनमोहोर. त्याचं फूल पाहिलं की डोळ्यांचं पारणंच फिटतं. वसंत ऋतु आणि क्वचित ग्रीष्मातही ही झाडं आपल्याकडे फुलतात. (मुखपृष्ठावरील झाड)

पुण्यात संचेती हॉस्पिटलवरून रूळवाटेवरच्या उड्डाणपूलावरून मुंबई–पुणे राष्ट्रीय हमरस्त्याकडे जाताना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे आवारात, तसेच चतु:श्रृंगी रस्त्यावर सोनपिवळ्या फुलांचा टबेबुया आपले बस्तान बसवून उभा आहे. कमला नेहरू उद्यान, आगरकर संशोधन संस्था अशा ठिकाणीही सोनमोहोर लावला गेला आहे. या वृक्षाला ट्री ऑफ गोल्ड असंही म्हणतात. या वृक्षाला फुलोरा आला, की सारी पानं गळून जातात आणि सोनेरी फुलांचे फक्त घोसच झाडावर दिसतात.

मूळच्या मध्य अमेरिकत असणाऱ्या सोनमोहोराचे मूळ वसतिस्थानातील नैसर्गिक शत्रू म्हणजे कीड किंवा रोगकारक बुरशी, आपल्याकडे अस्तित्वात नाहीत. त्यामुळे येथील हवामानाशी अन् जमिनीशी जुळवून घेऊन अशा परदेशी मंडळींनी एकदा का पाय रोवले, की त्यांची निरोगी वाढ जोमाने होते. मूळ भूमीपेक्षा इकडे त्यांचे सौंदर्य त्यामुळेच अधिक खुलून दिसते. वृक्षजातीचा प्रसार खेडोपाडी, शहरोशहरी आगामी काळात निश्चत होणार! त्यांचा योग्य तो शास्त्रीय परिचयाचा भाग सर्वांना कळेल अशा भाषेत वेळेवर करणे महत्त्वाचे आहे. हा लेख म्हणज त्याच अनुषंगाने केलेला एक प्रयत्न.

***– प्र. के घाणेकर***

---

सरत्या फाल्गुनात होळी आणि रंगपंचमी साजरी होते. थंडीनं केव्हाच पलायन केलेलं असतं. प्रचंड फुलवृक्ष पानं गाळून टाकतात. निष्पर्णतेचं सावट अवघ्या वृक्षांवर पसरू लागतं आणि हळूच वसंतऋतुची चाहूल हलक्या पावलांनी लागते. आता प्रतीक्षा सुरू होते फुलांच्या रंगोत्सवाची, उन्हाळा आला की फुलांची दिवाळीच साजरी होत असते. वसंतबहारचे अनेक मानकरी आहेत. डोंगरदऱ्यात, माळरानात, दाट रानात, गावच्या वस्तीजवळ नाहीतर काँक्रीटची जंगले बनलेल्या दाट वस्तीच्या शहरी भागातसुद्धा गळणारी पानं अन् फुलणारी झाडं दिसू लागतात. आपलं बारीक लक्ष मात्र हवं.

अंगभरून फुलणारी संक्रांतवेल, सुवर्णपुष्प गणेरी आणि तबेबुया अर्जेन्शिया जणू काही या रंगोत्सवाच्या ललकाऱ्या देणारे रंगकर्मीच.



अर्थपूर्ण संस्कार पोथ्या : अंत्येष्टी : रू. १८/-, उपनयन उपासना रू. १०/- ज्ञानप्रबोधिनी प्रकाशन.

बिग्नोनियाच्या रंगकुळात समाविष्ट असणारी ही संक्रांतवेल मूळची परदेशी. पण आता मात्र ती इथलीच होऊन गेली आहे. संक्रांतीच्या आसपास बोटभर फुलांचे, दाट केशरी रंगाचे, मोठे झुपके ही संक्रांतवेल ओळखण्याची खूण. अनेक उद्यानात आणि हौशी मंडळींच्या घरीदारी या बिग्नोनियाचा वावर असतो.

उकाड्याला थोडी सुरुवात झाली की गणेरीचे मोठे वृक्ष पाने टाकून देतात. डोंगरदऱ्यात अन् माळरानात एरवी लक्षही वेधून न घेणारे गणेरीचे वृक्ष उंचावलेल्या फांद्यांवर टपोऱ्या कळ्या पैदा करू लागतात. पहाता पहाता त्या कळ्यांपासून तळहाताएवढ्या मोठ्या सोनपिवळ्या रंगाची दिमाखदार फुलं साकारली जातात. कात्रजच्या घाटात गणेरीची बरीच झाडं आहेत. या गणेरीचं नाव कॉक्लोस्पर्मम. यांचा डिंक फारसा चिकट नसतो. पण पाण्यात घातला की खूप फुलतो म्हणून आइस्क्रीम-जेली अन् अशाच पदार्थात केवळ आकारमान वाढविण्यासाठी तो वापरला जातो.

एव्हाना ओसाड डोंगरटेकड्यांवर सांदी कोपऱ्यात अंग चोरून बसलेली धायटी किंव धावटी आपले रंगफुलोरे फुलवू लागते. शेंदरी तांबड्या रंगाची छोटी छोटी पण असंख्य फुले, त्यांना पानोपानी लगडतात अन् मग आयुर्वेदात वर्णिलेल्या आसवं, अरिष्टं अन् काढे करणाऱ्यांची लगबग सुरू होते. ही फुलं औषधांत घालून त्यांना थोडंसं आंबवून औषधी गुणधर्म वाढवायला ही धायटीची शेंदरी फुलं अत्यंत आवश्यक असतात.

गेल्या १५-२० वर्षात आपल्या बागांमध्ये एक नवं फुलझाड दिसू लागलं आहे त्याच नाव आहे टबेबुया. सोनपिवळ्या रंगाचे भरदार फुलोरे पाहिले की सोनमोहोर असं त्याचं नामकरण करायला काहीच हरकत नाही. पण हा आहे टबेबुया अर्जेन्शिया. त्याची भेगाळलेली साल अन् पानांची खालची बाजू पांढरट चंदेरी म्हणून हा अर्जेन्शिया. कारण अर्जेन्टम म्हणजे चांदी. याचाच आणखी एक भाऊबंद म्हणजे टबेबुया रोझिया. मंद गुलाबी रंगाची फुलं त्यावर लगडतात अन् त्यांचा सडाच खाली पडतो. टबेबुया ॲव्हलांडीच्या फुलांचा मोहक, दिलखेचक रंग केवळ अफलातून. त्याचं वर्णन करणं माझ्या आवाक्याबाहेरचं. पुण्यातल्या कमला नेहरू उद्यानाजवळ भांडारकर रस्त्याच्या फुटपाथवर हा ॲव्हलांडी बस्तान बसवून राहिला आहे. शेजारी पाखर नावाचा बंगला आहे. योग्यवेळी इथं आलं तर पुण्यात इतके सुरेख दर्शन अन्य काहीच नाही या मताशी तुम्ही सहज सहमत व्हाल. या फुलांचे रंग वेगळे, हेच खरं. त्याचं अंग भरून फुलणं अन् रंगांचा तजेला पहात रहावा असा. एव्हाना "चाफा आला फुली" ही ओळ आठवू लागते. दोनचारशे वर्षापूर्वी परदेशातून भारतात आलेला प्लुमेरिया आता देशभर पसरला आहे. पांढऱ्या फुलांचं अंतरंग मात्र सोनपिवळं असतं. हा पांढरा चाफा आणि खुरचाफा म्हणजे क्षीरचंपक. त्याचाच एक भाऊबंद म्हणजे तांबडा चाफा. मी रहातो तिथे नारायण पेठेत



देहदान, नामकरण, षष्ट्यब्दिपूर्ति, वर्षारंभ, वर्षान्त, वास्तुशाति इ. साठी अर्थपूर्ण संस्कार पोथ्या. ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.

मोदी गणपतीच्या मागे पर्वती व्ह्यू नावाच्या श्री. आडकरांच्या घराच्या आवारात असाच एक लाल चाफा आहे. फेब्रुवारी ते मे तो अखंड अंगभरून केवळ फुलतच असतो. चाफ्याला तशी वर्षभरच फुलं असतात. पण फारच क्वचित त्यांना फळं किंवा शेंगा लागतात.

मार्च-एप्रिलमध्ये उन्हाळ्याची तल्लखी अधिक वाढते आणि परीक्षांचे दिवस येतात. तोवर आणखीही बऱ्याच मंडळींच्या अंगात येतं. पेट्रियाा व्हॉल्युबिलीस म्हणजे निळी भिंगरी आणि केशरी भगव्या रंगाचे गच्च गेंद असणारे क्लेरोडेंड्रॉन ह्या दोन वेली बंगल्या-बंगल्यामधून आपली रंगपंचमी साजरी करताना दिसतात.

या दिवसात जावं वऱ्हाडात. तो सारा मुलुखच शेंदरी-भगव्या रंगाच्या कोट्यवधी अन् अब्जावधी फुलांनी सजून गेलेला असतो. त्रिदली पानं असणारा पळस हा तिथला मानकरी. यालाच इंग्लिशमध्ये म्हणतात 'फ्लेम ऑफ द फॉरेस्ट'. याची गळलेली फुलं वेचून उकळत्या पाण्यात टाकली की उत्तम रंग तयार होतो. आता या नैसर्गिक रंगाचं पाणी अंगावर उडवावंसं न वाटलं तरच नवल. कापड रंगवण्यासाठी पळसाच्या फुलांचा हा रंग पूर्वी मोठ्या प्रमाणात वापरला जायचा.

शिरीषच्या डेरेदार वृक्षांचा सारा नूरच एव्हाना बदलेला असतो. संध्याकाळी दुमडून झोपी जाणारी त्याची पानं ही खूण. गुलाबी तंतूमय फुलोऱ्यांनी नाजूक नखरेल फुलांची ती नक्षी केवळ देखणी दिसते. आता आवर्जून पहावं असं झाड म्हणजे शाल्मली किंवा सावर. बॉम्बॅक्स मलबॅरिकमचा हा वृक्ष अती मऊ लाकडाचा. म्हणूनच त्याच्या खोडातून काड्यापेटीतील काड्या तयार करतात. पण त्याची पाणी पिण्याच्या भांड्याएवढी मोठी फुलं जेव्हा फुलतात तेव्हा डोळ्यांचं पारणंच फिटतं. त्यातील साखरपेरणी पक्षांना खूप आवडते. मग ते गोड रस चाखायला कितीतरी पक्षी सावरीच्या भोवती घुटमळत बसतात. पक्षी निरीक्षकांना असा एखादा सावरीचा वृक्ष म्हणजे पक्षी निरीक्षणाची सुवर्णसंधीच असते.

फेब्रुवारी ते मे हे दिवस पाखरांचे आणि वाघळांच्या मेजवानीचे. पळस धुमसत असतो, पांगरा पेटत असतो, सावरीच्या लालभडक ठिणग्यांची ही एवढी बचकभर फुलं झालेली असतात. तर विशाल वटवृक्षांवर लाल मण्यांचं भरतकाम हिरव्यागार पानाच्या पोतांवर उठून दिसत असतं.

या फुलांच्या दिवाळीत मुचकुंदाची आगळी फुलं वैशिष्ट्यपूर्ण भासतात. सोललेल्या केळ्यांसारखी दिसणारी याची फुलं केवळ त्याचीच. त्यांचा मंद गंध सर्वांना आवडतोच असं नाही. त्याची फताडी पानं एरवी पत्रावळी करायला मोठ्या प्रमाणात वापरली जातात.

अलीकडे नागचाफा किंवा

कुंतीचाफा म्हणजे शिवालिंगी, कैलासपती अशा नावांनी ओळखला जाणारा, खास फुलवृक्ष बऱ्याच ठिकाणी लावला जाऊ लागला आहे. त्याला



उत्साही मुले मुली ज्यांच्या घरी, छात्र प्रबोधन त्यांचे समाधाना करी!

म्हणतात तोफगोळ्यांचं झाड किंवा कॅनन बॉल ट्री. कवठासारख्या फळांचे घोस एका दांडोऱ्यावर लटकत राहिलेले दिसतात. त्याच्या फुलांच्या पाकळ्या खाली जमिनीवर सुगंधी पखरण करीत राहतात.

पण या उन्हाळ्यात खरा मानकरी म्हणजे कॅशिया. सतत फुलणारा, रस्त्याच्या कडेने लावला जाणारा, सोनपिवळ्या नाजूक पाकळ्यांचा सडा घालणारा कॅशिया सयामिया म्हणजे सयामी कॅशिया, पुण्यातील डेक्कन जिमखान्यावरील आपटे रस्त्यावर असणाऱ्या संतोष बेकरी शेजारचा गुलाबी फुलांचा भुईनळाच वाटणारा कॅशिया रेनिजेरा आणि देखण्या लिंबकांतीच्या फुलांचे घोस वागवणारा कॅशिया फिश्युला म्हणजे बहावा. यांना जोडच नाही. फुलावृक्षांच्या दरबारातील कॅशिया कुळाचा दबदबा फारच मोठा. यांच्या नाना जाती. सगळ्याच देखण्या फुलांच्या. त्यांचं वर्णन करण्यापेक्षा त्यांचं प्रत्यक्ष दर्शन घेणंच चांगलं.

काजू आणि आंब्याच्या फुलांचं मोहोरणं साऱ्यांनाच सुखावतं. त्यांच्या मधूर फळांच्या स्मृती जाग्या होतात. अन् ह्या वर्षीही आपल्या जीभेचे चोचले पुरवले जाणार या कल्पनेनें सुखाची स्वप्नं पडू लागतात. 'अंजन, कांचन करवंदीच्या फुलांच्याही देशा; बकुळफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा' असं वर्णन केलेल्या या महाराष्ट्रात प्रतीक फुलवृक्षांचा मान मिळाला आहे एक त्यामानानं अपरिचित फुलवृक्षाला. त्याला म्हणतात. जरूळ, बोंडारा किंवा तामण. पण लॅगरस्ट्रोमिया या नावानं त्याची ओळख पटते. नदीकाठी किंवा थोडीफार ओल टिकून रहाणाऱ्या वहाळांच्या आसपास वाढणाऱ्या तामणीचा रंगविलास डोळयांना सुखविणारा.

गुलमोहोरांचं तरारून फुलणं अन् नीलमोहोराचे नीलकांती फुलणं यांचा उल्लेख न करून चालणारच नाही. या शोभिवंत परदेशी वृक्षांनी आता आपलं राज्य खेड्यापाड्यापर्यंत पसरवायला सुरुवात केली आहे. त्यांची राजछत्रे नव्हे फुलछत्रे केवळ अनुभवण्याजोगी! सीतेचा अशोक म्हणजे रक्तवर्णी टपोऱ्या फुलांचे भरदार गच्च गेंद न पाहील तो कमनशिबी.हेही वसंतोत्सवातील पुष्पोत्सवाचे तालेदार मानकरीच.

नटवी झाडं अन् नाचरी फुलं यांचं दर्शन घ्यावं, त्यांची अधिक माहिती मिळवावी. सुरंगी, सुगंधी, सुपुष्पी, सुदर्शन अशा पुष्पसृष्टीचं कॅलेंडर आपलं आपण तयार करावं. त्या त्या वेळी हा पुष्पोत्सव आपण स्वत: पहावा, इतरांना दाखवावा. निसर्गाच्या या रंगपंचमीचं आपण डोळस साक्षीदार बनावं अन् कृतार्थता मानावी. एवढ्यासाठी तर केलंय, हे पांढऱ्यावर काळं.

■■

***– प्र. के. घाणेकर***
१०५ नारायण पेठ, पुणे ३०.



बांबूपासून कलात्मक वस्तूंसाठी संपर्क - ज्ञान प्रबोधिनी ग्रामविकसन विभाग, पुणे ३०.

# संन्याशाची आमटी

– *मीना वांगीकर*

नरसिंहय्या हे आमच्या गावातल्या शाळेत शिक्षक होते. त्यांच्या स्वभावाची दोन वैशिष्ट्ये होती. एक म्हणजे ते कोणत्याही कामाला पाच मिनिटे उशीरा जात अन् दुसरे म्हणजे त्यांना भेंडी घालून केलेली आमटी खूप आवडत असे.

जुन्या वळणात वाढल्यामुळे ते रोज पद्धतशीरपणे देवपूजा केल्यानंतरच जेवत असत. देवपूजेत त्यांना कोणतीही काटछाट चालत नसे. नंतर जेवायला त्यांना वेळ लागत नसे. परंतु बायकोने मात्र स्वयंपाक अगदी तयार ठेवायला हवा. कधीकधी स्वयंपाक तयार नसायचा. त्यामुळे आठवड्यात तीन दिवस ते शाळेत उशीरा पोहोचायचे. कधीकधी हेडमास्तर त्यांना ''काय नरसिंहय्या, वेळेवर शाळेत हजर राहणे तुम्हाला जमतच नाही की!'' असे हटकायचे. ''काल वेळेवर आलो होतो सर... आजच जरा उशीर झाला.'' नरसिंहय्या सारवासारव करायचे. ती थाप आहे हे हेडमास्तरांच्या लक्षात आले की ते, ''काय सांगता? कालही उशीराच आला होतात!'' असे म्हणायचे. मग ते ''चुकलं सर, माफ करा.'' अशी माफी मागून आपल्या वर्गात जाऊन शिकवायला लागायचे.

त्यांची आई कोवळ्या भेंडीची आमटी खूप चविष्ट करत होती म्हणे. तिची चव काय वर्णावी! त्या चवीची मुख्य खुबी म्हणजे चिंच-गूळ घातल्यानंतर आमटीला नुसती एक उकळी पुरेशी नाही, तर ती छाऽन उकळायला हवी आणि मस्त उकळल्यावरती तिला गोडी यायची. तीच त्यांची खरीखुरी भेंडीची आमटी! त्यांच्या वडिलांनाही ही आमटी अतिशय प्रिय होती. वडिलांकडून हे प्रेम मुलापर्यंत चालत आले होते.

काही दिवसांनंतर आमच्या गावात शिवगंगास्वामीजी आले. स्वामीजी मोठे विद्वान! नरसिंहय्या, स्वामीजी उतरले होते तेथे रोज सकाळी जाऊन काम करून मग घरी जाऊन, जेवण करून शाळेत जायचे. दहाबारा दिवस नरसिंहय्या शाळेत उशीरा गेले. हेडमास्तरांची विचारले तर नरसिंहय्या म्हणाले, ''स्वामीजींच्या सेवेसाठी गेलो होतो. त्यामुळे उशीर झाला. क्षमा करा, सर,'' हेडमास्तर जरा रागाने म्हणाले, ''नरसिंहय्या, शाळेतील काम तुम्ही पगार घेऊन करता, मठातील काम भक्तीसाठी करता. हे तुम्ही लक्षात ठेवलं पाहिजे.''

अखेर स्वामीजी पुढच्या गावी गेले. एके दिवशी काय झालं, नरसिंहय्या भाजी आणायला गेले असता तेथे कोवळ्या भेंडीचा एक भला मोठा ढीग त्यांना दिसला. तो पाहूनच त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. भेंडी घेऊन घरी आमटी करायला सांगून. ती खाऊनच शाळेला असे त्यांनी ठरवले. भेंडी स्वयंपाकघरात ओतून बायकोला म्हणाले''हे पाहा, उत्तम भेंडी आणली आहे. असली कोवळी भेंडी नेहमी मिळत नाही. आज अचानक मिळाली आहे. छान आमटी कर.''

आपल्या नवऱ्याला भेंडीची आमटी म्हणजे जीव की प्राण हे बायकोला ठाउक होते. आपल्या सासूकडून चवदार आमटी करायला ती शिकली होती.

पण चवदार आमटी करायला वेळ कुठे होता? अकराच्या आधी त्यांना शाळेत निघायला हवे होते. घाईघाईत आमटी करून तिची चव बिघडून वाढवण्यापेक्षा रात्री शांतपणे करून वाढणे चांगले असे मनोमन ठरवून तिने चालू असलेला स्वयंपाकच केला.



भेंडीची आमटी केलीच नाही.

नरसिंहय्या देवपूजा आटपून जेवायला बसले. बायकोने नेहमीप्रमाणे भाजी-भात वाढून दोन मिनिटाने आमटी वाढली. ती वांग्याची होती. भेंडीची नव्हती.

''हे काय? भेंडीची आमटी केली नाही.''

''भेंडीची आमटी जास्त उकळायला पाहिजे ना? आता वेळ नव्हता. रात्रीसाठी ठेवली आहे. ही आमटी चुलीवर होती. म्हणून तीच वाढली झालं.''

''अग दुष्टे, तू अशी कशी झालीस? मला आवडते म्हणून मी भेंडी आणून करून घाल म्हटलं तर वांग्याची आमटी वाढतेस? तू कसली बायको? मी सांगितल्यावरही तू माझ्या शब्दाला मान दिला नाहीस तर नवरा-बायकोच्या नात्याला अर्थ काय? लग्न तरी कशासाठी करायचं? हे बघ, आपलं नवराबायकोचं नातं आता इथंच संपलं. मी डोक्याला



राख फासून निघून जाईन. तू तुझं मन मानेल तशी सुखात रहा.'' नरसिंहय्या पानावरून ताडकन उठले.

बायकोला काही सुचेनासे झाले. ''अहो, अशी काय डोक्यात राख घालून घेता? शाळेला उशीर होईल म्हणून मी ही आमटी केली. त्याचा इतका राग?



छात्र प्रबोधन वार्षिक संच ४(१९९५-९६ मधील चौथ्या वर्षातील अंकांचा संग्रह) किं.रू.१००/-

जेवणच काय सोडून दिलंत?'' ती दीनपणे म्हणाली.

नरसिंहय्यानी तिच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. हात धुतले, अंगात एक सदरा अडकवला. कोटाच्या खिश्यातील चार पैसे कमरेला खोचले व ते सरळ घराबाहेर पडले. शाळेत गेले. तेथे अजून हेडमास्तर आले नव्हते. ते पाहून नंतर त्यांना पत्र लिहू असे ठरवून ते सरळ स्वामीजी उतरलेल्या तीन कोसावरच्या गावाच्या रस्त्याला लागले.

तिन्हीसांजेच्या वेळी त्या गावी पोहोचून स्वामी उतरले होते तेथे आले. ''कसे काय येणे झाले?'' अशी मठातील लोकांनी चौकशी करता, ''स्वामीजींना सोडून राहणे अवघड वाटले. त्यांनी सेवा करण्यासाठी निघून आलो.'' असे उत्तर दिले.

रात्री स्वामीजींनी ''काय नरसिंहय्या, अजून काही दिवस जवळ राहावे म्हणून आलात म्हणे, शाळेच्या नोकरीचे काय?'' असे विचारले. ''मी उद्या सकाळी तुम्हाला सर्व सविस्तर सांगेन.'' नरसिंहय्या म्हणाले.

सकाळी नरसिंहय्या स्वामीजींनी विचारले,''तुम्हाला काहीतरी सांगायचे होतं ना?''

''मला संसाराचा उबग आलाय. संन्यास घ्यायचा आहे. आपण अनुग्रह करून मला संन्यास द्यावा अशी नम्र विनंती आहे.''

''का रे बाबा, आठवड्यापूर्वी तुमच्या गावात होतो तेव्हा तसा विचार नव्हता. आम्ही तुमचा गाव सोडल्यावर एकाएकी कशी तुम्हाला ही विरक्ती आली? ''

ते सर्व क्षुल्लक आहे. गुरूचा उपदेश कानी पडल्या पडल्याच आमच्यासारख्यांच्या मनापर्यंत पोहोचतो का? जरा उशीरा ते मनाला भिडले. हा संसाराचा मोह पुरे असे वाटले.''

''ठीक आहे, संसार पुरे असे वाटणे चुकीचे नाही. पण तसे तुमचे वय झालेले नाही. कशाला घाई करता?''

''वय झाले नाही तरी गुरूंचा आशीर्वाद व उपदेशामुळे माझ्या मनाला संन्यासाची ओढ लागली आहे. जेव्हा विरक्ती येते तेव्हा संन्यास पत्करावा असे आपणच सांगता ना? माझी या क्षणी ती अवस्था झाली आहे. या मन:स्थितीला पोहोचलेल्या माझी आपणच इच्छा पूर्ण करावी अशी माझी विनंती आहे.''

स्वामीजींनी जरा विचार केला. नंतर म्हणाले,''उद्या -परवा तुला दीक्षा देऊ. रहा इथंच.''

दोन-तीन दिवस आपल्याला बोलावतील म्हणून नरसिंहय्याने वाट पाहिली. स्वामींनी बोलावले नाही. दुपारच्या पूजेनंतर नरसिंहय्यानेच स्वामीजीजवळ जाऊन, ''आपण मला संन्यासाचा अनुग्रह देणार असा दिलासा दिल्याने मी दोन दिवस वाट पाहातोय. गुरूजी, आज तरी या पामरावर दया कराल का?'' अशी अति नम्रपणे विनंती केली.

स्वामीजी बरं म्हणाले व दुसऱ्या दिवशी नरसिंहय्यांना विधीप्रमाणे संन्यासाश्रमाची दीक्षा दिली. तीन दिवस त्या गावात राहून स्वामीजी पुढच्या गावाला निघाले. नवा संन्यासीही त्यांच्या बरोबर निघाला.



छात्र प्रबोधनचे जुने अंक सवलतीच्या दरात उपलब्ध! संपर्क साधा, छात्र प्रबोधन, पुणे ३०.

स्वामीजी एकूण सहा महिने दौऱ्यावर होते. संन्यासी नरसिंहय्या तेवढा काळ त्यांच्याबरोबरच राहिले. त्यांनी संन्यासी जीवनाचे अचूकपणे पालन केले.

शिवगंगेला पोहोचल्यावर त्या मठाच्या व्यवस्थापकाने संन्यासी नरसिंहय्यांच्या कानावर हळूच एक गोष्ट घातली ते म्हणाले, ''संन्यासधर्माचे अनुष्ठान करण्याची पद्धत गुरूंच्या सान्निध्यात आपण शिकलात. आता इथं राहण्याची आवश्यकता नाही. तुम्हाला स्वतंत्रपणे आश्रमधर्माचे आचरण करता करता समाजसेवा करून, संन्यसत्वाची उंची गाठून सिद्धी संपादन करता येईल.''

'बरं, तसंच करतो' असे म्हणण्याखेरीज नरसिंहय्यांना दुसरा उपाय नव्हता. त्या दिवशीची भिक्षा संपल्यावर ते स्वामीजींना नमस्कार करून ''चार महिने आपल्या आश्रमात राहून आश्रमाचे सर्व अनुष्ठान आत्मसात केले. आता मला दोन महिने स्वतंत्रपणे राहाण्याचा आशीर्वाद द्या.'' अशी विनंती केली. ''ठीक आहे. जा, आश्रमधर्माचे निष्ठेने पालन करा, तुमची तपश्चर्या सिद्धीस येऊ दे.'' असा तोंडभर आशीर्वाद दिला. नरसिंहय्या आपल्या गुरूंचा निरोप घेऊन शिवगंगेतून बाहेर पडले.

शिवगंगा सोडल्यावर आता जायचे कुठे हा प्रश्न त्यांच्यासमोर आ वासून उभा राहिला. अंगातील कपड्याखेरीज आणखी एक पंचा, झोपायला एक पांघरूण इतकेच सामान. निघताना स्वामीजींनी आपणहून दिलेले पाच रूपये जवळ हाते. एवढ्यावर ह्या संन्यास्याने आपल्या नव्या जीवनाची सुरुवात केली. आपले गुरू किती कृपाळू आहेत व पुढचा विचार करणारे आहेत याचे त्यांना आश्चर्य वाटले.

काही विचार करून नरसिंहय्या डान्स्पेटला आले. तेथे त्यांचे यथासांग स्वागत झाले. नरसिंहय्यांना मुलांना शिकविण्याचा अनुभव होता. शिवाय गेले काही महिने आपल्या गुरूंची प्रवचने ऐकून पाठ झाली होती. त्यांचे भाषणही प्रभावी झाले. ऐकणारे ''स्वामीजी खूप छान उपदेश करता.'' असे म्हणत घरी परतले. दुसरे दिवशी सकाळी यांनी तुमकूरला जाण्याचे ठरवले. त्या गृहस्थाने त्यांना पानसुपारी-बरोबर पाच रूपये दक्षिणा देऊन नमस्कार केला. ती घेऊन ते तुमकूरला आल. त्यानंतर ते बंगलोरला पाहोचले. प्रत्येक दिवशी ओळख वाढवून नरसिंहय्या आपल्या विद्येची सोय लावून घेत. चार दिवस उपदेश केल्यावर आपल्याकडचे ज्ञान तोकडे आहे अशी जाणीव त्यांना झाली.

अशा प्रकारे गावोगावी हिंडण्यात चार महिने घालवून संन्यासी नरसिंहय्याने आपल्या गावी जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे गेले सुद्धा!

सकाळी अकराचा सुमार होता. योगायोग म्हणा, नाहीतर दैव म्हणा, समोरून त्यांच्या पूर्वाश्रमातील शाळेत निघालेले हेडमास्तर सामोरे आले. नरसिंहय्याने जुन्या सवयीने त्यांना नमस्कार केला. हेडमास्तर उभे राहून निरखून त्यांच्याकडे पाहू लागले. संन्याशाचा नमस्कार घेऊन गप्प कसे बसता येईल? त्यांनी वाकून नमस्कार केला.



अर्थपूर्ण संस्कार पोथ्या : गणेश प्रतिष्ठापना रू. ४/- विवाह रू. १९/- ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.

''ओळखलंत का?''

आकाराने नाही पण आवाजाने ओळखून ''नरसिंहय्या स्वामीजी ना?'' हेडमास्तरांनी विचारले.

''होय.''

''तुमच्या आवाजाने मी तुम्हाला ओळखलं. काय स्वामीजी, कोणालाही न सांगता, न विचारता सहा महिन्यांपूर्वी निघून गेलात. तुम्ही संन्यास घेणार असं कोणीतरी सांगितलं तरी माझा त्यावर विश्वास बसला नाही. आता पाहावं तर ते खरं दिसतंय. नोकरी सोडली आहे असं सुद्धा न सांगता गेलात ना? ही काय वागण्याची पद्धत झाली.''

''म्हणजे, सर त्या क्षणी तसं करावंसं वाटलं. केलं. आता काय करायचं?'' नरसिंहय्यांनी आपली चूक कबूल करत, विनम्र आवाजात म्हणाले.

''तुम्ही कुठेतरी गेला आहात. पुन्हा याल असं वाटून, मी तुम्हाला बिनपगारी आठ महिन्याची रजा पाहिजे असा रिपोर्ट करून रजा मंजूर करून घेतली आहे. संन्यास विसरून पुन्हा नोकरीला परत येणार असाल तर पाहा. नोकरी तुमची वाट पाहात आहे.''

'हे काय? परमेश्वर मला हे अधांतरी संन्यासी जीवन पुरे कर असे सुचवितो आहे का?' असे नरसिंहय्यांच्या मनात आले.

''मी संन्यास घेण्याचा विचार सोडणार नाही. नोकरीला परत येण्यासंबधी विचार करतो.'' त्यांनी हेडमास्तरांना सांगितले.

नरसिंहय्या संन्यासी होऊन गावी परतले आहेत हे कळल्यावर अनेक लोक त्यांना पाहायला आले. त्यांची बायको माहेरी गेली होती म्हणून आली नाही. आली तर काय गत होईल ही भीती त्यांना होतीच. आपल्या गावी यायचा निश्चय केला तेव्हा हे रामायण कधी ना कधी घडणार याची त्यांना खात्री होती. अशी वेळ आली तर जाणकारांनी मध्यस्थी घालून समजूत काढायची असे त्यांनी ठरवले होते. आपल्या ओळखीचा माणूस स्वामी होऊन आपल्या गावात आलाय म्हटल्यावर त्यांच्या ओळखीच्या, नात्यातल्या अनेकांनी त्यांना एकेक दिवस भिक्षेला बोलावले. आपण संन्यास घेऊन गावोगावी फिरलो तरी ओळखीच्या गावामध्ये जेवणाची काळजी करण्याचे कारण नाही याची त्यांना खात्री पटली.

घरोघरी जाताना एक दिवस हे आपल्या पूर्वाश्रमीच्या बायकोच्या मोठ्या आत्याकडे गेले. त्या वयस्कर होत्या. नरसिंहय्यानी संन्यास घेण्याचे खरे कारण त्यांना ठाऊक होते. ते गावात आल्याचे कळल्यावर हे संन्यासाचे भूत उतरवायचे हा त्यांनी निश्चय केला होता.

''तुझा नवरा आश्रमातून परतला आहे. तू आमच्या घरी येऊन राहा. एक दिवस त्याला मी आमच्या घरी भिक्षेला बोलावले आहे. नंतर काय करायचे ते पाहू.'' असा निरोप त्यांनी आपल्या भाचीला पाठवला. त्याप्रमाणे ती आली.

त्यादिवशी आत्याने बाजारातून चांगली कोवळी भेंडी आणली. आपल्या भाचीला नवऱ्याच्या आवडीची आमटी करायला सांगितली. सर्व जण ठरलेल्यावेळी नरसिंहय्यांची वाट पाहू



वाढदिवसानिमित्त छात्र प्रबोधन मासिकाची वार्षिक वर्गणी भरून आपल्या जवळच्या नातेवाईकांना मासिक भेट द्या.

लागले. देवघरात नेहमीची पूजा करून, मग ते जेवायला बसले. आत्याने ती आमटी वाढली.

पानात भेंडीची आमटी पाहिल्या बरोबर नरसिंहय्यांना यात काहीतरी कारस्थान आहे अशी शंका आली. ''भेंडीची आमटी केली नाही म्हणून बायकोला सोडलंत अन् संन्यासी झालात ना? हा कसला तुझा संन्यास? अशी ही आत्या आपल्याला छेडते आहे असे त्यांना वाटले. परंतु वाढलेली आमटी मुकाट्याने खाण्याखेरीज दुसरा काहीच इलाज नव्हता. अगदी आई करायची तशीच ही आमटी खूप चविष्ट झाली होती.''

आपली बायकोदेखील जवळजवळ यात चवीची आमटी करत होती. पण आता ते आठवणे योग्य नव्हे. असे स्वत:ला बजावत ते घरच्या मालकीणीला उद्देशून म्हणाले, ''आमटी खूप छान झाली आहे. माझी आई अशीच आमटी करायची.''

''तुमची पूर्वाश्रमीची बायको नरसम्मासुद्धा ही आमटी खूप चविष्ट बनवत होती ना?'' आत्याने सरळ प्रश्न विचारला.

नरसिंहय्याने होकार दिला.

जेवण झाल्यावर सर्वजण बाहेरच्या खोलीत बसले.

काही वेळांनी स्वामीजींना नमस्कार करण्यासाठी घरमालकीण आत्या इतर बायकांबरोबर बाहेर आली. त्यात नरसम्मा होती. 'हे चुकीचे आहे, आश्रमधर्माविरूद्ध आहे.' असा विचार नरसिंहय्यांच्या मनात आला. अधिक विचार करायला अवधी मिळाला नाही. सर्वांचे नमस्कार झाल्यावर नरसम्माने त्यांच्या पाया पडून पाय घट्ट धरून ठेवले.

''मला सोडून गेलेले आज परतलात. पुन्हा तुम्ही मला सोडू नका, मी तुम्हाला सोडणार नाही.''

''छे, छे हे पाप आहे. असं करू नये.'' म्हणत नरसिंहय्यांनी पाय सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. पण बायकोने पाय सोडले नाहीत.

नरसिंहय्या असाहाय्यपणे आता जे काय व्हायचे ते होऊ दे म्हणून स्वस्थ बसले. एक मिनिट, दोन मिनिटे, तीन मिनिटे झाली तर बायकोने धरलेले पाय सोडले नाहीत.

''अजाण पोरगी आहे. त्यावेळी काहीतरी निष्काळजीपणानं तुझ्या इच्छेप्रमाणं वागली नाही म्हणून तिचं जीवन बरबाद करून संन्यास घ्यायचा का, नरसिंहा? तुला काय सुख मिळाले मला माहीत नाही. एकापरीने संन्यास छान वाटतो, कारण लहान-मोठे सर्वजण तुम्हाला नमस्कार करतात. तरी घरोघरी जेवणासाठी फिरणं चांगलं का? आपलं घर, बायको ह्यांच्याबरोबर संसार करण्यापेक्षा दुसरे उत्तम जगणे कुठले? मन मोठं कर. बायकोचं ऐक. जोडीने संसार कर. संन्यास पुरे.'' वयस्कर आत्याबाईने अगदी मर्मावरच घाव घातला.

नरसिंहय्यांना काय बोलावे हे सुचले नाही. एकीकडे बायको पाय घट्ट धरून धो धो रडत आहे. मध्ये मोठ्या आत्याचे शब्द पावसासारखे कोसळत आहेत.

''तू तर सुटा फिरता संन्यासी. श्रृंगेरी



छात्र प्रबोधनचे स्थानिक कार्यालय आपल्या गावात सुरू करण्यास तुम्ही इच्छुक आहात का? संपर्क -छात्र प्रबोधन, पुणे

किंवा केंगेरी अशा कोणत्याही मठाचा आधार व आश्रम असता तर ती गोष्ट वेगळी. हे काय? संसारी म्हणून घर नाही आणि संन्यासी म्हणून मठ नाही. या अधांतरी जीवनाला काय अर्थ आहे? ही तर पळवाट आहे. घरोघरी भिक्षेसाठी फिरायचे. भिक्षा घातलेल्या नातेवाईकांना सुखानी घास गिळवेल का? बायकोलाच कधीतरी भिक्षा घालायची वेळ आली तर तिची काय अवस्था होईल? ''

त्याक्षणी रागाच्या भरात घेतलेला संन्यास खरा संन्यास नव्हे. म्हणून जाणकारांनी सांगितलेले ऐकले आहे. संन्यास सोडून टाका नरसिंहय्या'' घरच्या यजमानांनी जोर धरला. ''जशी परमेश्वराची इच्छा!'' नरसिंहय्या म्हणाले. त्या क्षणीच त्यांचा संन्यास संपुष्टात आला.

महिनाभरात ही बातमी शिवगंगेतील स्वामीजींच्या कानावर गेली. सर्व हकीकत ऐकल्यावर ते म्हणाले, ''यात काही चूक नाही, आपण संन्यासी झालो होतो हे एक स्वप्न होते असे समजून त्यंनी ते विसरून जावे.''




■■

**मूळ कन्नड लेखक : मारूती व्यंकटेश अय्यंगार**
ज्ञानपीठ प्रशस्ती विजेता
**अनुवाद : मीना वांगीकर**
'सरस्वती' १२०४/२८ डेक्कन जिमखाना, पुणे ४.



मे महिन्याच्या स्वयं अध्ययन कौशल्ये, प्रतिभा विकसन कौशल्ये या शिबिरांसाठी संपर्क साधा - ज्ञान प्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे.

## ■ एप्रिल मधील शिबिरे उत्साहात संपन्न

पुणे, रत्नागिरी, लातूर, औरंगाबाद, सांगली येथील नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे, पुण्यातील नेतृत्व प्रशिक्षण शिबिर व पार्ले, धुळे, नाशिक येथील व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे उत्साहात पार पडली. रत्नागिरी व डोंबिवली येथील शिबिरे चालू असून अन्य ठिकाणीही सुट्टीतील कार्यक्रम चालू आहेत. या सर्वांचे संकलित वृत्त पुढील अंकात येईलच.

## ■ जून महिन्यात मुलांसाठीची व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे

ठिकाणे : इचलकरंजी, अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक, सातारा, डोंबिवली, लातूर.
कालावधी : २ ते ६ जून ९७. ●शुल्क : रु. ५०/- ● वेळ : रोज स. १० ते संध्या. ६.
वयोगट : इ. ६ वी ते ९ वी पर्यंतची मुले. शिबिर निवासी नसेल.
शिबिराची नावनोंदणी स्थानिक अथवा मुख्य कार्यालयात करावी. शिबिराच्या ठिकाणाबाबत स्थानिक कार्यालयात चौकशी करावी.


## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

**निगडी** – १) ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी ☎ ८४३८०
**सोलापूर** – ज्ञान प्रबोधिनी, बालविकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ २५७८२
**सातारा** – १) श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१ सर्व्हे नं.३२०/१अ अंजली कॉलनी, करंजे तर्फ. ☎ ५०५०४
**सांगली** – १) श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली. ☎ ७७३८२
**कोल्हापूर** – १) डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ ☎ ५२१५३४
**इचलकरंजी** – श्री. विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६८अ, झेंडा चौक, इचलकरंची ☎ ४२४००८
**नाशिक** – १) सौ. साधना गाडगीळ, रामकृष्ण धाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता. ☎ ५७४८३०
**ठाणे** – १) डॉ. अजित दातार, बी २० अहिल्या सोसा. घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** – सौ. ज्योती औटी, ३-श्री बिल्डींग, टिळकनगर हायस्कूल जवळ, डोंबिवली (पू.) ☎ ४७४१३९
**बोरीवली** – सौ. अंजली नलावडे, ६/२३५ योगानंद सोसा. वजिरा नाका, बोरीवली (प.) ☎ ८०८५५५०
**पार्ले** – सौ. शुभदा देशपांडे, इ/३ नवप्रभात हौ. सोसा. हनुमान रस्ता, विलेपार्ले. ☎ ६१००८९६
**अलिबाग** – श्री. तुषार साखळकर, 'सहयोग' श्रीबाग नं २, अलिबाग २४६०३
**रत्नागिरी** – सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद. ☎ २०७२४
**धुळे** – सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूड बाग, धुळे
**चाळीसगाव** – श्री. विंचुरकर, मुख्याध्यापक, गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव
**परभणी** – श्री. दिलीप रोके, 'पारस' नाथनगर, परभणी
**लातूर** – डॉ. अरुण देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४२६११४
**औरंगाबाद** – १) सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट. ☎ २३३२६


या कार्यालयांमध्ये सर्व शिबिरांची माहितीपत्रके मिळू शकतील.
तसेच शिबिरांचे शुल्क या ठिकाणी स्वीकारले जाईल.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून प्रकाशक व संपादक प्रा. महेंद्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर वैशाख १७ शके १९१९, ७ मे ९७ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.


## ‘ तुम्हीच संपादक व्हा ’ - स्पर्धेतील देखणी मुखपृष्ठे





१. ‘ गुलमोहोर ’ हस्तलिखित
स्वतंत्र गट, कराड




२. ‘ छात्रांगण ’ हस्तलिखित
योजना विद्यालय, बोरिवली




३. ‘ पर्यटन विशेषांक ’ हस्तलिखित
कै. ग. रा. पुरोहित कन्या प्रशाला, सांगली




४. ‘ पालवी ’ हस्तलिखित
स्वतंत्र गट, सांगली

नोंदणी क्रमांक : PHM / 22 / VIII / 1997 टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW / 349
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. - L 128

## मी युग नव निर्मीन

मी युग नव निर्मीन, मी युग नव निर्मीन ।। धृ ।।

रूखल्या सुखल्या भूमीवरती सद्‌भावाने करूनी वसती
संस्कारांचे जल सिंचुनिया, सोनमळे पिकवीन ।। १।।

शांत सागरा जवळी जाउन वडवाग्नीची ओळख सांगुन
सत्कार्याच्या प्रचंड लटा उसळत मी ठेवीन ।। २ ।।

येता कल्पांताची चाहुल, जन होती भयकंपित व्याकुळ
जनशक्तीला जागृत करुनी गोवर्धन उचलीन ।। ३ ।।

कोटि कोटि मम बाहू उभवुन नभ कोसळते अलगद झेलुन
विश्वासाचे उषःकिरण दिग्‌ दिगंतरी उधळीन ।। ४ ।।

ज्या एका स्वप्नाचा औरस भारतीय मी म्हणुनी वारस
पुनः जगाच्या जीवनात या साक्षात्कार बघेन ।। ५ ।।

संपर्क पत्ता :
संपादक, छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे 411 030. ☎ : ४७७६९१

| | |
|---|---|
| कार्यालयाची वेळ | : स. १० त संध्या. ७ |
| या अंकाची किंमत | : रु. ८/- |
| वार्षिक वर्गणी | : रु. १००/- |
| प्रकाशन दिनांक | : राष्ट्रीय सौर १७ वैशाख, शके १९१९<br>७ मे १९९७ |